



दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, १७ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४८ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# स्वातंत्र्यदिनी हिंगणघाट हळहळले

## तीन मुलींचा शाळेजवळच अपघाती मृत्यू

### स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या मुलींच्या दुचाकीला भरधाव खासगी ट्रॅव्हल्सने दिली धडक

**दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणघाट**

स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या तीन चिमुकल्या मुलींचा शाळेजवळच अपघाती मृत्यू झाला. देशभरात ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा होत असतानाच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरातून दुर्दैवी घटना समोर आली आहे. आंबेडकर शाळेजवळ भरधाव खासगी ट्रॅव्हल्स बसने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने तीन चिमुकल्या शाळकरी मुली गंभीर जखमी झाल्या. रुग्णालयात उपचार सुरू असताना तिन्ही मुलींचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे हिंगणघाट शहरावर शोककळा पसरली आहे. समृद्धी धामसे, आरुही चवरे आणि मिसबा शेख अशी या अपघातात मृत्यू झालेल्या मुलींची नावे आहेत. समृद्धी धामसे, आरुही चवरे आणि मिसबा शेख या तिन्ही मुली दुचाकीवरून स्वातंत्र्यदिनासाठी जात होत्या, त्याचवेळी आंबेडकर शाळेजवळ मागून येणाऱ्या भरधाव खासगी ट्रॅव्हल्स बसने दोरात धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की धडक बसताच तिन्ही मुली रस्त्यावर फेकल्या गेल्या





आणि गंभीर जखमी झाल्या. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून जखमी मुलींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान या तिन्ही निष्पाप मुलींची प्राणज्योत मालवली. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहातच तीन चिमुकल्या मुलींचा अपघातात मृत्यू झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच हिंगणघाट शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने अपघातस्थळी धाव घेतली असून, वाहतूक सुरळीत केली आहे. याप्रकरणी अपघातास कारणीभूत ठरलेल्या ट्रॅव्हल्स चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सरकारच्या विरोधात उभ्या राहणाऱ्यांचे कौतुक व्हावे

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रविवारी सांगितले की, सरकारच्या हिंसेविरुद्ध ठामपणे उभे राहिलेल्या भारतातील तरुणांचे धैर्य कौतुकास्पद आहे. त्यांनी पुढे म्हटले की, भाजपच्या लोकांकडून होणारी गैरवर्तणूक, शिवीगाळ आणि हिंसेचा सामना करणाऱ्या विद्यार्थिनींचेही कौतुक व्हायला हवे. राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादाचा व्हीडीओही शेअर केला.



या विद्यार्थ्यांनी गेल्या महिन्यात पेपरफुटीच्या मुद्द्यावर तत्कालीन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन केले होते. राहुल आणि विद्यार्थ्यांमधील हा संवाद ५ ऑगस्ट रोजी झाला होता, परंतु त्याचा व्हीडीओ त्यांनी आज शेअर केला आहे.

यापूर्वी राहुल यांनी जंतर-मंतरवील आंदोलकांसोबत पत्रकार परिषद घेतली होती. राहुल गांधींनी ५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील १० जनपथ येथे जंतर-मंतरवील आंदोलकांसोबत पत्रकार परिषद घेतली होती. ते म्हणाले की, २० जुलै रोजी झालेल्या कॉकरोच पार्टीच्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर लाठी आणि पॅलेट गनने हल्ला करण्यात आला. राहुल आपल्यासोबत चार आंदोलक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना माध्यमांसमोर घेऊन आले होते. एका विद्यार्थिनीने सांगितले की, भारत माता की जय म्हटल्यावर आम्हाला देशद्रोही म्हटले गेले. आम्ही शांततेत चाललो असताना एका पोलिस अधिकाऱ्याने शरीराच्या वरच्या भागावर मारले.

## थोडक्यात

### बोट उलटून ७२ ठार

**करिबा :** झिम्बाब्वेमधील करिबा सरोवरात फेरी उलटल्याने १८ मुलांसह ७२ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी होते. जोरदार लाटांमुळे ही फेरी उलटली. अपघातातील मृतांचा अधिकृत आकडा ७२ झाला आहे. करिबा शहरातून देशाच्या वायव्येकडील ग्रामीण आणि मच्छीमार समुदायांकडे ही जुनी फेरी जात होती. उलटलेली बोट एका सरकारी संस्थेद्वारे चालवली जात होती. करिबा सरोवराच्या आसपासच्या ग्रामीण भागातून किनाऱ्यावरील करिबा शहरात लोकांना नेण्यासाठी या बोटीचा उपयोग केला जातो. फेरीची क्षमता ९० प्रवाशांची असताना १५३ प्रवासी बोटीतून प्रवास करत होते. पोलिसांच्या माहितीनुसार, मृतांपैकी १६ जण १० वर्षे आणि त्याहून कमी वयाचे होते.

### बसच्या अपघातात १२ ठार

**हंगेरी :** पोलंडची राजधानी हंगेरीमध्ये रविवारी पहाटे भीषण अपघात झाला. हायवेवरून रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्डयात बस कोसळून पलटी झाल्याने या दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे सुमारे १ वाजता हा अपघात झाला. हंगेरीची राजधानी बुडापेस्टपासून सुमारे १४० किलोमीटर अंतरावर ही दुर्घटना घडली. बस रस्त्यावरून घसरून खडड्यात कोसळल्यानंतर पलटी झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. प्राथमिक तपासात ड्रायव्हरला डुलकी लागल्याने हा अपघात झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# सहायक पोलिस निरीक्षकाची गळफास लावून आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहर पोलिस आयुक्तालयात कार्यरत एका सहाय्यक पोलिस निरीक्षकाने (एपीआय) गळफास लावून आत्महत्या केली. शहर पोलिस दलाला धक्का देणारी ही घटना स्वातंत्र्य दिनी, शनिवारी मध्यरात्री घडली. ज्ञानेश्वर अंकूशराव झोल (वय ३५) असे मृत एपीआयचे नाव आहे.ज्ञानेश्वर झोल पोलिस आयुक्तालयातील अर्ज व प्रोटेक्शन शाखेत कार्यरत होते. पत्नी आणि मुलांसह ते पोलिस लाइन



टाकळीतील शासकीय वसाहतीत राहत होते.

शनिवारी भल्या सकाळपासून ते स्वातंत्र्य दिनाच्या कर्तव्यावर होते. दुपारी घरी परतल्यानंतर ते सायंकाळी ५.३० च्या सुमारास स्वामीनारायण मंदिरात जात असल्याचे सांगून बाहेर गेले. घरी परतल्यानंतर रात्री ९.३० वाजता पुन्हा मित्रांना भेटून येतो म्हणून परत बाहेर गेले. मध्यरात्री १२ च्या सुमारास घरी परतल्यानंतर त्यांनी जेवण केले. रात्री १ च्या सुमारास ते बेडरूममध्ये दिसत नसल्याने त्यांची पत्नी पूजा हिने हॉलमध्ये येऊन बघितले असता पाळण्याच्या साडीने गळफास लावलेल्या अवस्थेत झोल दिसून आले. पत्नीने गळफास सोडवून आरडाओरड केली. शेजारी गोळा झाल्यानंतर त्यांना डॉक्टरकडे नेले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले.

पहाटेच्या सुमारास ही घटना माहित झाल्यानंतर शहर पोलिस दलावर तीव्र शोककळा पसरली. पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी झोल यांच्या निवासस्थानी पोहोचले. त्यांनी मृत झोल यांची पत्नी पूजा हिच्याकडून घटनाक्रम जाणून घेतला. त्यानंतर गिट्टीखदान पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

# खाद्यतेलाच्या किमती गगनाला

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली/ मुंबई**

मागील काही दिवसांपासून महागाई प्रचंड वाढताना दिसत आहेत. कधी पेट्रोल-डिझेलच्या किमतीत वाढ होते, तर कधी डाळी, भाजीपाला महाग झालेला पाहायला मिळतो. आता पुन्हा एकदा महागाईचा झटका बसणार आहे. खाद्यतेलाच्या किमती सध्या गगनाला भिडत आहेत. मोहरीचे तेल, पाम तेल आणि शेंगदाणा तेलाच्या किमती गेल्या वर्षीपेक्षा जास्त वाढत आहेत. या हंगामात अन्नधान्याच्या किमती सामान्यतः वाढतात. भाजीपाल्याच्या किमतीही वाढत आहेत. पावसामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला असून त्याचा परिणाम किमतींवर दिसून येत आहे.

उत्तर प्रदेशात, सुलतानपूर, जौनपूर आणि इतर जवळच्या जिल्ह्यांमध्ये मोहरीचे तेल ७,००० ते ७,५०० रुपये प्रति क्विंटल दराने विकले जात आहे. शेतकऱ्यांच्या मते, किमती ८,००० रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, किरकोळ विक्रेते सध्या मोहरीचे तेल २२० रुपये प्रति किलो दराने विकत आहेत. ही दरवाढ केवळ एका महिन्यात झाली आहे.



केंद्र सरकारच्या ग्राहक विभागाने जाहीर केलेल्या दरानुसार, आज देशभरात मोहरीचे तेल सरासरी १९७.२५ रुपये दराने विकले जात आहे. एका महिन्यापूर्वी ते १९४.१५ रुपये दराने विकले जात होते. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी १५ ऑगस्ट २०२५ रोजी मोहरीच्या तेलाची किंमत ११८.२० होती. याचा अर्थ किमतींमध्ये स्पष्ट वाढ झाली आहे. केवळ मोहरीच नाही, तर पाम तेलाच्या किमतीतही गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. १५ ऑगस्ट रोजी पाम तेलाची किंमत १४९.५७ होती. एका वषार्पूर्वी ही किंमत १३०.२४ होती. याचा अर्थ गेल्या वर्षीच्या तुलनेत किमतीत २० ने वाढ झाली आहे, जी अंदाजे १४ टक्के दरवाढ दर्शवते.

सूर्यफूल तेलाच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी १५ ऑगस्ट रोजी किंमत १५९ होती. आज ती १९१.१६ आहे. शेंगदाण्याच्या किमतीतही मोठी वाढ होत आहे. त्याचा नवीनतम दर २०५.३९ आहे. गेल्या वर्षी याच दिवशी किंमत १८५.२६ होती, म्हणजेच १० टक्के वाढ झाली होती. काल सरकारने निर्यात होणाऱ्या इंधनावरील कर कमी करून तेल कंपन्यांना मोठा दिलासा दिला आहे. सरकारने शनिवारपासून निर्यात होणाऱ्या पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधनावरील विंडफॉल टॅक्स कमी करण्याचे आदेश दिले होते.

देशात रोजच्या वापरातील एफएमसीजी वस्तूंच्या किमती पुन्हा एकदा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जुलै ते सप्टेंबर २०२६ या तिमाहीदरम्यान प्रमुख कंपन्या आपल्या उत्पादनांचे दर वाढवण्याच्या तयारीत आहेत. साखर आणि पाम तेलासारख्या कच्च्या मालाच्या चढ्या दरांमुळे नफ्यावर ताण येत असल्याने कंपन्या थेट भाववाढ करण्यासोबतच श्रिंकफ्लेशनचा मार्ग अवलंबत आहेत. यामध्ये पाकिटाची किंमत तीच ठेवून त्यातील वस्तूचं वजन किंवा प्रमाण कमी केले जाते, ज्यामुळे ग्राहकांना किंमत वाढल्याचे लगेच जाणवत नाही.

# शेतकऱ्यांची पुन्हा दिल्लीकडे कूच

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

संयुक्त किसान मोर्चाने भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात आणि विविध मागण्यांसाठी पुन्हा एकदा दिल्लीकडे कूच करण्याची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांचे आंदोलन लक्षात घेता रविवारी पंजाब-हरियाणा सीमेवरील खनौरी बॉर्डर पूर्णपणे सील करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दिल्लीच्या दिशेने पुढे जाण्यापासून रोखण्यासाठी हरियाणा पोलिसांनी या ठिकाणी प्रचंड पोलिस बंदोबस्त तैनात केला बॅरिकेडिंग उभारले आहे.

भारत-अमेरिका व्यापार कराराला विरोध दर्शवण्यासाठी १६ ऑगस्टपासून २२८ किलोमीटर लांबीची किसान बचाओ पदयात्रा काढण्यात येत असल्याचे शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांनी जाहीर केले आहे. ही पदयात्रा १६ ऑगस्ट रोजी दाता सिंह वाला गावातून सुरू होणार असून २९ ऑगस्ट रोजी दिल्लीतील ऐतिहासिक जंतर-मंतर येथे पोहोचण्याचे नियोजन आहे. सुरुवातीला ५१ शेतक-यांचा पहिला ताफा दिल्लीच्या दिशेने कूच करेल, असे शेतकरी नेत्यांनी स्पष्ट केले आहे.

**शेतकऱ्यांच्या मुख्य मागण्या काय आहेत?**

एमएसपीची कायदेशीर हमी, सर्व पिकांना किमान आधारभूत किमतीची कायदेशीर हमी द्यावी. स्वामीनाथन आयोग - एम. एस. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करावी. व्यापार कराराला विरोध - भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारामुळे भारताच्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दुसरीकडे, पंजाबमधील बठिंडा येथे जिल्हाधिकारी कार्यालयाला घेराव घालण्यासाठी निघालेल्या शेतकऱ्यांवर आणि पोलिसांमध्ये तीव्र चकमक झाली. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करत लाठीमार केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या.

# नाबालिग युवती पर नागपुर में सामूहिक बलात्कार

### पुलिस ने आरोपियों के खिलाफ पोक्सो के तहत मामला किया दर्ज, नाबालिक अमरावती जिले के धामणगांव रेलवे शहर की

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अमरावती जिले के धामणगांव रेलवे शहर की एक नाबालिग लड़की के साथ नागपुर में सामूहिक दुष्कर्म (गैंगरेप) का सनसनीखेज मामला सामने आया है। इस घटना की जानकारी मिलते ही धामणगांव शहर और आसपास के इलाकों में भारी आक्रोश और हड़कंप मच गया है।

प्राथमिक जांच में सामने आया है कि वारदात में शामिल दो आरोपी धामणगांव रेलवे शहर के ही निवासी हैं, जबकि अन्य आरोपी नागपुर के बताए जा रहे हैं। आरोपियों ने नाबालिग को नागपुर ले जाकर इस घिनौने कृत्य को अंजाम दिया।

पीड़िता की शिकायत पर नागपुर शहर के सक्करदरा पुलिस थाने में सभी आरोपियों के खिलाफ भारतीय न्याय संहिता और यौन अपराधों से बच्चों का संरक्षण कानून की गंभीर व गैर-जमानती धाराओं के तहत अपराध दर्ज कर लिया गया है। मामले की गंभीरता को देखते हुए नागपुर और अमरावती पुलिस की टीमें हरकत में आ गई हैं और आरोपियों की धरपकड़ के लिए सघन तलाशी अभियान शुरू कर दिया गया है। पीड़िता के नाबालिग होने के कारण कानूनन उसकी पहचान पूरी तरह गोपनीय रखी गई है। पुलिस अधिकारियों का कहना है कि मामले की गहन जांच जारी है और दोषियों को जल्द गिरफ्तार कर सख्त कानूनी कार्रवाई की जाएगी।

इस वारदात से नागपुर शहर पुलिस महकमे मे खलबली मची हुई है. आरोपीयो की तलाश जारी है.

# कराटे क्लास संपल्यानंतर आठ वर्षांच्या चिमुकलीसोबत अश्लील कृत्य, प्रशिक्षकाला अटक

## नागपुरातील हुडकेश्वर परिसरातील घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कराटेचा वर्ग संपल्यानंतर प्रशिक्षकानेच एका ८ वर्षांच्या चिमुकल्या विद्यार्थिनीसोबत बाथरूममध्ये अश्लील कृत्य केल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना नागपुरातील हुडकेश्वर परिसरात घडली. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी कारवाई करत आरोपी कराटे प्रशिक्षकाला तात्काळ अटक केली.



सागर दुधे असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सागर दुधे हा हुडकेश्वर परिसरात कराटेचे प्रशिक्षण देतो आणि त्याच्या क्लासमध्ये अनेक लहान मुले-मुली शिकण्यासाठी येतात. शुक्रवारी रात्री (स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला) नेहमीप्रमाणे कराटेचा क्लास संपल्यानंतर सर्व मुले निघून गेली. त्यानंतर आरोपीने ८ वर्षांच्या चिमुकलीला क्लासमधील बाथरूममध्ये नेऊन तिच्यासोबत अश्लील कृत्य केले. घटनेनंतर घाबरलेल्या चिमुकलीने घरी पोहोचताच पालकांना घडलेला सर्व प्रकार सांगितला.

मुलीच्या आपबिती ऐकून संतापलेल्या पालकांनी कसलाही विलंब न करता पोलीस हेल्पलाईन ११२ वर संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच हुडकेश्वर पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ पीडित मुलीच्या घरी पोहोचले. पोलिसांनी मुलीकडून घडलेल्या प्रकाराची माहिती जाणून घेतल्यानंतर त्वरित कारवाई करत आरोपी कराटे प्रशिक्षक सागर दुधे याला ताब्यात घेऊन अटक केली. याप्रकरणी हुडकेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पुढील पाच दिवस मुसळधार

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

देशभरात पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून दररोज अधूनमधून पाऊस पडत आहे. रविवार दि. १६ ऑगस्ट रोजी, अनेक राज्यांमध्ये हवामानात बदल होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिल्ली-एनसीआरसह १६ राज्यांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पुढील पाच दिवस पाऊस सुरू राहण्याची शक्यता असून वाऱ्याचा वेग ताशी ६० ते ८० किलोमीटरपर्यंत असण्याची शक्यता आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. ईशान्य भारतात २१ ऑगस्टपर्यंत पावसाची शक्यता आहे. दक्षिण भारतातही पाऊस आणि वादळांची शक्यता आहे. त्यामुळे देशभरातील लोकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

भारतीय हवामान विभागाच्या मते, मान्सून द्रोणीचे पश्चिम टोक उत्तरेकडे आणि पूर्व टोक दक्षिणेकडे आहे. झारखंड आणि पश्चिम बंगालच्या लगतच्या गंगा-यमुना मैदानी प्रदेशावरील कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर कमी दाबाच्या क्षेत्रात झाले होते, जे आज आणखी कमकुवत झाले. वायव्य बंगालच्या उपसागरावर वरच्या हवेतील चक्रीवादळी अभिसरण आहे. परिणामी, पुढील ४८ तासांत उत्तर बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. मध्य आसाम, नैऋत्य राजस्थान आणि आसपासच्या भागांवर वरच्या हवेतील चक्रीवादळी अभिसरण आहे. या हवामान परिस्थितीमुळे वायव्य, मध्य, ईशान्य आणि दक्षिण भारतातील हवामानात बदल होतील.

संपादकीय लेखणीतून...

# वाहतूक कोंडी, अपघात आणि मृत्यू टाळा

या दिवसाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याची आणि सिग्नलच्या मार्गदर्शनानुसार सुरक्षितपणे प्रवास करण्याची प्रतिज्ञा करावी. रस्ते सुरक्षा ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, आणि वाहतूक सिग्नलचा योग्य वापर करून आपण ती सुनिश्चित करू शकतो. आंतरराष्ट्रीय वाहतूक सिग्नल दिन आपल्याला या महत्त्वपूर्ण घटकाची आठवण करून देतो. आंतरराष्ट्रीय वाहतूक सिग्नल दिन हा दरवर्षी ५ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट वाहतूक व्यवस्थेतील सिग्नलचे महत्त्व आणि त्यांच्या कार्यक्षमता याबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. वाहतूक सिग्नल हे रस्ते सुरक्षेचा एक महत्वाचा घटक आहेत. ते वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्याचे मार्गदर्शन करतात.

पहिल्या वाहतूक सिग्नलचा वापर सन १८६८मध्ये लंडन येथे करण्यात आला होता. आज, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सिग्नल अधिक प्रभावी आणि स्मार्ट बनवले गेले आहेत. वाहतूक सिग्नल विविध रंगांच्या दिव्यांचा वापर करतात. लाल दिवा थांबण्याचा संकेत देतो, हिरवा दिवा मार्ग मोकळा असल्याचा, तर पिवळा दिवा सावधगिरीचा इशारा देतो. आंतरराष्ट्रीय वाहतूक सिग्नल दिनाच्या निमित्ताने, विविध शाळा, कॉलेज, आणि सामाजिक संस्था विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. यात वाहतूक नियमांचे पालन करण्याचे महत्त्व, सिग्नलचे योग्य वापर कसे करावे, आणि रस्ते सुरक्षेबद्दल जनजागृती यावर भर दिला जातो. या दिवसाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याची आणि सिग्नलच्या मार्गदर्शनानुसार सुरक्षितपणे प्रवास करण्याची प्रतिज्ञा करावी. रस्ते सुरक्षा ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, आणि वाहतूक सिग्नलचा योग्य वापर करून आपण ती सुनिश्चित करू शकतो. आंतरराष्ट्रीय वाहतूक सिग्नल दिन आपल्याला या महत्त्वपूर्ण घटकाची आठवण करून देतो. ट्रॅफिक सिग्नल आणि ट्रॅफिक लाइट हे सुरक्षा नियमांचे सर्वात महत्वाचे संच आहेत जे ड्रायव्हर आणि पादचाऱ्यांना माहित असणे आवश्यक आहे आणि लगेच ओळखले पाहिजे. हे सिग्नल आणि चिन्हे गोंधळ टाळण्यासाठी आणि रस्त्यावर सुव्यवस्था राखण्यासाठी अस्तित्वात आहेत. ट्रॅफिक सिग्नलचे पालन केल्याने तुम्हाला आणि इतरांना रस्त्यावर सुरक्षित ठेवता येते आणि वाहतूक कोंडी, अपघात आणि मृत्यू टाळता येतात. लाल, पिवळे आणि हिरव्या ट्रॅफिक लाइट्सचा अर्थ जगभरात सारखाच आहे, परंतु ट्रॅफिक सिग्नल आणि नियमांचे प्रकार देशानुसार भिन्न असू शकतात. भारतातील वाहतूक सिग्नल नियमांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी वाचा.

ट्रॅफिक सिग्नल्स ही ट्रॅफिक चिन्हे आहेत, जी रस्त्यांवरील वाहनांच्या हालचालींचे मार्गदर्शन करण्यासाठी चौकाचौकात प्रदर्शित केली जातात. ट्रॅफिक सिग्नलचा उद्देश संपूर्ण सुव्यवस्था राखणे आणि रस्त्यावरील जीवघेण्या घटना टाळणे हा आहे. ट्रॅफिक सिग्नल लाइट सिग्नलवर काम करतो आणि त्यात तीन रंग असतातः लाल, पिवळा आणि हिरवा. येथे 'लाल' म्हणजे वाहने थांबली पाहिजेत, 'पिवळा' म्हणजे वाहनांचा वेग कमी झाला पाहिजे आणि शेवटी 'हिरवा' म्हणजे पुढे जाणे. इतर रंगांच्या तुलनेत लाल, पिवळा आणि हिरवा रंग त्यांच्या दृश्यमानता आणि तरंगलांबीमुळे ट्रॅफिक लाइट म्हणून निवडले गेले आहेत. हे ट्रॅफिक सिग्नल दिवे रस्त्यावरील वाहतूक सुरळीतपणे चालवण्यास मदत करतात आणि रस्त्याच्या चौकात किंवा जिथे रहदारी नियमन अनिवार्य असेल तिथे ते सहजपणे दिसू शकतात. ट्रॅफिक सिग्नलचे नियम साधे, गुंतागुंतीचे आणि जगात सर्वत्र समान आहेत. ट्रॅफिक सिग्नलवर लाल दिवा म्हणजे पुढे गाडी न चालवता सिग्नलवर ताबडतोब वाहन थांबवणे. सिग्नलवर लाल दिवा दिसला की चालकाने त्याचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे; अन्यथा लाल दिवा उडी मारल्याबद्दल मोठा वाहतूक दंड आकारला जाऊ शकतो. लाल बाण लाल दिव्याप्रमाणेच कार्य करतो, परंतु एका विशिष्ट दिशेने रहदारीचा प्रवाह प्रतिबंधित करतो. डाव्या लाल बाणाचा अर्थ असा आहे की डावे वळण घेऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही ड्रायव्हरने लाल दिव्यावर थांबणे आवश्यक आहे. हा दिवा बऱ्याचदा सिग्नलवर आढळू शकतो जेथे विशिष्ट दिशेने वाहतूक थांबवताना काही रहदारी वाहू दिली जाते. चमकणारा लाल दिवा म्हणजे थांबणे, वाहने किंवा येणाऱ्या रहदारीकडे लक्ष देणे आणि नंतर पुढे जाणे. पहाटे किंवा रस्त्यावर जास्त किंवा कमी रहदारी असताना हा चमकणारा लाल दिवा ट्रॅफिक सिग्नलवर प्रदर्शित होतो. रेल्वे क्रॉसिंगवरही सिग्नलवर चमकणारा लाल दिवा दिसतो. जेव्हा सिग्नलवर पिवळा दिवा दिसतो, तेव्हा तो लाल दिवा लवकरच चालू होईल असे सूचित करतो. तर, क्रॉसिंगवर पिवळा दिवा म्हणजे लाल दिव्याच्या अपेक्षेने, म्हणजे सिग्नल लाल होण्यापूर्वी वाहनांचा वेग कमी झाला पाहिजे.

# अस्तित्वाचा महामंत्र भारत माझा देश आहे !

शशिकांत म.तोटे
यवतमाळ

"भारत माझा देश आहे.सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपराचा मला अभिमान आहे.त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माज्या अंगी यावी म्हणून सदैव प्रयत्न करीन. मी माज्या पालकांचा,गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे !"

ही राष्ट्रीय प्रतिज्ञा आपण सर्वजण लहानपणापासून शाळेत म्हणत आलो आहोत. देशातील प्रत्येक भाषेतील प्रत्येक पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पानावर ठळक अक्षरात वरील प्रतिज्ञा छापलेली असते.व ती आजही नियमीत परिपाठ म्हणून शाळा भरवताना विद्यार्थ्यांच्या मुखाद्वारे म्हटल्या जाते.परंतु ही प्रार्थना कोणी लिहिली? असा प्रश्न माझ्यासह अनेकांना पडत होता. साधारणतः कुठल्याही रचनेखाली त्या रचियेतेचे नाव असते. परंतु प्रतिज्ञेच्या खाली नाव नसल्यामुळे रचियता कोण? असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे.काही वर्षांपूर्वी या राष्ट्रीय प्रतिज्ञेच्या लेखकांचे नाव पुढे आले. ते कदाचित आजही अनेकांना माहीत नसेलही. त्यांचे नाव आहे पेदेमरी व्यंकट सुब्बाराव. ते आंध्र प्रदेशचे सुप्रसिद्ध तेलगू साहित्यिक होते. ही राष्ट्रीय प्रार्थना प्रत्येक भारतीयांच्या मनात देशाविषयी स्वाभिमान निर्माण करणारी आहे. ही रचना १९६२ मध्ये लिहिली.पुढे २६ जानेवारी १९६५ पासून देश पातळीवर पाठ्यपुस्तकांमध्ये समावेश करण्यात आली.

वरील राष्ट्रीय प्रतिज्ञा शालेय जीवनात राष्ट्रीयत्वाचे देशभूमीविषयी प्रेम, निष्ठा अधिक दृढ व्हावी या हेतूने म्हटले गेली. आजतायगतही म्हटल्या जाते; ती केवळ शालेय परिपाठाचा एक भाग म्हणूनच का? तर असे नव्हेचं! आज आपण स्वतंत्र भारताचा ७९वा वर्धापन दिन हर्षोउल्हासात साजरा करीत आहोत.हे निश्चितच सर्व भारतीयांसाठी गौरवास्पद बाब आहे. शेकडो वर्षांच्या परकीय जुलमी जोखंडातून मुक्त होऊन आपण आज स्वातंत्र्याची मधुर फळे चाखत आहोत. त्यांच्या शौर्य आणि बलिदानापायीचं स्वातंत्र्य भोगत आहो. याचे विस्मरण कदापि होता कामा नये. 'भारत माझा देश आहे' हे विधान तमाम भारतीयांचा आत्मा आहे. या देशातले सर्व नागरीक बंधू आणि भगिनी आहे, ही बंधूत्वाची भावना कदापि विसरू नये. अर्थात भारतात बंधुत्वाची भावना ही आपली राष्ट्रीय शक्ती आहे. विविध जाती, धर्म, आणि विविधतेने नटलेल्या परंपरेचा स्वाभिमान हा आपण बाळगायला हवा. करिता आपला व्यक्तिगत द्वेष, ईर्ष्ये चा त्याग करावा लागेल. तद्वतच सातत्याने घसरत चाललेल्या नीतिमूल्यांची जोपासना जबाबदारीने करणे हे आपले आद्यकर्तव्य असायला हवेचं.तरच आपण आपल्या



आई-वडिलांचा व गुरुजनांचा आदर ठेवण्यास पात्र होऊ. इतरांच्या सुख आणि दुःखात समत्वाची भावना वृद्धिंगत होणे गरजेचे आहे.आज देशात जात, धर्म, वर्ण,वंशाच्या नावाखाली काही देशकंटक राष्ट्राच्या प्रगतीस मोठा व्यत्यय आणित हे आहे.

परकीय शत्रूंचे हल्ले आपण क्षमविण्यास सक्षम आहोत.परंतु आज शत्रू विविध रूपांनी कृतिशील आहे. आज स्वातंत्र्य दिन साजरा करताना याचेही भान असायला हवे.आपण लोकशाही प्रधान देशात वावरत असताना लोकशाहीची मूल्यें काय? हे आज समजून घेतले पाहिजे. आपले प्रत्येक कर्तव्य देशहिताने प्रेरित असायला हवे.जणू ते आपले आद्य कर्तव्य मानले पाहिजे.ही संस्कृती जर आज आपण रुजविली नाही तर भविष्यात स्वतंत्र राष्ट्रासाठी मोठा धोका राहील.

भारत जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक म्हणून गणला जातो. तरुणाईची ही अथांग ऊर्जा नाविन्यपूर्ण विचार आणि तांत्रिक कौशल्य देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विकासाला गती देणारे प्रमुख इंजिन आहे.आधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने भारत जगाभरात उदयोन्मुख चेहरा आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि आर्टिफिशल इंटेलिजियन्स क्षेत्रात तरुण तंत्रज्ञ नवविष्कार घडवून देशाच्या डिजिटल क्षेत्रात मोलाचा वाटा उचलत आहे. त्याचे आकर्षण जगभरातल्या इतरही देशांना होत आहे. भारतीय तरुण लष्कर, नौदल, आणि वायुदलात देशसेवा व राष्ट्रीय सुरक्षेचे अहोरात्र कार्य करीत आहे.

जागृत मतदार म्हणून तरुण योग्य प्रगतिशील नेतृत्व करण्यास पुढे येताना दिसतो. राष्ट्रीय आव्हानावर अभ्यासपूर्ण उपयोजना सुचवून धोरण निर्मितीत सकारात्मक सहभागही दर्शवितो. नुकत्याच स्कॉटलांड येथे संपन्न झालेल्या ऑलम्पिक स्पर्धेत तरुण खेळाडूंनी वैयक्तिक विक्रम प्रस्थापित करीत, सुवर्ण पदके मिळवित देशाच्या स्वाभिमानात भर घातली आहे. राष्ट्रनिमार्णात तरुणाईंचे योगदान कायम अमूल्य राहिलेले आहे.ज्यात अधिक प्रमाणात विस्तार करण्यासाठी योग्य शिक्षण व संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्याद्वारे राष्ट्र उभारण्याची चळवळ अधिक व्यापक होईल.

– ९१३०८३५४५८

# नवभारताची नवी पहाट: लाल किल्ल्यावर 'वंदे मातरम्'चा स्वर घुमणार!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक तटबंदीवरून पुन्हा एकदा 'वंदे मातरम्'चा जयघोष घुमणार असून, नवभारताच्या एका नव्या, देदिप्यमान पवार्ची सुरुवात होत आहे.भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनी (१५ ऑगस्ट २०२६) लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून प्रथमच राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' गायले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यात 'वंदे मातरम्'च्या १५० वर्षेपूर्तीचे औचित्य साधून हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. लाल किल्ल्याच्या प्रांगणात जेव्हा 'वंदे मातरम्' आणि 'जन गण मन' चे स्वर घुमतात, तेव्हा तो केवळ एक सोहळा नसून राष्ट्र उभारणीचा नवा निर्धार असतो.

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७६ मध्ये लिहिलेल्या या गीताला २०२६ मध्ये १५० वर्षे पूर्ण होत आहेत. ब्रिटिशांच्या विरोधातील लढा आणि स्वदेशी चळवळीत या गीताने देशवासीयांमध्ये मोठी राष्ट्रचेतना निर्माण केली होती.पंतप्रधान मोदींच्या आगमनानंतर राष्ट्रध्वज फडकवण्यापूर्वी व भाषणाआधी हे गीत पूर्ण लयीत गायले जाईल.


**नवभारताचे प्रमुख संकल्प**

विशेष अतिथी म्हणून आमंत्रणः राष्ट्रीय नवोपक्रम कार्यक्रम पंतप्रधान कौशल्य विकास योजना आणि 'मेरा युवा भारत' स्वयंसेवक यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे तरुण. वंदे मातरमची दीडशे वर्षे वर्षपूर्तीनिमित्त लाल किल्ल्यावर ठउउ व माय भारतच्या २,५०० तरुण-तरुणींकडून मानवी साखळीद्वारे 'वंदे मातरम्' ची अक्षरे साकारली जाणार आहेत.

कौशल्य व उद्योजकताः स्टार्टअप इंडिया आणि पंतप्रधान इन्टर्नशिप योजनेतील उत्कृष्ट तरुणांना राष्ट्रउभारणीत जोडले जात आहे.

आत्मनिर्भरताः संरक्षण, तंत्रज्ञान आणि उद्योगात भारताचे वाढते पाऊल.

भारताचे संरक्षण उत्पादन २०२६ मध्ये विक्रमी १.७८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. 'आत्मनिर्भर भारत' धोरणांतर्गत स्वदेशी तंत्रज्ञान, खासगी क्षेत्राचा वाढता सहभाग आणि संरक्षण निर्यातीत झालेली लक्षणीय वाढ यामुळे देश संरक्षण, तंत्रज्ञान व उद्योगात



स्वावलंबनाकडे वेगाने वाटचाल करत आहे. देशातील संरक्षण उत्पादन क्षमता वाढून ती १.७८ लाख कोटी रुपयांच्या टप्प्यावर पोहोचली आहे. सैन्यासाठी लागणारी लढाऊ विमाने, युद्धनौका, क्षेपणास्त्रे आणि ड्रोन आता देशातच तयार होत आहेत. संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीत खासगी क्षेत्राचा वाटा सुमारे २५ टक्क्यांवर पोहोचला आहे.

आधुनिक पायाभूत सुविधाः आधुनिक पायाभूत सुविधा आणि डिजिटल क्रांतीमुळे दळणवळण यंत्रणेत अमुकुल बदल झाले आहेत. हाय-स्पीड इंटरनेट, ५ जी नेटवर्क, फायबर ऑप्टिक जाळे, आणि ई-गव्हर्नन्समुळे प्रवासाचा वेग, संप्रेषण आणि सरकारी सेवांचा लाभ घेणे अत्यंत सुलभ व पारदर्शक झाले आहे.

कागदपत्रांची गरज कमी होऊन डिजिटल माध्यमांद्वारे नागरिक सहज सेवा मिळवत आहेत. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि सुलभता आली आहे. सरकारी आणि खाजगी स्तरावर मोठ्या प्रमाणात डेटा सुरक्षित ठेवणे शक्य झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि स्वयंचलित प्रणालीद्वारे नेटवर्क अधिक मजबूत होत आहेत.

वाहतूक विकासः आधुनिक रस्ते, मेट्रो आणि वंदे भारत सारख्या वेगवान वाहतूक साधनांमुळे प्रवास सुरक्षित झाला आहे.

भविष्यातील तयारीः ६ जी आणि उपग्रह संप्रेषण प्रणाली जोडण्याच्या दिशेने संशोधन वेगाने सुरू आहे.

युवा शक्तीचा सहभाग लाल किल्ल्यावर स्थानः भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त (१५ ऑगस्ट २०२६) 'युवा शक्ती' ही मुख्य थीम ठरवण्यात आली असून, विकसित भारत २०४७ च्या स्वप्नपूर्तीत युवकांचे योगदान अधोरेखित करण्यासाठी नवोदित तरुण, स्टार्टअप्स आणि ऑलिम्पिक पदक विजेत्या विद्यार्थी गुणवंतांना लाल किल्ल्यावरील मुख्य सोहळ्यात विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे.

ऑलिम्पिक पदक विजेते विद्यार्थी आणि जेन-झेड (मधील गुणवंत विद्यार्थ्यांना थेट लाल किल्ल्याच्या तटबंदीवर बसण्याची संधी मिळणार आहे. स्टार्ट-अप्स आणि नवसंशोधनाच्या माध्यमातून तरुणांना सुवर्णसंधी देण्यात येणार आहे.

विशेष पाहुणेः देशभरातील तरुण उद्योजक, शेतकरी, कारागीर आणि विविध योजनांचे लाभार्थी असे सुमारे ५,००० विशेष पाहुणे या सोहळ्यात उपस्थित राहतील.

विशेष सजावट व पुष्पवृष्टीः भारतीय वायुदलाचे एमआय-१७ हेलिकॉप्टर 'वंदे मातरम्'च्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ विशेष फलक घेऊन उड्डाण करेल आणि उपस्थितांवर पुष्पवृष्टी करणार आहे. तसेच एनसीसीचे २,५०० विद्यार्थी मानवी साखळीद्वारे 'वंदे मातरम्'ची प्रतिकृती साकारतील.

नवा कायदाः नुकतेच संसदेत 'राष्ट्रीय सन्मानाचा अवमान प्रतिबंधक (सुधारणा) विधेयक, २०२६' मंजूर करून राष्ट्रीय गीताला (वंदे मातरम) राष्ट्रगीताच्या बरोबरीचा दर्जा आणि कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे.

– ९५६१५९४३०६

# गॉल कसोटी: ध्रुव जुरेल की सर्फराज खान? भारतीय संघापुढील निवडपेच

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

उपखंडातील कसोटी क्रिकेटचा विचार केला, तर श्रीलंकेतील गॉल हे मैदान नेहमीच फिरकी गोलंदाजांचे नंदनवन मानले जाते. अशा फिरकीला पोषक आणि आव्हानात्मक खेळपट्टीवर जेव्हा भारतीय संघ मैदानात उतरतो, तेव्हा अंतिम अकरा खेळाडूंची निवड करणे हे कर्णधार आणि संघ व्यवस्थापनासाठी मोठे आव्हान ठरते. सध्या अशाच एका जागेसाठी दोन युवा आणि अत्यंत प्रतिभावान फलंदाजांमध्ये चुरस पाहायला मिळत आहे – ध्रुव जुरेल की सर्फराज खान ? दोघांनीही आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले आहे, मात्र गॉलच्या टर्निंग ट्रॅकवर कोणाला संधी मिळावी, यावर क्रिकेट वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

**सर्फराज खानः फिरकीचा 'सुलतान' आणि आक्रमक शैली**

सर्फराज खानचा विचार केला, तर देशांतर्गत क्रिकेटमध्ये आणि विशेषतः रणजी करंडकात धावांचे डोंगर रचून त्याने भारतीय संघात आपले स्थान पक्के केले आहे. सर्फराज हा फिरकीपटूंविरुद्ध देशातील सर्वोत्तम खेळणाऱ्या फलंदाजांपैकी एक मानला जातो. स्वीप, रिव्हर्स स्वीप आणि पॅडल स्वीप ही त्याची प्रमुख अस्त्रे आहेत. गॉलच्या खेळपट्टीवर चेंडू पहिल्या



दिवसापासून वळू लागतो, अशा वेळी फिरकीपटूंचा जम बसू न देता त्यांच्यावर प्रतिआक्रमण करण्यासाठी सर्फराजसारखा फलंदाज अत्यंत घातक ठरू शकतो. क्रीजवर जम बसल्यानंतर डावाला वेग देणे आणि मोठी खेळी उभारणे ही त्याची सर्वात मोठी ताकद आहे.

**ध्रुव जुरेलः संयम, तंत्र आणि उपयुक्तता**

दुसऱ्या बाजूला, ध्रुव जुरेलने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करतानाच दाखवलेला संयम आणि चोख तंत्र भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या लक्षात आहे. जुरेलकडे केवळ आक्रमकता नाही, तर कठीण परिस्थितीत विकेट टिकवून ठेवण्याची आणि शेपूट सांभाळत धावा काढण्याची जबरदस्त क्षमता आहे. फिरकीविरुद्ध त्याचे पाय हलके हलतात आणि बचावात्मक तंत्र अतिशय मजबूत आहे. सातव्या क्रमांकावर येऊन संघाला संकटातून बाहेर काढणे आणि शेवटच्या फलंदाजांसोबत भागीदारी रचणे यात जुरेलचा हातखंडा आहे.

**दोघांमधील फरक आणि रणनीती**

दोन्ही खेळाडूंची खेळण्याची पद्धत एकमेकांपासून वेगळी आहे. सर्फराज खान फिरकीविरुद्ध आक्रमक भूमिका घेऊन मधल्या फळीत धावगती वाढवण्यात पटाईत आहे, तर ध्रुव जुरेल पारंपरिक तंत्राचा वापर करत परिस्थितीनुसार चेंडू रोखून धरण्यात आणि डावाला स्थैर्य देण्यात सक्षम आहे.

गॉलच्या खेळपट्टीवर फिरकीपटूंविरुद्ध केवळ बचाव करून चालत नाही, तर धावफलक हलवत ठेवणेही तितकेच गरजेचे असते. त्यामुळे जर भारतीय संघाला मधल्या फळीत अधिक आक्रमकता हवी असेल, तर सर्फराज खान हा नैसर्गिक पर्याय ठरतो. मात्र, वरच्या फळीच्या पडझडीनंतर डाव सावरून लोअर-ऑर्डरला सोबत घेऊन जाणारा भरवशाचा फलंदाज हवा असेल, तर ध्रुव जुरेल आघाडीवर राहू शकतो.

**निष्कर्ष**

ही स्पर्धा कोणत्याही एका खेळाडूच्या क्षमतेवर नसून सामन्याच्या रणनीतीवर अवलंबून आहे. गॉलची फिरकी घेणारी खेळपट्टी पाहता, फिरकीपटूंवर दबाव टाकण्याची सर्फराजची शैली भारतासाठी उपयुक्त ठरू शकते. त्याच वेळी जुरेलची उपयुक्तताही दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे या दोघांपैकी कोणाची निवड करायची, हे संघ व्यवस्थापनासमोरील एक अत्यंत आव्हानात्मक पण सकारात्मक कोडे ठरले आहे.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# राज्य व केंद्र सरकारच्या सहकार्याने शहराचा विकास

## महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते मनपा मुख्यालयात ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाचा विकास मोठ्या गतीने होत असून केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने नागपूर शहराचा विकास सुद्धा वेगाने होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या मदतीमुळे शहरातील विकासाचा अनुशेष झपाट्याने कमी होत असल्याचे प्रतिपादन महापौर निता ठाकरे यांनी स्वातंत्र्यदिन समारंभात केले. देशाचा ८० स्वातंत्र्य दिन समारंभ शनिवारी मनपा मुख्यालयाच्या हिरवळीवर पार पडला. महापौर निता ठाकरे यांनी ध्वजारोहण केले. यानंतर अग्निशमन दलाच्या परेडचे निरीक्षण केले तसेच जवानांच्या प्लाटून कडून मानवंदना स्वीकारली. प्लाटूनचे नेतृत्व भगवान वाघ, डी.पी चौहान व पी.एन कावडकर यांनी केले.
यावेळी व्यासपीठावर उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मरुगानंथम एम., अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, मंगळवारी झोनच्या सभापती सीमा डवरे, नगरसेविका सुषमा चौधरी, योगिता तेलंग, माधुरी टेकाम, नगरसेविका अभीरुची राजगिरे, पूजा पाठक, नगरसेवक अभिजीत झा, नगरसेवक अतुल कोटेचा, मुख्य वित्त व लेखा अधिकारी सदाशिव शेळके उपस्थित होते.

**विकासाच्या दिशेने मार्गक्रमण : महापौर**

यावेळी बोलताना महापौर निता ठाकरे यांनी देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी आपल्या पूर्वजांनी अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या आहेत. तेव्हा कोणतेही अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नव्हते. जय हिंद व भारत माता की जय म्हणणे सुद्धा गुन्हा ठरत होता. या




स्थितीत हे मोलाने मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी मोठी आहे. यासाठी आपल्या प्रत्येकाला चोखपणे काम करण्याची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यानंतर आपण लोकशाही स्वीकारली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात विकासाला गती मिळाली आहे. राज्यात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी व पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात राज्याचा विकास होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने शहराचा विकास होत आहे. काही वर्षांपर्यंत विकासाचा अनुशेष शिल्लक राहत होता. ही स्थिती आता बदलली आहे.
सफाई कामगारांपासून तर गोरगरीबांच्या विकासाची गरज लक्षात घेऊन योजना आखल्या जात आहे. त्यामुळे आपल्या मनात देशभक्तीची ज्योत टिकवून ठेवल्यास विकासाच्या मार्गावर आपण अधिक ताकदीने मार्गक्रमण करू, असेही श्रीमती निता ठाकरे यांनी सांगितले.

**कर वसुलीसाठी पॉस मशीनचे वितरण**

मालमत्ता कर वसुलीमध्ये सुगमत आणण्यासाठी तसेच करदात्यांना त्वरित कर भरता यावा, यासाठी विभागातील कर संग्राहकांना पॉस (पॉईंट ऑफ सेल) मशीनचे वितरण महापौर निता ठाकरे यांच्याहस्ते झाले. स्थायी समितीच्या सभापती श्रीमती शिवानी दाणी-वखरे यांनी कर संग्राहकांना पॉस मशीन देण्याची संकल्पना मांडली होती. या संकल्पनेतून मालमत्ता कर विभागाने १०० पॉस मशीनची खरेदी केली आहे. या पॉस मशीन बद्दलची माहिती अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी दिली.
अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी पुढे सांगितले की, पीओएस मशीन वितरणामागील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे मालमत्ता कराची मागणी देयके वितरित करताना ज्या मालमत्ताधारकांना त्यांचा मालमत्ता कर तत्काळ जमा करावयाचा आहे, त्यांना त्याच ठिकाणी डिजिटल पद्धतीने मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. या सुविधेमुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच इतर नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासणार नाही, कर भरण्याच प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक होण्यास मदत होईल.

**संपूर्ण वंदे मातरम्‌चे गायन**

वंदे मातरम् गीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल केंद्र सरकारने शासकीय कार्यक्रमात वंदे मातरम्‌चे सर्व कडवे गाण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्देशांचे पालन करीत स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात संपूर्ण वंदे मातरम्‌चे गायन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी व शुभांगी पोहरे यांनी केले. आभार मनीष सोनी यांनी मानले.

थोडक्यात

## मराठा कुणबीकरणा विरोधात ओबीसी मुक्ती मोर्चा न्यायालयात जाणार, ओबीसीची बाजू कोणीच राखतांना दिसत नाही



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमुळे महाराष्ट्रातील ओबीसींच्या संवैधानिक आरक्षणाच्या चौकटीवर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोचार्चे मुख्य संयोजक नितीन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत केला. या निर्णया विरोधात मोर्चा नव्याने न्यायालयात जाणार असल्याचे पत्र परिषदेत पत्रकारांना सांगितले. मराठा व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने स्वतंत्र यंत्रणा व विविध परिपत्रके काढल्याने ओबीसींच्या हक्कांवर गदा येत असल्याचा दावा चौधरी यांनी केला. माजी न्यायमूर्ती संदिप शिंदे समितीच्या अहवालातील आकडेवारीचा दाखला देत कुणबी प्रमाणपत्रांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारकडून मराठा आंदोलकांची समजूत काढण्याचे प्रयत्न होत असताना ओबीसींच्या हक्कांची मात्र दखल घेतली जात नाही.
मराठा समाजाचे मोठ्या प्रमाणावर कुणबीकरण झाल्यास पारंपरिक ओबीसी समाजातील छोट्या जातींच्या आरक्षण व राजकीय प्रतिनिधित्वाच्या संधी कमी होतील, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. ओबीसी आरक्षणाची संवैधानिक चौकट अबाधित ठेवावी आणि कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या प्रक्रियेचा फेरविचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या प्रश्नावर राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाच्या वतीने लवकरच न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले. पत्रपरिषदेला भूषण दडवे, गीताताई महाले, प्रभाकर फुलबांधे, गुणवंत देशकर, वासुदेवराव महाले आदी उपस्थित होते.

## आजनी येथे विविध ठिकाणी ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
८० व्या भारतीय स्वातंत्र दिनानिमित्त कामठी तालुक्यातील आजनी येथे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यासह सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन शाळेतील मुख्याध्यापिका ललिता आंडे, शिक्षक जित बुंदेले, तसेच शिक्षिका सीमा मेश्राम, नलिनी धकाते, शीला जैन व इतर कर्मचाऱ्यांनी केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा ललिता ठाकरे यांच्या हस्ते शाळेतील ध्वजारोहण करण्यात आले तर संचालन जित बुंदेले सरांनी केले. ग्राम पंचायत समितीच्या प्रांगणातील ध्वजारोहण उपसरपंच तसेच सरपंच पदाचा अधिभार सांभाळणारे हेमराज भाऊ दवंडे यांच्या हस्ते करण्यात आले तर छत्रपती शिवाजी महाराज उद्यान परिसरातील ध्वजारोहण सामाजिक कार्यकर्ते बळवंतराव नेऊलकर यांच्या हस्ते करण्यात आले.
स्वतंत्रता दिवसानिमित्त गावात उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. ठिकठिकाणी झालेल्या ध्वजारोहण समारोहात सचिव आतिश देशभ्रतार, पोलिस पाटील बळवंतराव रडके, भगवंतराव रडके, माजी सरपंच तुकाराम लायबर, संजय जीवतोडे, प्रभाकर देशमुख, तुषार रडके, ग्राम पंचायत सदस्य गणपत झलके, शंकर भोयर, हेमलता उकेबोंदरे, निकिता हेटे, श्वेता चौधरी,अनिकेत इंगोले,कर्मचारी प्रिया चिपडे, बिंदू गणवीर, राजू लायबर, भीमराव नागोसे, नारायण वैद्य, शुभम तटमेले, योगेश नागापुरे यांच्यासह कृष्णा दवंडे, दिनेश बडगे, रामदास भोयर, डोमाजी पाटील, सुधाकर विघे, बंडू भोयर,अरुण भिवगडे, केशव भिवगडे, बाबुराव धंदरे, नामदेव ढोक, दिवाकर नागोसे, रवी मानकर, पुंजाराम चव्हाळे, धर्मराज येलेकर, सोमाजी नागोसे, रेणुका हरणे, दयावंती उकेबोंदरे, सूर्यभान हेटे, कृष्णा नारनवरे, गजेंद्र ढोक, जगदीश शाहू, शेषराव बोंबाटे, चुडामण वाणी, जयराम चौधरी, नत्थु गिऱ्हे, मनोहर हेटे, सर्व अंगणवाडी कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि गावकरी उपस्थित होते.

## उत्कृष्ट अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) पुरस्कार राजेश खवले यांना प्रदान



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांना उत्कृष्ट अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) संवर्गातील उल्लेखनीय कार्याबद्दल आज पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी खासदार शामकुमार बर्वे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महानगरपालिका आयुक्त विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. राजेश खवले यांनी महसूल प्रशासनाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

## चिखलाबोडी शाळेत उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा

### विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्कार व इंग्रजी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलाबोडी येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहण करण्यात आले.
यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मनोजकुमार वंजारी, निहारवाणी ग्रामपंचायत सदस्य रोशन गिऱ्हेपुंजे, व्यवस्थापन समितीचे सदस्य-सदस्या, विविध समित्यांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, गावातील मान्यवर नागरिक, युवा वर्ग तसेच महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर नृत्याविष्कार तसेच इंग्रजी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थित श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थित मान्यवरांनी उत्स्फूर्त दाद देत त्यांचे कौतुक केले.
कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक रामटेके यांनी केली. त्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच विद्यार्थ्यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी जबाबदार नागरिक म्हणून घडण्याचे आवाहन केले.
यावेळी सामाजिक कार्यकर्त्या कोमल वैरागडे यांनी स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान तसेच वर्तमान काळातील महिलांची सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील स्थिती याविषयी प्रभावी मार्गदर्शन केले. महिलांच्या स्वातंत्र्य, समानता व सक्षमीकरणाचे



महत्त्व अधोरेखित करत त्यांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश लांजेवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन केले.
यावेळी ज्येष्ठ नागरिक हरिश्चंद्र लांजेवार यांनी पूर्वीची शाळा आणि आजची शाळा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. पूर्वीच्या काळातील शाळेची परिस्थिती, शिक्षणपद्धती आणि आजच्या आधुनिक शैक्षणिक सुविधांमध्ये झालेला सकारात्मक बदल त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. तसेच गावातील पालकांनी आपल्या पाल्यांना गावातील जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश देऊन शाळेच्या शैक्षणिक विकासाला सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन शाळेतील शिक्षकवृंदाने केले. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षिका भाग्यश्री बोरकर यांनी उपस्थित मान्यवर, पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी व महिला भगिनी यांचे आभार मानले.
विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, ग्रामस्थांची लक्षणीय उपस्थिती आणि देशभक्तीमय वातावरणामुळे चिखलाबोडी येथील स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात व अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

## श्री संत भाकरे महाराज विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात, माजी विद्यार्थ्यांकडून 'आरओ'ची अनोखी भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूरद्वारा संचालित श्री संत भाकरे महाराज विद्यालय, मेंढला येथे ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात, जल्लोषपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासह विद्यार्थ्यांच्या विविध देशभक्तीपर उपक्रमांनी विद्यालय परिसर भारावून गेला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, शिस्त आणि व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला.
कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे पालक संचालक रमेशबाबू चरपे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्यगीत आणि वंदे मातरम्‌चे सामूहिक गायन केले. देशभक्तीपर गीतांनी वातावरणात उत्साह निर्माण केला. देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेली कवायत विशेष आकर्षण ठरली.
यावेळी देशभक्तीपर भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी भाषणातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, स्वातंत्र्याचे महत्त्व, राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका, सामाजिक एकता आणि देशाच्या विकासासाठी नागरिकांची जबाबदारी यावर विचार मांडले. नशामुक्ती अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची तसेच समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी जनजागृती करण्याची प्रतिज्ञा घेतली.
विद्यार्थ्यांच्या विविध सादरीकरणातून देशासाठी त्याग करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्य हा केवळ उत्सव नसून



देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडण्याचा संकल्प करण्याचा दिवस असल्याचा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि देशभक्तीपर सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.
कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप बनाईत, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर दंढारे, मेंढला ग्रामपंचायत सदस्य रवी कनेरे, राजेश शर्मा, ज्ञानेश्वर सावरकर, जगदीश सेंबेकर, पांडुरंग चरपे, मुख्याध्यापक राजेश देशमुख यांच्यासह शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.
दरम्यान, स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सन २००२-०३ चे माजी विद्यार्थी एकत्र आले आणि त्यांनी आपल्या जुन्या शाळेशी असलेले ऋणानुबंध पुन्हा दृढ केले. विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने माजी विद्यार्थ्यांनी श्री संत भाकरे महाराज विद्यालयाला आरओ फिल्टरसह पाण्याची मशीन भेट दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मोठी सुविधा उपलब्ध होणार असून माजी विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी कौतुक केले.
या पाण्याच्या मशीनचे उद्घाटन संस्थेचे पालक संचालक रमेशबाबू चरपे यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेत शिक्षण घेतल्यानंतर अनेक वर्षांनी पुन्हा एकत्र येत माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या गरजा ओळखून केलेले हे योगदान विशेष ठरले. शिक्षण घेतलेल्या शाळेचे ऋण जपत विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून केलेला हा उपक्रम इतर माजी विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी सांगितले.
यावेळी सन २००२-०३ चे माजी विद्यार्थी प्रविण पोटपिटे, हर्षल दंढारे, टेंभेकर, ठाकरे, सावरकर आदी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी भविष्यातही शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सहकार्य करण्याचा मानस व्यक्त केला.
शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच सामाजिक जाणीवा निर्माण करणारे केंद्र आहे. त्यामुळे अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजण्यास मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक राजेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. देशभक्तीचा संदेश, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि माजी विद्यार्थ्यांच्या सामाजिक योगदानामुळे श्री संत भाकरे महाराज विद्यालयातील स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## गांवदेवी विद्या मंदिर, डोंबिवली पश्चिम शाळेत भारताचा ८० वा स्वातंत्रदिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, डोंबिवली**
भारत देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिवस डोंबिवली पश्चिम गांवदेवी विद्या मंदिर शाळेत मोठया उत्साहाने पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. केशवजी भोईर उपस्थित होते. तर दीपेश म्हात्रे ( नगरसेवक कल्याण डोंबिवली महानगरपालिका ) आणि जयेश म्हात्रे ( नगरसेवक कल्याण डोंबिवली महानगरपालिका , आयुष्यमान जी. टी. शिंदे, (अध्यक्ष बोधिसत्व चारिटी ट्रस्ट, वैशालीताई भोईर (संचालिका गावदेवी विद्यामंदिर), मनीषा बहेन प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय डोंबिवली केंद्र, सेवेकरी मधुकर भोईर विश्वस्त, बारकू घावट सर माजी मुख्याध्यापक गांवदेवी विद्या मंदिर यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करून महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यसनमुक्त महाराष्ट्र हा संदेश विद्यार्थी पर्यत पोहचवून विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. प्रमुख पाहुणे दीपेश म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच मनीषा बेहन, घावट आणि अध्यक्ष केशव भोईर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्वातंत्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची "वंदे मातरम" या गीताने सांगता करण्यात आली.

थोडक्यात

## अमली पदार्थमुक्त विद्यार्थी घडविण्यासाठी पारशिवणी पोलिसांचा अभिनव उपक्रम

### स्वातंत्र्यदिनानिमित्त तालुक्यातील शाळा, कॉन्व्हेंट व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली अमली पदार्थविरोधी शासनाची शपथ



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून दूर ठेवण्यासाठी आणि अमली पदार्थमुक्त समाजाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने पोलीस स्टेशन पारशिवणी यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. पोलीस स्टेशन पारशिवणीच्या हद्दीतील विविध शाळा, कॉन्व्हेंट व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी अमली पदार्थविरोधी शासनाची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांचे सेवन करणार नाही, तसेच आपल्या मित्र-मैत्रिणींना व समाजातील इतर व्यक्तींनाही अमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती करू, असा संकल्प केला.

या उपक्रमासाठी पोलीस स्टेशन पारशिवणीच्या वतीने सर्व शैक्षणिक संस्थांना आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शाळा, शिक्षक, विद्यार्थी तसेच पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात तिरंगा ध्वज, राष्ट्रभक्ती आणि देशप्रेमासोबतच अमली पदार्थांना नकार झ्र उज्ज्वल भविष्याला होकार हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. या सामाजिक उपक्रमाला गटविकास अधिकारी सुभाष जाधव तसेच गटशिक्षणाधिकारी श्री. कोडापे यांनी विशेष सहकार्य व योगदान दिले. शिक्षण विभाग आणि पोलीस विभाग यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविरोधात जागरूकता निर्माण करण्याचा हा उपक्रम प्रभावी ठरला. पोलीस स्टेशन पारशिवणीचे ठाणेदार किशोर शेरकी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे स्थानिक नागरिक, पालक, शिक्षक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असून, अमली पदार्थमुक्त पारशिवणीसाठी पोलीस आणि नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## स्वातंत्र्य दिनी जलालखेड्यात १०० टर्मिनालिया वृक्षांची लागवड

### ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून महामार्ग परिसराला मिळणार हिरवाईचे नवे रूप




**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ग्रामपंचायत जलालखेडा यांच्या वतीने गावाच्या मध्यभागी असलेल्या राष्ट्रीय राज्य महामार्ग क्र. ३५३ जे परिसरात विशेष वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत आमदार चरणसिंगजी ठाकूर यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या टर्मिनालिया जातीच्या १०० झाडांची लागवड करण्यात आली. गावाच्या परिसरात वाढत्या तापमानाचा परिणाम कमी करण्यासोबतच पर्यावरणाचा समतोल राखणे, प्रदूषण कमी करणे आणि आगामी पिढ्यांसाठी हिरवाई जपणे, या उद्देशाने ग्रामपंचायतीने वृक्षारोपणाला प्राधान्य दिले आहे. महामार्गालगत लावण्यात आलेली ही झाडे भविष्यात वाढल्यानंतर परिसराच्या सौंदर्यात भर घालण्याबरोबरच प्रवाशांना आणि नागरिकांना सावली देण्यासही उपयुक्त ठरणार आहेत.

'एक झाड लावा, पर्यावरण वाचवा' हा संदेश जनमानसात रुजविण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पुढील काळातही वृक्षारोपणाची मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. केवळ वृक्ष लागवड न करता लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करण्यावरही भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाला ग्रामपंचायत जलालखेड्याचे प्रशासक मयूर सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश बारापात्रे, अधीर चौधरी, मयूर दंढारे, रुबीनाताई मिर्झा, रजनीताई कळंबे, अर्चनाताई लिखार, मानवता सेवा संघ सोमेश्वरम्‍ यांच्या अध्यक्षा प्रतिक्षा निलेश दंढारे, तसेच गावातील मान्यवर गणेशजी खंडेलवाल, गौतम पंचभाई, योगेश चौरे, अनिल इंगोले, हुरबेग मिर्झा, शंकर पवार, गणेश कळंबे, वंदनाताई ठाकूर, सुरेखाताई जीवनकर, सागर सावरकर, प्रविण राजपुरोहित यांच्यासह ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपण मोहिमेसाठी प्रतापजी वानखेडे व अनुपजी निकम यांचे विशेष सहकार्य लाभले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. जलालखेडा परिसर अधिकाधिक हिरवागार करण्यासाठी भविष्यातही अशा उपक्रमांना चालना देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## विदर्भ साहित्य संघात स्वातंत्र्यदिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाच्या सीताबर्डी येथील कार्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष बाळ कुलकर्णी आणि सरचिटणीस विलास मानेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य अमर कुलकर्णी, शुभदा फडणवीस, अजेय गंपावार, स्वाती मोहरीर यांच्यासह पराग घोंगे, वसंत वाहोकर, मेघना वाहोकर, आसावरी गडेकर, प्रकाश एदलाबादकर, नरेश सब्जीवाले, माधुरी वाडिभस्मे, मोनाली पोहरे, प्रदीप मोहिते, नभा आणि कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# 'जयोस्तुते'मधून झाला देशभक्तीमय जागर

## स्वातंत्र्यदिनानिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे विश्वास आयोजन





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित, आविष्कार कला अकॅडमी व सृजन ऑडिओज, नागपूर प्रस्तुत स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्तीपर गीत व नृत्यावर आधारित 'जयोस्तुते' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे शनिवारी बी.आर.ए. मुंडले, प्लॅटिनम ज्युबिली सभागृह.येथे आयोजन करण्यात आले.

सुप्रसिद्ध शेफ विष्णु मनोहर, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, सांस्कृतिक समितीचे अधिकारी रुपेश गायधने, आशुतोष अलोणी यांच्यासह सांस्कृतिक संचालनालय, नागपूरचे सहायक संचालक संदीप शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे संयोजक अमर कुळकर्णी, संगीत नियोजन आनंद मास्टे व समन्वय गजानन रानडे यांनी केले.

अमर कुलकर्णी, अक्षय चारभाई, अमेय वैद्य, सायली मास्टे, मंजिरी वैद्य-अय्यर आणि आकांक्षा चारभाई यांनी हिंदुस्थान की कहानी सुनी, वंदे मातरम्, वेद मंत्रातून आम्हा, शूर आम्ही सरदार, जननी जन्मभूमी, मेरा रंग दे बसंती चोला, ये वतन ऐ वतन, ताकत वतन की हमसे है, ये मेरे वतन के लोगो, जितनी मौत ना, सुनो गौर से, निगाहों से पावन युग में आणि मिले सुर मेरा तुम्हारा आदी गीतांनी वातावरण भारावून गेले. जन्मभूमिस्तुते, हम करें राष्ट्र आराधन, मेरे देश की धरती आणि ये देश है वीर जवानों का या गीतांवर सुरेख नृत्य सादर करण्यात आले. तसेच चाणक्य, होळकर आणि वीर दुर्गादास यांसारख्या नाट्यप्रयोगांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली.

गायकांना आनंद मास्टे, अमर शेंडे, नरेंद्र कडवे, प्रमोद बावणे, विशाल दहासहस्त्र, गजानन रानडे, विक्रम जोशी आणि दीपक कांबळे यांनी वाद्यवृंदावर साथ दिली. आशुतोष अडोणी व स्मिता खनगई यांनी सूत्रसंचालन केले. नाट्यसंयोजन सारंग मास्टे व अभिषेक बेल्लारवार, नृत्य संयोजन श्रीकांत धबडगांवकर, नेपथ्य राजेश अमिन यांचे होते. मनोज पिदडी, शंकर, मॉन्टी सोनुने यांचेही सहकार्य लाभले.

## अमरनगरमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळ, नागपूर आणि अमरनगर सुधार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचा ८० वा, स्वातंत्र्यदिन सोहळा शनिवार, १५ ऑगस्ट रोजी अमरनगर येथील हनुमान मंदिर परिसरात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभाग क्रमांक ३ चे नगरसेवक बाबाराव तायडे होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी राष्ट्रगीत सादर करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

या कार्यक्रमात नगरसेवक बाबारावजी तायडे, मंडळाचे अध्यक्ष देविदास आगरकर, प्रवीण ठाकरे आणि डॉ. राजेश कुऱ्हाडे यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व व नागरिकांची सामाजिक जबाबदारी यावरील मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी गणपतराव निंबाळकर यांचा वाढदिवसही उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रवीण धनजोडे, आशिष निंबाळकर, वसंतराव इझनकर, रमेश जिल्हारे, भोयर, मंचलवार, वरगट, बांगडे, धवल, हिरुळकर, रासेकर, लांजेवार, कांबळे, दुधे, सौ. रासेकर, सौ. आगरकर, सौ. निंबाळकर आणि सौ. गौरखेडे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला अमरनगर परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीपर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## नानव्हा ग्रामपंचायतीत गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण

### शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी ग्रामपंचायतीचा प्रेरणादायी उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त नानव्हा ग्रामपंचायत कार्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव व्हावा तसेच गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने ग्रामपंचायतीने हा स्तुत्य उपक्रम राबविला. यावर्षी ध्वजारोहणाचा मान गुणवंत विद्यार्थी त्रिदास येजेन्द्रपाल कटरे आणि कु. दिक्षा युवराज सूर्यवंशी यांना संयुक्तपणे देण्यात आला. गावातील तरुण पिढीला शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची प्रेरणा मिळावी, या हेतूने ग्रामपंचायतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा निर्णय घेतला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गौरीशंकर बिसेन होते. यावेळी उपसरपंच भाग्यश्वरी कटरे, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत टेभुरकर, सोमेश्वर वरखडे, विजय शरणागत, अशोक कटरे, मुनीबाई ठाकरे, उषा हरीणखेडे, सुनिता भोंडे, उर्मिला भंडारी, तसेच तमुस अध्यक्ष गोविंदभाऊ कटरे, पोलीस पाटील रोशन सूर्यवंशी, राजेंद्र कुर्वे, माजी सरपंच सोमाजी कटरे, मुख्याध्यापक पुरण नागपूरे, माजी मुख्याध्यापक उदेलाल बिसेन, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र कटरे यांच्यासह शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सामूहिक वन हक्क समितीचे पदाधिकारी, संयुक्त वनसंरक्षण समितीचे पदाधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर जिल्हा परिषद शाळेत देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण, विद्यार्थ्यांची भाषणे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच गौरीशंकर बिसेन म्हणाले, गुणवंत विद्यार्थ्यांना पुढे आणल्याशिवाय गावाचा खरा विकास होऊ शकत नाही. शिक्षण हेच खरे सामर्थ्य असून नानव्हा गाव शैक्षणिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. उपसरपंच भाग्यश्वरी कटरे यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेरीस राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पाणीपुरवठा कर्मचारी राकेश भंडारी, परिचर देवेंद्र शेंडे, संगणक ऑपरेटर हेमेन्द्र पटले आणि रोजगार सेवक खेमराज बिसेन यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कारगिल चौक, गडचिरोली येथे स्वातंत्र्य दिन

### ध्वजारोहण, देशभक्तीपर नृत्य व विद्यार्थ्यांच्या भाषणांनी रंगला सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोली शहरातील कारगिल स्मारक, कारगिल चौक येथे कारगिल चौक दुर्गा उत्सव मंडळ व कारगिल स्मारक समितीच्या वतीने भारताचा ८०वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात कारगील स्मारकचे संस्थापक तथा ज्येष्ठ पत्रकार उदय धकाते यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताने वातावरण भारावून गेले.

कार्यक्रमाला श्री गुरुदेव उच्च प्राथमिक शाळा, नगर परिषद राजीव गांधी प्राथमिक शाळा तसेच विद्याभारती कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली येथील शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होऊन राष्ट्रध्वजला मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सामूहिक नृत्य तसेच प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक तुषार निकुरे व मीरा मडावी यांनी केले.

यावेळी मंडळाचे सचिव प्रकाश भांडेकर, उपाध्यक्ष रेवनाथ गोवर्धन, प्रकाश धकाते, मार्गदर्शक सुनील देशमुख, डॉ. नरेश बिडकर, ॲड. विनीत लोखंडे, संजय गद्देवार, जि. के. बारसिंगे, मोबीन सय्यद, अजय पवार, सुचिता धकाते, नीलिमा देशमुख, वनिता भांडेकर, लक्ष्मी हजारे- कोसरे, प्रमिला कुंभारे, विजय लाकडे, संगीता धकाते, महेंद्र मसराम, रुपेश सलामे, बाळू मोटघरे, रामा हजारे, महादेव कांबळे, गजानन भारसागडे, आदित्य चिचघरे, अविनाश शेंडे, गणेश मेश्राम, यांच्यासह शहरातील गणमान्य नागरिक, महिला, युवक, विद्यार्थी व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत ठेवण्यासह चोख बंदोबस्त ठेवत कार्यक्रमासाठी उत्तम सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कारगिल स्मारकाच्या साक्षीने साजऱ्या झालेल्या या स्वातंत्र्य दिन सोहळ्यामुळे परिसरात देशभक्ती आणि राष्ट्रप्रेमाचे वातावरण निर्माण झाले.

## डॉ. किरण मोरे चव्हाण यांचा 'समाजरत्न' पुरस्काराने सन्मान



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

मानवाधिकार रक्षक मंच, नागपूर यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट २०२६ रोजी आकाशवाणी चौक येथील ई. एल. सी. चर्च परिसरात ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मानवाधिकार रक्षक मंचचे ऑल इंडिया व्हॉइस प्रेसिडेंट मा. सॅम्युअल तिमुथी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत गायनानंतर भारत माता की जयच्या जयघोषात वृक्षारोपण करण्यात आले.

यानंतर आयोजित कार्यक्रमात सामाजिक, साहित्यिक, वैद्यकीय तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा समाजरत्न पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. यामध्ये डॉ. दिनेश जीपकाटे, डॉ. राजाभाऊ खोब्रागडे, कुलुथुगन, डॉ. वंदना बेंजामिन, रवी नायडू, कैलास येरकर, सुनंदा इंगळे यांच्यासह सालेकसा येथील कवयित्री डॉ. किरण मोरे चव्हाण यांनाही त्यांच्या सामाजिक व साहित्यिक कार्याची दखल घेत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. किरण मोरे चव्हाण यांच्या या सन्मानामुळे सालेकसा तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागपूर जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड, जिल्हा महिला अध्यक्ष चेतना दुबे, ॲड. प्रकाश बेंजामिन, आशिष सिंग, नागपूर शहराध्यक्ष दीपावली खांडेकर आणि जिल्हा सचिव अश्विन गायकवाड यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष सिंग यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. प्रकाश बेंजामिन यांनी केले. कार्यक्रमास रूपाताई गायकवाड, अमोल गायकवाड, नायडू सर यांच्यासह अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले.

## सालेकसा पोलिस स्टेशनमध्ये स्वातंत्र्य दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सालेकसा पोलीस स्टेशनच्या प्रांगणात देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सकाळी ७ वाजून ५ मिनिटांनी सालेकसा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. रवि नागोसे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सालेकसा शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनीही कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून स्वातंत्र्य दिनाचा आनंद साजरा केला.

स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमानिमित्त पोलीस स्टेशन परिसरात उत्साहाचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून त्यांच्या त्यागाला अभिवादन केले. देशाची एकता, अखंडता आणि शांतता कायम राखण्यासाठी सर्वांनी आपापली जबाबदारी पार पाडावी, असा संदेशही यावेळी देण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच प्रतिष्ठित नागरिकांसाठी चहा व नाश्त्याची सुंदर व्यवस्था करण्यात आली होती. सर्वांनी आपुलकीने चहा-नाश्त्याचा आस्वाद घेत कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

दैनिक सिंहवाणी वृत्त

Epaper : epaper.sinhvani.com

दिनांक : सोमवार, १७ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## गट ग्रामपंचायत भांडेवाडी येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

गट ग्रामपंचायत भांडेवाडी येथे सरपंचा मंगला विष्णु देशमुख यांनी घेतलेल्या निर्णयानुसार दरवर्षी गट ग्रामपंचायत भांडेवाडी अंतर्गत येत असलेल्या भांडेवाडी, शिवाडौली, सावंगी या तिन्ही गावातून जो मुलगा किंवा मुलगी वर्ग बारावीमध्ये सर्वात जास्त टक्केवारी घेईल , तो मुलगा किंवा मुलगी ग्रामपंचायत भांडेवाडी येथील झेंडावंदन करण्याचे मानकरी ठरेल. या वर्षाची मानकरी सावंगी येथील कु. इश्या नारायण हुड या मुलीने नवोदय विद्यालय खैरी येथून ८४% मार्क घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यामुळे कु. इश्या ला झेंडावंदन करण्याचे मान मिळाला व तिच्या ग्रामपंचायततर्फे शाल, श्रीफळ व प्रोत्साहन बक्षीस देऊन सत्कार करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळा भांडेवाडी येथील विद्यार्थ्यांनी १५ ऑगस्ट या विषयावर भाषणाच्या माध्यमातून सविस्तर माहिती दिली.तसेच जि.प.शाळा भांडेवाडी येथील स्कॉलरशिपच्या परीक्षेत दोन मुलीने मौदा तालुक्यात सर्वात जास्त मार्क घेऊन प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल सरपंचा मंगला विष्णू देशमुख यांनी त्या दोन्ही मुलीला पुष्पगुच्छ व स्कूल बॅग भेट देऊन त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाला ग्रा.प. सदस्य अंकुश वाघाडे, किसना वाढवे, अंजिरा राऊत, राहुल चौधरी, दामोदर वगारे, नितेश शेंडे, गौरीशंकर रामटेके, अरुण वाघाडे, मुख्याध्यापिका शितोडे, शिक्षिका तळेकर, वंदना चौधरी, शाळा समितीचे सदस्य गण व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाचेर येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा

**सरपंचा लुंबिनी महेश कलारे यांच्या हस्ते ध्वजारोहण, १० वी-१२वीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते गावात विविध ठिकाणी ध्वजारोहण**



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन चाचेर येथे मोठ्या उत्साहात, देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंचा लुंबिनी महेश कलारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर महात्मा गांधी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायत चाचेरचा गेल्या मागील ८ वर्षांपासूनचा एक सुंदर उपक्रम यावेळीही राबविण्यात आला. १५ ऑगस्टच्या निमित्ताने १० वी व १२वी च्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या मुला-मुलींच्या हस्ते गावातील विविध ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण करणारे १० वी २०२५ गुणवंत विद्यार्थी कु.अंजली अर्जुन घिवतोंडे प्रथम (९०%), कु.ऋतिका रविंद्र वानखडे द्वितीय (८८%) कु.लोकेश प्रवीण सावरकर तृतीय (७७.४०%), बारावीतील गुणवंत विद्यार्थी कु. भावेश बबलू बरबटे(७३%) प्रथम,कु. शीतल मनोहर लांजेवार (७१.१७%) द्वितीय, कु. वंशिका धमार्पाल गजभिये (७०%) तृतीय यांच्या हस्ते गावात विविध ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची प्रेरणा निर्माण होऊन चांगल्या मार्कांनी पास होऊन गाव व आई-वडिलांचे नाव उंचावण्याची भावना निर्माण झाली आहे.

चाचेर येथील पीएम श्री उच्च प्राथमिक शाळेतही ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषणे सादर केली. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्यगण शैलेश कोपरकर, प्रकाश वाकलपुडी, सुरेंद्र टेंबरे, योगेश निनावे, चंद्रकला धोटे, सुमन सोमकुवर, नलू दरवई, सविता जांभरे, रोशनी किरपान, ममता चौरे, मुख्याध्यापक अनिल राजहंस गडपायले, पदवीधर शिक्षक रवींद्र घुगे,परवीन शेख , सहाय्यक शिक्षक भारती साखरवाडे , संगीता बालकोटे, प्रिती खंगार,शिल्पा उकुडवे, रुचिला खंडाईत, नेहा निमजे, डॉ. दिनेश कोपरकर,सुरेश खंडाईत, डॉ. बाबा शेख, रामू खंडाईत,राकेश राऊत, विनोद कोपरकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जीवन सहारे, माजी अध्यक्ष किरण बरबटे, प्रकाश काळे, ज्ञानेश्वर नाकाडे, भोला बावनकुळे, राजेश हुमणे, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी व गावकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक अनिल गडपायले यांनी केली. सूत्रसंचालन रवींद्र घुगे यांनी केले तर आभार प्रदर्शन परवीन शेख यांनी मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वाडीच्या इंदिरा गांधी स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

जनकल्याण बहुउद्देशीय संस्था दत्तवाडी संचालित इंदिरा गांधी लोअर इंग्लीश स्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष गजानन तलमले, सचिव विजयाताई तलमले, मुख्याध्यापिका नितू खोब्रागडे, माजी मुख्याध्यापिका पुष्पाताई क्षीरसागर, आशा गीरडकर व पालक प्रतिनिधी हिरकणे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते व भाषणे सादर केली. तसेच थोर महापुरुष व क्रांतिकारकांच्या वेशभूषेत सहभागी होत स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाला उजाळा दिला. पुष्पाताई क्षीरसागर व आशा गीरडकर यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचे महत्त्व व नागरिकांची कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्ष गजानन तलमले यांनी विद्यार्थ्यांनी देशप्रेम व कर्तव्याची जाणीव कायम ठेवावी, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला रंगत आली.

# तिरंगे की शान में सजा हनुमान लोक जामसांवली धाम

**भक्ति के साथ गूंजा राष्ट्रप्रेम का जयघोष, स्वतंत्रता की ८०वीं वर्षगांठ पर श्री हनुमान जी महाराज का तिरंगा श्रृंगार बना आकर्षण, दो लाख श्रद्धालुओं ने किए दर्शन, सेल्फी प्वाइंट पर दिखा देशभक्ति का उत्साह, पूर्व सैनिकों ने भी की सराहना**





**दै. सिंहवणी वृत्त, जामसावली**

स्वतंत्रता दिवस की ८० वीं वर्षगांठ पर चमत्कारिक श्री हनुमान मंदिर हनुमान लोक जामसांवली में आस्था, भक्ति और राष्ट्रभक्ति का अद्भुत संगम देखने को मिला। तिरंगे के रंगों से सजा पूरा हनुमान लोक और श्री हनुमान जी महाराज का विशेष तिरंगा श्रृंगार श्रद्धालुओं के आकर्षण का प्रमुख केंद्र रहा। स्वतंत्रता दिवस के अवसर पर लगभग दो लाख श्रद्धालुओं ने जामसांवली धाम पहुंचकर श्री हनुमान जी महाराज के दर्शन किए।

**राष्ट्रगान के बाद गूंजा भारत माता का जयघोष**

स्वतंत्रता दिवस के अवसर पर सुबह की आरती के पश्चात मंदिर परिसर में श्रद्धालुओं की मौजूदगी में सामूहिक रूप से राष्ट्रगान जन गण मन किया गया। राष्ट्रगान के बाद भारत माता की जय और वंदे मातरम् के जयघोष से पूरा जामसांवली धाम गूंज उठा। भक्ति में लीन श्रद्धालुओं के बीच राष्ट्रप्रेम और देश के प्रति गौरव की भावना देखते ही बनी।

**तिरंगे के रंगों में सजा हनुमान लोक**

केसरिया, सफेद और हरे रंगों की आकर्षक सजावट से हनुमान लोक का स्वरूप मनमोहक नजर आया। श्री हनुमान जी महाराज का तिरंगा श्रृंगार श्रद्धालुओं के लिए विशेष आकर्षण बना रहा। शौर्य, साहस, सेवा और समर्पण के प्रतीक बजरंगबली के तिरंगा श्रृंगार ने धार्मिक आस्था के साथ राष्ट्र के प्रति सम्मान और समर्पण का संदेश दिया।

**सेल्फी प्वाइंट बना आकर्षण का केंद्र**

स्वतंत्रता दिवस के अवसर पर तैयार किया गया विशेष तिरंगा सेल्फी प्वाइंट भी श्रद्धालुओं के बीच आकर्षण का केंद्र रहा। बड़ी संख्या में भक्तों, युवाओं और बच्चों ने यहां तिरंगे के साथ तस्वीरें खिंचवाईं और स्वतंत्रता दिवस की यादों को कैमरे में संजोया। सेल्फी प्वाइंट पर दिनभर लोगों की आवाजाही बनी रही।

**श्रद्धालुओं और पूर्व सैनिकों ने की सराहना**

हनुमान लोक की तिरंगा सजावट, श्री हनुमान जी महाराज के विशेष श्रृंगार, राष्ट्रगान और देशभक्ति से जुड़े आयोजनों की श्रद्धालुओं सहित पूर्व सैनिकों ने भी सराहना की। पूर्व सैनिकों ने कहा कि धार्मिक आस्था के केंद्र पर राष्ट्रध्वज और शहीदों के सम्मान को प्रमुखता देना देश की नई पीढ़ी में राष्ट्रप्रेम की भावना को मजबूत करने वाला प्रयास है। श्रद्धालुओं ने भी कहा कि हनुमान भक्ति के साथ राष्ट्रभक्ति का यह संगम उन्हें विशेष रूप से भावुक और गौरवान्वित करने वाला रहा।

शहीदों के त्याग को किया नमन

इस अवसर पर देश की आजादी के लिए अपना सर्वस्व न्योछावर करने वाले स्वतंत्रता सेनानियों और अमर शहीदों के त्याग एवं बलिदान को श्रद्धापूर्वक स्मरण किया गया। तिरंगे की सजावट और राष्ट्रगान के माध्यम से मातृभूमि के लिए बलिदान देने वाले वीर सपूतों के प्रति सम्मान व्यक्त किया गया।

**लगभग दो लाख श्रद्धालुओं से गुलजार रहा धाम**

स्वतंत्रता दिवस के अवसर पर लगभग दो लाख श्रद्धालुओं के पहुंचने से जामसांवली धाम पूरे दिन भक्तों से गुलजार रहा। दूर-दराज से पहुंचे श्रद्धालुओं ने श्री हनुमान जी महाराज के दर्शन कर आशीर्वाद प्राप्त किया। भारी भीड़ को देखते हुए मंदिर संस्थान द्वारा दर्शन, आवागमन एवं श्रद्धालुओं की सुविधा को लेकर विशेष व्यवस्थाएं की गईं।

वहीं, बारिश के कारण क्षतिग्रस्त हुए सभामंडप की पीओपी का भी मंदिर संस्थान द्वारा तत्काल सुधार कराया गया, जिससे श्रद्धालुओं को व्यवस्थित वातावरण मिल सके।

तिरंगे की शान, शहीदों का सम्मान, बजरंगबली की भक्ति और भारत माता का जयघोष– इन भावों के साथ हनुमान लोक जामसांवली ने स्वतंत्रता दिवस पर राष्ट्रभक्ति और आध्यात्मिक चेतना का ऐसा संदेश दिया, जिसकी श्रद्धालुओं और पूर्व सैनिकों ने भी मुक्तकंठ से सराहना की।

## प्रकाश हायस्कूल व जुनिअर कॉलेज येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, कांद्री (रामटेक)**

देशाच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कांद्री माईन येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात पार पडला. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. यावेळी परिसरात देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले होते.

स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना त्यांना भविष्यातही शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून प्रगती करण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरलेल्या संगीतमय कवायत करण्यात आले. हातात तिरंगा ध्वज घेऊन मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले. भारत माता की जय, वंदे मातरम् आणि देशभक्तीपर घोषणांनी देशभक्तीचा उत्साह आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पाहायला मिळाला.

याप्रसंगी कांद्री ग्रामपंचायत चे सरपंच ममता बनसोड, महिला कोपरटीव चा अध्यक्ष गौतमा राऊत, केंद्रीय समन्वक अतुल देशमुख, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत ढोरे, संजय पन्नासे,पोलीस पाटील पौनीकर, उपसरपंच राजा कठोते मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि नव्या पिढीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत करण्याचा संदेश देण्यात आला.संगीतमय कवा यत, विद्यार्थी यांची भाषण व वर्ग १० व १२ चा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे कांद्री (माईन) परिसरात स्वातंत्र्य दिनाचा आनंद द्विगुणित झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामिनी पाटील, आभार विजय लांडे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्याम गासमवार,अशोक नाटकर, प्रशांत सरपाते, सुचिता नागपुरे, अनिता खंडाईत, ज्योत्स्ना मेश्राम, अनिता बागडे, बसंत ठकराले, प्रभाकर खंडाते, मिलिंद वाघमारे प्रयत्नशील होते.

## शेतात बांधलेल्या बैलावर वाघाचा हल्ला, उमरेड मार्गालगत वाघाचा वावर, शेतकऱ्यांत दहशत

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

उमरेड-भिवापूर मार्गालगत मौजा नवेगाव (दे.) येथील शिवारात शेतात बांधलेल्या बैलावर वाघाने हल्ला केल्याची घटना रविवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास घडली. या हल्ल्यात बैल जखमी झाला असून, वाघाच्या या धुमाकुळामुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हरिदास धोंडबा जांभळे यांच्या शेतात बैल बांधलेला असताना वाघाने अचानक त्याच्यावर झडप घातली. वाघाच्या हल्ल्यात बैलाच्या शरीरावर जखमा झाल्या. घटनेची माहिती मिळताच संबंधित वनविभागाला कळविण्यात आले.

**वाघाचा बंदोबस्त कधी ?**

घटनेनंतर वनविभागाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करावा आणि जखमी बैलाच्या नुकसानीची योग्य ती शासकीय मदत व नुकसानभरपाई तातडीने द्यावी, अशी मागणी शेतकरी व पशुपालकांनी केली आहे. विशेष म्हणजे, उमरेड-भिवापूर मार्गालगतच वाघाचा वावर आढळून आल्याने आता शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. शेतातील कामांसाठी बाहेर पडणाऱ्या शेतकरी, शेतमजूर तसेच पशुपालकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. वाघाने पाळीव जनावरांवर हल्ला करण्यापूर्वीच वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात. केवळ पंचनामा आणि कागदी कारवाई न करता वाघाचा माग काढून त्याचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी संतप्त मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

## स्वातंत्र्यदिन साजरा 'एक वादळ भारताचं' 'मिशन राजपथ- सामूहिक राष्ट्रगीत' अभियानाला नागपुरात अभूतपूर्व प्रतिसाद





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन हा केवळ सुट्टीचा दिवस न राहता तो राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा व्हावा, या उद्देशाने 'एक वादळ भारताचं' या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने फुटाळा तलाव येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मिशन राजपथ' अभियानाला नागपूरकरांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारो नागरिकांनी सकाळपासून या राष्ट्रभक्तीपर सोहळ्यात सहभाग घेतला होता. सकाळी सामूहिक राष्ट्रगीत गायनाने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. कार्यक्रमात विविध देशभक्तीपर उपक्रमांसह ढोल - ताशा पथके, स्केटिंग टीम, अश्वदल सलामी तसेच आदिवासी कलाकारांच्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी तिरंगा हातात घेत हजारो नागरिकांनी राष्ट्रगीतासाठी एकत्र उभे राहत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. सामूहिक राष्ट्रगीत ठरले मुख्य आकर्षण सकाळी १०.३० वाजता ५२ सेकंदांचे सामूहिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. हजारो नागरिकांनी एकाच स्वरात राष्ट्रगीताचे गायन केल्याने फुटाळा तलाव परिसरात अभूतपूर्व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. 'एक वादळ भारताचं' या अभियानाला देशभरातूनही प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, ४५० हून अधिक ठिकाणी नागरिकांनी सामूहिक राष्ट्रगीत गायनात सहभागी होत स्वातंत्र्यदिनाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.

**कार्यकर्त्यांच्या नियोजनातून अभियान यशस्वी**

नागपूर शहर समन्वयक अंकित क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली हितेश डाफ, अनुराग पाटणे, विपुल लोखंडे, रिया खोब्रागडे, ललित सानेसर, अमेय पांडे, निक्कू हिंदुस्तानी, नील शाहू, अवंतिका डवले आणि प्रणय श्रीखंडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन यशस्वीपणे सांभाळले.

या अभियानासाठी श्रीराम बालसंस्कार शाळा, भीम टायगर, जेडी कॉलेज, व्हायसीसी रोट्रॅक्ट, प्रियदर्शिनी भगवती कॉलेज आणि नेक्सस अकादमी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच शासकीय माजी सैनिक संघटना, शिवशक्ती आखाडा, रमाई लेझीम पथक, लालसिंग स्पोर्ट्स अकादमी, शिवराजे व दोनच राजे ढोल- ताशा पथक, हॉर्स रायडिंग असोसिएशन आणि विवेकानंद पब्लिक स्कूल यांनीही कार्यक्रमाला सहकार्य केले. देशभक्ती व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश 'एक वादळ भारताचं' हे स्वयंसेवकांच्या माध्यमातून कार्य करणारे राष्ट्रप्रेरित अभियान असून देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. यावर्षीच्या 'मिशन राजपथ' अभियानाला देशभरातून मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्वातंत्र्यदिन हा राष्ट्रीय अभिमानाचा उत्सव म्हणून साजरा केला, अशी भावना अभियानाचे देशाचे मुख्य संयोजक वैभव शिंदे पाटील यांनी व्यक्त केली.

थोडक्यात

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या नागपूर विभागीय केंद्रात स्वातंत्र्यदिन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नागपूर विभागीय केंद्रात ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.



विभागीय केंद्राच्या परिसरात आयोजित कार्यक्रमात विभागीय संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी वी आर गुल्हाने, देवांशु धाबर्डे, प्रवीणा बर्डे योगेश आमले, गणेश पांडे, प्रशांत मुसळे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शरद सूर्यवंशी म्हणाले, स्वातंत्र्य हा केवळ उत्सवाचा विषय नसून त्यामागील मूल्ये जपण्याची आपली सामूहिक जबाबदारी आहे. देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम, जबाबदार आणि राष्ट्रभक्त नागरिक घडविणे ही आपली महत्त्वाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी नमूद केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त सर्वांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी आपापल्या क्षेत्रात योगदान देण्याचा संकल्प केला.

## हिंदू मुलींची शाळामध्ये स्वातंत्र्य दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, महाल, नागपूर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे शाळेतील गुणवंत विद्यार्थिनी कु. रिया ढोमणे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने वातावरण देशभक्तीमय झाले. यावेळी विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते, भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. कार्यक्रमाला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, सचिव मीरा चाफेकर, अध्यक्षांच्या प्रतिनिधी सीमा फडणवीस, शाळेच्या मुख्याध्यापिका माया बमनोटे, उपमुख्याध्यापक सुबोध आष्टीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. नंदिनी टुंगरे हिने केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पल्लवी देशमुख यांनी केले.

## स्वातंत्र्यदिनी श्रीराम विद्यालयात भारतमातेचे पूजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीराम शिक्षण संस्था, रामटेक आणि अविरत संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम विद्यालय, प्रतापनगर-वाहितोला येथे ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सार्वजनिक भारत माता पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. रत्नप्रभा अंजनगावकर होत्या. डॉ. कल्याणी, एल.ए.डी. महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या निवृत्त प्रमुख, राजेंद्र यादव आणि वसंत नेवारे यांची विशेष उपस्थिती होती.

राष्ट्रध्वजारोहण व राष्ट्रगीत गायनानंतर भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने पूजन करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण वंदे मातरम्‌चे सामूहिक गायन करण्यात आले. डॉ. रत्नप्रभा अंजनगावकर, डॉ. कल्याणी आणि शाळेच्या प्राचार्या कुंभलकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल गाडवे यांनी केले. श्रीराम विद्यालय, वाहिटोला येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्योती कोवाचे, विजय, मंगला व राजेश यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी बालवाडी ते आठवीपर्यंतचे विद्यार्थी तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यसनमुक्त युवा देशाचा खरा पाया : डॉ. मूर्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**

येथील स्थानिक शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय येथे हर घर तिरंगा अभियान अंतर्गत वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले.



सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र व उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार दि . १ ऑगस्ट २०२६ पासून स्वातंत्र्य दिन पंधरवडा साजरा करण्यात आला या अंतर्गत दि. ५ ऑगस्ट रोजी स्वच्छ भारत या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली त्यानंतर ६ ऑगस्ट रोजी कचारगड या ठिकाणी जाऊन स्वच्छता करण्यात आली याच क्रमामध्ये दि.१२ ऑगस्ट रोजी स्वच्छता फेरी सालेकसा या गावातून काढण्यात आली तसेच १३ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण करण्यात आले आणि १४ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाविद्यालयाचा परिसर सर्व विभाग यांची स्वच्छता करण्यात आली. दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस नारायण मूर्ती व प्रमुख अतिथी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मंगेश खोब्रागडे यांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन कार्यक्रम घेण्यात आला. हर घर तिरंगा या अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या या सर्व कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय बिरनवार यांचा चमू व समान संधी केंद्र मार्फत करण्यात आले याकरिता महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थी प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आवर्जून उपस्थिती लावली.

# भिक्षामुक्त समाजासाठी आस्था निवारा गृहाची जनजागृती रॅली

### सह्याद्री संस्थेतर्फे करण्यात येते आस्था निवारागृहाचे संचालन, निवारागृहाच्या परिसरात ध्वजारोहण



ध्वजारोहणावेळी संस्था परिसरात उपस्थित निवारागृहातील प्रभुजी, मान्यवर व सह्याद्री संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भिक्षामुक्त समाजाची निर्मिती आणि नागरिकांमध्ये भिक्षावृत्तीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेद्वारे संचालित आस्था निवारा गृहाच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. 'भिक्षामुक्त नागपूर'चा संकल्प नागरिकांपर्यंत पोहोचविणे तसेच गरजू व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी समाजाचा सक्रिय सहभाग मिळविणे, हा रॅलीचा प्रमुख उद्देश होता.

रॅलीमध्ये नागपूर महानगरपालिकेचे कर्मचारी, गणेशपेठ व इमामवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी, सह्याद्री संस्थेचे संचालक विजय क्षीरसागर, प्रकल्प संचालक देवेंद्र क्षीरसागर, व्यवस्थापक दीपक पसारकर, व्यवस्थापक नितेश नागदेवे, अधीक्षक गौतम अशोकजी नागरे, सामाजिक कार्यकर्ते तुषार हुकरे, दैनिक सिंहवाणी वृत्तचे मुख्य संपादक अजय बिवडे, समुपदेशक वैभव बागडे, शांती सदन महिला भिक्षेकरी निवारागृहाच्या वॉर्डन अनिता गंधरवार, काळजीवाहक अनंता नागोसे, कार्तिक कोडवते, प्राची व झेबा खान यांच्यासह कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

रॅलीदरम्यान 'भिक्षा देऊ नका, पुनर्वसनाला साथ द्या', 'भिक्षामुक्त नागपूर–आपली सामूहिक जबाबदारी', 'गरजू व्यक्तींना मदत करा, भिक्षावृत्तीला प्रोत्साहन देऊ नका' अशा संदेशांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. सहभागी नागरिकांनी हातात जनजागृतीपर फलक व राष्ट्रध्वज घेऊन भिक्षावृत्तीमुक्त नागपूरचा संदेश दिला.

भिक्षावृत्ती ही केवळ वैयक्तिक समस्या नसून गंभीर सामाजिक प्रश्न आहे. त्यामुळे रस्त्यावर भिक्षा देण्याऐवजी भिक्षा मागणाऱ्या गरजू व्यक्तींना निवारा, समुपदेशन, आरोग्यसेवा, कौशल्य प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी आणि सन्मानपूर्वक पुनर्वसन मिळवून देण्यासाठी प्रशासन व सामाजिक संस्थांच्या प्रयत्नांना नागरिकांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. आस्था निवारा गृहामार्फत गरजू व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, या कार्याला लोकसहभागाची जोड मिळावी, यासाठी रॅलीच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करण्यात आले. 'भिक्षामुक्त नागपूर' घडविणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक सामाजिक जबाबदारी आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

आस्था निवारा गृहाच्या टीमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अधिकारी, कर्मचारी, पोलीस, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागाची जोड मिळाल्याने ही जनजागृती रॅली उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात संपन्न झाली. भिक्षामुक्त समाजासाठी एक पाऊल, भिक्षेऐवजी पुनर्वसनाला हातभार आणि सन्मानाने जगण्याची नवी सुरुवात - या संकल्पनेतून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आस्था निवारा गृहाच्या वतीने करण्यात आले.

## स्वातंत्र्य दिनी कचारगड व हाजराफॉलवर पर्यटकांचा सागर, चारही बाजूंनी उत्साहाचे वातावरण

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - प्रकाश टेंभरे**

स्वातंत्र्य दिनाच्या सुट्टीचे औचित्य साधून सालेकसा तालुक्यातील कचारगड, प्रसिद्ध नैसर्गिक गुहा, हाजराफॉल तसेच अंबाटोला येथील छोटा हाजराफॉल या पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी झाली. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि इतर राज्यांतून मोठ्या संख्येने पर्यटक येथे दाखल झाले. सकाळपासूनच पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या मार्गांवर दुचाकी व चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या.

कचारगड येथील नैसर्गिक गुहा पर्यटकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्र ठरली. डोंगररांगा, हिरवाई आणि निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी कुटुंबांसह युवक मोठ्या संख्येने येथे पोहोचले. पर्यटकांनी नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेत फोटो व व्हिडिओ काढून या सहलीच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद केल्या.

**हाजराफॉलचे मनमोहक रूप पाहण्यासाठी गर्दी**



पावसामुळे हाजराफॉलची जलधारा अधिक प्रवाही झाल्याने धबधब्याचे सौंदर्य खुलून दिसत होते. फेसाळत कोसळणारे पाणी, आजूबाजूची हिरवाई आणि डोंगराळ निसर्ग यामुळे पर्यटकांना विशेष आकर्षण वाटले. दिवसभर हाजराफॉल परिसरात पर्यटकांची मोठी वर्दळ होती.

अंबाटोला येथील छोटा हाजराफॉल परिसरातही स्वातंत्र्य दिनानिमित्त मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले. कुटुंबे, मित्रपरिवार आणि युवकांच्या समूहांमुळे परिसरात दिवसभर उत्साहाचे वातावरण होते.

**वाहनांच्या लांबच लांब रांगा**

पर्यटकांची संख्या मोठी असल्याने पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनांची गर्दी झाली. अनेक ठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. गर्दी लक्षात घेऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी वाहनांची ये-जा नियंत्रित करण्यासह पर्यटकांची गर्दी व्यवस्थित ठेवण्यासाठी प्रयत्न केले.

**स्थानिक व्यावसायिकांना मोठा आर्थिक फायदा**

पर्यटकांच्या मोठ्या गर्दीचा थेट फायदा स्थानिक दुकानदार, खाद्यपदार्थ विक्रेते, वाहनचालक, पार्किंग व्यवस्थापक आणि पर्यटनाशी संबंधित नागरिकांना झाला. चहा-नाश्ता, भोजन, शीतपेय तसेच इतर वस्तूंच्या दुकानांमध्ये दिवसभर गर्दी होती. प्रवेश शुल्क, पार्किंग आणि इतर स्थानिक व्यवस्थांमधून संबंधित समित्यांनाही चांगले उत्पन्न मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.

**पर्यटन विकासाला मिळू शकते चालना**

कचारगड, हाजराफॉल आणि छोटा हाजराफॉल या पर्यटनस्थळांवर स्वातंत्र्य दिनी झालेली गर्दी पाहता सालेकसा तालुक्यात पर्यटन विकासाला मोठ्या संधी असल्याचे स्पष्ट झाले आहे. रस्ते, पार्किंग, स्वच्छता, पिण्याचे पाणी, सुरक्षा आणि इतर मूलभूत सुविधा अधिक सक्षम केल्यास या पर्यटनस्थळांकडे वर्षभर पर्यटकांचा ओघ वाढू शकतो. त्यातून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासह छोट्या व्यवसायांनाही चालना मिळू शकते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त कचारगडपासून हाजराफॉल आणि अंबाटोला येथील छोटा हाजराफॉलपर्यंत संपूर्ण परिसर दिवसभर पर्यटकांच्या गर्दीने गजबजून गेला होता. निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटकांनी सुट्टीचा मनमुराद आनंद घेतला. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने झालेल्या या विक्रमी गर्दीने सालेकसा तालुक्यातील पर्यटनस्थळांची वाढती लोकप्रियता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

## दरेकसा-जमाकुड़ो में उत्साह के साथ मनाया गया स्वतंत्रता दिवस

### पुलिस कैंप और आयुष्मान आरोग्य मंदिर में हुआ ध्वजारोहण, ग्रामीणों व कर्मचारियों की रही उपस्थिति



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

देशभर के साथ दरेकसा पुलिस कैंप तथा आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र जमाकुड़ो में १५ अगस्त को स्वतंत्रता दिवस समारोह उत्साह और देशभक्ति के माहौल में मनाया गया। इस अवसर पर दोनों स्थानों पर ध्वजारोहण कर राष्ट्रध्वज को सलामी दी गई। आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र जमाकुड़ो में डॉ. राठौर मैडम के हस्ते ध्वजारोहण किया गया। वहीं पुलिस कैंप दरेकसा में पुलिस प्रभारी के हस्ते राष्ट्रध्वज फहराया गया। ध्वजारोहण के दौरान उपस्थित पुलिस कर्मचारियों, स्वास्थ्य विभाग के कर्मचारियों तथा ग्रामीणों ने राष्ट्रध्वज को सलामी देते हुए देश की एकता और अखंडता का संकल्प लिया।

कार्यक्रम में सामाजिक कार्यकर्ता अमित वैद्य, धुर्व हुकरे, आश्रम स्कूल जमाकुड़ो के अधीक्षक धर्मे सर, स्कूल के कर्मचारी, आरोग्य सेविका अनीता गोदसेलवार, आंगनवाड़ी एवं स्वास्थ्य विभाग से जुड़े कर्मचारी तथा क्षेत्र की आशा सेविका हेमलता फूडकर, उषा दमाहे, उषा चित्रीव, अनीता साखरे, रजनी मड़ावी सहित अन्य कर्मचारी उपस्थित रहे। इसके अलावा जमाकुड़ो क्षेत्र के शुभाष माचिये सहित बड़ी संख्या में माता-बहनों और ग्रामीणों ने भी समारोह में सहभागिता की। दुर्गम क्षेत्र में आयोजित इस कार्यक्रम से ग्रामीणों में देशभक्ति और उत्साह का माहौल देखने को मिला। कार्यक्रम के दौरान स्वतंत्रता सेनानियों के बलिदान को याद करते हुए देश की प्रगति, शांति और सामाजिक एकता के लिए सभी ने अपनी प्रतिबद्धता व्यक्त की। ग्रामीण क्षेत्र में पुलिस, स्वास्थ्य विभाग, आश्रम स्कूल और नागरिकों की संयुक्त उपस्थिति ने स्वतंत्रता दिवस समारोह को विशेष बना दिया।

# अवयवदानाची व्यापक चळवळ उभी राहावी!

### जनजागृती कार्यक्रमात अवयवदानाची घेतली शपथ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अवयवदानासंदर्भातील गैरसमज, भीती आणि विविध मिथक दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज आहे. अवयवदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मृत्यूनंतरही दुसऱ्याला जीवन देणारी मानवतावादी चळवळ आहे. या चळवळीला व्यापक स्वरूप देण्यासाठी प्रत्येकाने अवयवदानाचा ॲम्बेसेडर बनून किमान पाच जणांना अवयवदानासाठी प्रेरित करावे, असे आवाहन करण्यात आले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त अवयव व ऊतीदानाबाबत जनजागृती करण्यासाठी रविवारी इंडियन मेडिकल असोसिएशन ऑडिटोरियममध्ये जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थितांनी अवयवदानाची शपथ घेतली.

असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया, विदर्भ चॅप्टर यांच्या वतीने इंडियन मेडिकल असोसिएशन, नागपूर शाखा, झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर, नागपूर, अकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेस, नेफ्रोलॉजी सोसायटी आणि सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन, नागपूर यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील प्रमुख पाहुणे, तर झेडडीसीसी नागपूरचे प्रमुख मनीष श्रीगिरीवार, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण बिडकर यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

डॉक्टरांनी रॉबर्ट नोएल टेस्ट यांची 'To Remember Me' ही कविता सादर करण्यात आली. या कवितेचा मराठी अनुवाद डॉ. सुनंदा चावजी यांनी केला होता. डॉ. मंजूषा मार्डीकर लिखित व संजय पेंडसे दिग्दर्शित जीवनदान अंगदान महान ही लघुनाटिका सादर करण्यात आली. सूत्रधार डॉ. अंजली भांडारकर होत्या. अवयवदाते तसेच अवयव प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांनी आपले अनुभव कथन केले.



असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया, विदर्भ चॅप्टरच्या अध्यक्ष डॉ. तनुजा मनोहर यांनी प्रास्ताविकातून अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित केले तर सचिव डॉ. अश्विनी तायडे आणि गिरा सोवनी यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला, तर संशोधन समिती अध्यक्ष डॉ. मंजुषा मार्डीकर यांनी अवयवदान चळवळीचा इतिहास आणि त्याची सामाजिक गरज विशद केली. सूत्रसंचालन डॉ. शिल्पा देवके व डॉ. शिल्पा कुथे यांनी केले.

**गोल्डन अवरमध्ये प्रत्येक मिनिट महत्वाचा : विश्वास नांगरे पाटील**

ग्रीन कॉरिडॉरविषयी सविस्तर माहिती देताना विश्वास नागरे पाटील यांनी अवयव प्रत्यारोपणासाठी गोल्डन अवरमध्ये अवयव एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचविण्यात प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर, समन्वय, विशेष मार्ग आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन कसे केले जाते, याची माहिती त्यांनी दिली. या प्रक्रियेत अनेक आव्हाने असली तरी विविध यंत्रणांमधील समन्वयामुळे अवयव वेळेत प्रत्यारोपण केंद्रापर्यंत पोहोचविणे शक्य होते, असे त्यांनी सांगितले.

**स्वॅप डोनेशनची संकल्पना लवकरच - मनीष श्रीगिरीवार**

अवयवदान चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी मिशन ब्रिजसारख्या उपक्रमांची माहिती देताना मनीष श्रीगिरीवार यांनी स्वॅप डोनेशनची संकल्पना एम्स, नागपूर येथे लवकरच सुरू केली जाणार असून त्यामुळे रुग्णांना लवकर अवयव मिळू शकतील व त्यांचे प्राण वाचतील असे सांगितले.

थोडक्यात

## अरोली येथे डिजिटल वाचनालयाचे उच्चशिक्षित युवतीकडून उद्घाटन





**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिवसाच्या पावन पर्वावर सरपंच रोशनी प्रशांत भुरे यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहण झाल्यानंतर, सरपंचा भुरे यांचा संकल्पनेतून तयार झालेले एक सुंदर सार्वजनिक डिजिटल वाचनालयाचे उद्घाटन अरोली गावातील उच्चशिक्षित असलेली कु.हर्षा नारायणजी समरीत यांचा हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सदानंद निमकर, तालुका शिवसेना अध्यक्ष प्रशांत भुरे, तंटामुक्त अध्यक्ष कैलास समरीत, अरोलीचे ठाणेदार स्नेहल राऊत आणि ग्रामपंचायत चे सर्व सदस्यगण,अधिकारी व पदाधिकारी तसेच गावातील नागरिक, महिला मंडळी व गावातील तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या भरगच्च उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला. या सार्वजनिक डिजिटल वाचनालयाच्या उपयोग गावातील तसेच बाहेर गावातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुला व मुलींनी नागरिकांनी घ्यावे, असे आव्हान याप्रसंगी सरपंचा रोशनी प्रशांत भुरे यांनी केले.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)च्या जनसंपर्क कार्यालयात प्रदेश महासचिव आनंद सिंह यांच्या हस्ते ८० वे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी राष्ट्ररक्षणाची शपथ घेतली. ध्वजारोहण कार्यक्रमाला रितेश लक्केवार, बच्चू तिवारी, प्रमोद ससासे, रवि विश्वकर्मा, विजय गौरकर, धर्मेंद्र भटेजा, पप्पू राऊत, कमल भट्ठड, लोकेश पुरोहित, रंजीत मेश्राम आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## वरिष्ठ नागरिक सोनेगांव मंडळातर्फे स्वातंत्र्यदिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
वरिष्ठ नागरिक मंडळ, सोनेगाव नागपूरच्या वतीने सोनेगाव तलाव परिसरात भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष ब्रिजेश खापेकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रमुख पाहुणे नगरसेवक ईश्वरजी ढेंगळे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. ९२ वर्षीय ज्येष्ठ नागरिक नानासाहेब बारहाते यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी परिसरात देशभक्तीचा उत्साहपूर्ण माहोल निर्माण झाला होता. कार्यक्रमात श्रीधर मानकर, पारेखजी आणि नखातेजी यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. प्रमुख पाहुणे ईश्वर ढेंगळे यांनी मार्गदर्शन करतांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांच्या कार्याला उजाळा दिला. तसेच ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या अनुभवातून तरुण पिढीला मार्गदर्शन करून देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन श्रीधर मानकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष ब्रिजेश खापेकर, कार्याध्यक्ष मारोती इंगोले, उपाध्यक्ष सुनील माटे, सचिव मदन फटिंग, कोषाध्यक्ष चंद्रशेखर काकडे यांच्यासह हिरालाल पराते, देविदास पिलारे, कृष्णा साटोने, अनंत पेटकर, संजय पौनीकर, रामकृष्ण पिंपळीकर, सुनील पारेख, रामभाऊ झोड, वसंत झुनके, अरुण सालवणकर, नीलकंठ ठाकरे, मौंदेकर, खोत, गुप्ता, अनिल मूर्ती, बोरीकर, हिंगणकर आणि विष्णू उंबरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांना परस्परांशी स्नेह, संवाद व आनंदाचे क्षण अनुभवता आले. अशा सामाजिक व देशभक्तीपर उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना मिठाई व अल्पोपाहाराचे वाटप करण्यात आले.

## उच्च न्यायालयात ध्वजारोहण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
८० व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त उच्च न्यायालयात प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उच्च न्यायालयाचे सर्व न्यायमूर्ती, प्रबंधक व उच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष, अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. प्रारंभी पोलीस विभागाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.



# दोन भीषण घटनांनी हादरले गोंदिया

# धासगडात दोघे बुडाले, तर गंगाझरी येथे तिघे युवक अपघातात ठार

### धासगडच्या पाण्याच्या झऱ्यात दोन युवक बुडाले, एकाचा मृतदेह सापडला, दुसऱ्याचा शोध सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**
चिचगड पोलीस स्टेशन हद्दीतील धासगड येथील पाण्याच्या झऱ्यात दोन युवक बुडाल्याची दुर्दैवी घटना १५ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन ते पावणेचार वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत कृष्णा लखन कापगते (वय २०) याचा मृतदेह शोध पथकाला सापडला असून, हेतराम गुलाब सायाम (वय २५) हा अद्याप बेपत्ता आहे.

दोन्ही युवक बोपाबोडी (सौंदड), ता. सडक-अर्जुनी येथील रहिवासी आहेत. घटनेची माहिती मिळताच चिचगड पोलिसांसह महसूल विभाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे शोध व बचाव पथक तसेच स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर झऱ्यात बुडालेल्या दोन्ही युवकांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू करण्यात आली. शोधकार्यादरम्यान कृष्णा लखन कापगते याचा मृतदेह पथकाच्या हाती लागला. मात्र हेतराम गुलाब सायाम याचा अद्याप शोध लागलेला नाही.

दिवसभर सुरू असलेले शोधकार्य रविवारी सायंकाळी थांबविण्यात आले. अंधारामुळे शोधमोहीम थांबविण्यात आली असून, सोमवार, १७ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे बोपाबोडी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, बेपत्ता युवकाचा शोध लागण्याची प्रतीक्षा त्याचे कुटुंबीय आणि नागरिक करीत आहेत.

### गंगाझरी आश्रमशाळेजवळ भीषण अपघात, तिघांचा जागीच मृत्यू

गोंदिया जिल्ह्यातील गंगाझरी येथील आश्रमशाळेजवळ आज रविवारी (१६ ऑगस्ट) सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास भीषण रस्ता अपघात घडला. दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या तिघांना एका अनियंत्रित चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने तिन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाला.



प्राथमिक माहितीनुसार, मृत तिन्ही युवक धापेवाडा लोधीटोला येथील रहिवासी आहेत. मृतांची नावे सौरभ जयसिंह बघेले, गौरव गणेश बैठवार आणि निखिल वासुदेव मेश्राम अशी आहेत. चारचाकी वाहनाने दुचाकीला दिलेली धडक इतकी भीषण होती की, तिन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघाताची नोंद करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

या भीषण अपघातामुळे धापेवाडा लोधीटोला परिसरात शोककळा पसरली असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघात नेमका कशामुळे घडला, चारचाकी वाहनाचा चालक कोण होता आणि वाहनावरील नियंत्रण का सुटले, याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

## २० वर्षांची रक्तदान परंपरा : अहीर कुटुंबीयांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २०० रक्तदात्यांचे रक्तदान

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
**(धनंजय पांढरे)**
सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात कार्यरत युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेले स्व. कालिदास अहीर आणि स्व. हितेंद्र अहीर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ. गंगारामजी अहीर चॅरिटेबल ट्रस्ट, चंद्रपूरच्या वतीने शुक्रवारी १४ ऑगस्ट महेश भवन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल २०० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक व राष्ट्रीय कार्यात योगदान दिले.



कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी स्व. डॉ. गंगारामजी अहीर, स्व. कालिदास अहीर आणि स्व. हितेंद्र अहीर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर, आमदार किशोर जोरगेवार, वरोराचे आमदार करण देवतळे, डॉ. अशोक जिवतोडे, वणीचे माजी आमदार संजय रेड्डी बोदकुरवार, राजुराचे माजी आमदार ॲड. संजय धोटे, सुदर्शन निमकर, महापौर संगिता खांडेकर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, विजय राऊत, खुशाल बोंडे, युवा नेते रघुवीर अहीर, शामल अहीर, चंदन अहीर, हर्षवर्धन अहीर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना हंसराज अहीर यांनी स्व. कालिदास अहीर आणि स्व. हितेंद्र अहीर यांच्या सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख केला. युवकांना सामाजिक आणि राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी दोन्ही बंधूंनी सातत्याने कार्य केले. त्यांच्या कार्याची स्मृती कायम राहावी या उद्देशाने गेल्या २० वर्षांपासून रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. रक्तदानासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे त्यांनी आभार मानले. आमदार किशोर जोरगेवार यांनीही हंसराज अहीर यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. गेल्या दोन दशकांपासून सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराच्या माध्यमातून युवकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे हे कौतुकास्पद कार्य असल्याचे त्यांनी सांगितले. चंद्रपूर शहरात रक्तदान चळवळीला गती देण्यात या उपक्रमाचे मोठे योगदान असल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक खुशाल बोंडे यांनी केले. अहीर कुटुंबीयांचे रक्तदानासह विविध सामाजिक चळवळीतील योगदान अविस्मरणीय असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तुषार सोम यांनीही समयोचित विचार व्यक्त केले. या रक्तदान शिबिरात चंद्रपूरसह भद्रावती, वरोरा, बल्लारशाह, जिवती, कोरपना, राजुरा, वणी, पांढरकवडा, घुग्घूस आदी भागांतील रक्तदात्यांनी सहभाग घेतला. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा तसेच जिल्हा रक्तसंक्रमण विभाग आणि नागपूर येथील लाईफलाईन ब्लड बँकेच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्मृतिचिन्ह, भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. गायकवाड, दिलीप कपूर, प्रमोद शास्त्रकार, श्रीकांत भोयर, विनोद शेरकी, राजू घरोटे, विकास खटी, संजय खनके, किशोर बावने, अरुण मस्की, अंकुश आगलावे, संजय तिवारी, सुनील उरकुडे, प्रशांत घरोटे, शाम कनकम, विनोद खेवले, राजेंद्र खांडेकर, प्रा. रवि जोगी, कमल कजलीवाले, पूनम तिवारी, गौतम यादव, प्रतीक शिवनकर, जगदीश दंडेले, दिनकर सोमलकर, सुभाष आदमने, मधुकर राऊत, सुरेश केंद्रे, केशव गिरमाजी, संतोष वडपल्लीवार, गणेश गेडाम, रामू भंडारी, राहुल सूर्यवंशी, मयूर भोकरे, विजय वानखेडे, निलेश खोलापूरे, दिवाकर पुद्दटवार, प्रविण गिलबिले, सचिन डोहे यांच्यासह भाजपा, भाजयुमो, महिला मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन राहुल बनकर यांनी केले.

## विकास वार्ता पुरस्काराने पवन पाथोडे सन्मानित



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**
श्रमिक पत्रकार संघ, गोंदियाच्या वतीने दरवर्षी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदाच्या वर्ष २०२६ च्या विकास वार्ता पुरस्कारासाठी सालेकसा तालुक्यातील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सालेकसाचे सचिव युवा पत्रकार पवन शामराव पाथोडे यांची निवड करण्यात आली. गोंदिया येथे आयोजित दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पत्रकारिता ही केवळ बातमी प्रसारित करण्याचे माध्यम नसून समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे प्रभावी साधन आहे. याच भूमिकेतून पत्रकार पवन पाथोडे हे मागील अनेक वर्षांपासून सालेकसा तालुक्यात पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. ग्रामीण, दुर्गम व आदिवासीबहुल भागातील नागरिकांच्या समस्या, विकासाच्या प्रश्नांसह प्रशासनाशी संबंधित विविध विषयांना त्यांनी आपल्या वृत्तांकनातून सातत्याने अधोरेखित केले आहे.

ग्रामीण भागातील अनेक प्रश्नांना प्रसिद्धी मिळत नसताना प्रत्यक्ष गावपातळीवर जाऊन वस्तुस्थिती जाणून घेणे, नागरिकांचे म्हणणे समजून घेणे आणि त्यांच्या समस्यांना वृत्तांकनाच्या माध्यमातून योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. त्यामुळे त्यांच्या पत्रकारितेला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली असून, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा पत्रकार म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

## जिल्हा परिषद आदर्श शाळा घोटमुंढरी येथे स्वतंत्रता दिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्त्यांकडून शालेय साहित्याचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
स्वातंत्र्य दिनाच्या शुभ पर्वावर ग्रामपंचायत कार्यालय व शाळेत मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गोरक्षनाथ मडावी तंटामुक्ती अध्यक्ष घोटमुंढरी यांनी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा साठी बसलेल्या पाचवीच्या विद्यार्थ्यांना त्या परीक्षेची तयारी करण्यासाठी व नवोदय चे मार्गदर्शक पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत वाटप केले.



त्यासाठी त्यांचे आभार, अभिनंदन शाळा, ग्रामपंचायत व समस्त गावकरी यांच्या वतीने व्यक्त करण्यात आले. घोटमुंढरी येथील आदर्श जिल्हा परिषद शाळा विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सर्वांगिक विकास कसे होईल व गुणवत्ता याबाबतीत तालुक्यात प्रत्येक क्षेत्रात झेप घेत असते. येथील शाळेची कायापालट होऊन इथे विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक विविध सोयी सुविधा, सुसज्ज इमारती, एआय लॅब, ICT लॅब,सायन्स लॅब,स्मार्ट बोर्ड, वायफाय कनेक्शन, ऑनलाइन स्पर्धा परीक्षाचे शिक्षण उपलब्ध आहेत.

ज्युनियर IAS परीक्षेत पाच विद्यार्थी पास होऊन गोल्ड मेडलिस्ट ठरले त्यांचे सुद्धा पारितोषिक देऊन मान्यवरांचे हस्ते स्वागत,सत्कार करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी विविध कला कौशल्य यांचे प्रदर्शन करून सर्वांचे मन आकर्षित केले.

कार्यक्रमाला गट ग्रामपंचायत सरपंच चंदा गेडाम व सर्व सदस्य,शाळा समिती अध्यक्ष उदय पांडे,उपाध्यक्ष मंगलसिंग देवतारे व सर्व सदस्य, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष निशांत उईके, उपाध्यक्ष रोशन देवतारे, सर्व सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष गोरक्षनाथ मडावी,मुख्याध्यापक विकास धारगावे, शाळेतील व कॉन्व्हेन्टचे सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी, जेष्ठ मान्यवर,आजी माजी सर्व पदाधिकारी, सामाजिक, शैक्षणिक कार्य करणारे व्यक्तिमत्व मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते सर्व बक्षीस वितरण करण्यात आले.

याचप्रकारे शाळेला सहकार्य करून सर्वांनी शाळा व गावाचे नाव आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगिक विकास करण्यासाठी असेच तत्परतेने पुढाकार घेऊन पुढे यावे व आम्ही शैक्षणिक बाबतीत विद्यार्थ्यांना प्रगतीकडे नेण्यासाठी वाटेल ते प्रयत्न करू,विविध क्षेत्रात त्यांनी यश मिळवावे यासाठी कटिबद्ध राहून कार्य करून विद्यार्थी घडवण्याचे सर्व मिळून कार्य करूअसे मनोगत याप्रसंगी मुख्याध्यापक यांनी व्यक्त केले.

थोडक्यात

## श्रीहरीनगराच्या उद्यानात स्वातंत्र्य दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीहरीनगर नंबर -२ व ३ मानेवाडा, नागपूर येथील, उद्यानात ८० वा, स्वतंत्र्य दिनानिमित्त समारोह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मागील ३६ वर्षापासून या उद्यानात झेंडावंदनाचा कार्यक्रम होत असतो. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी घनश्याम फुसे यांनी ध्वजारोहण केले. कार्यक्रमाचे पाहुणे सुरेशजी ऊरकूडे, शिवराम गुरनूले, विजय लोणारे, प्रमोद रामटेके उपस्थित होते. भाषणातून त्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद केले. विठ्ठलराव घोडे यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले तर राजरतन कुंभारे यांनी नगरीतील उपस्थित नागरिकांना संविधानाच्या प्रतीचे वाटप केले.

या कार्यक्रमाला प्रा. अशोक मंदे, रामदास कोल्हे, प्रवीण सुरकर, अशोक माहूरे, केशवराव बोपूलकर, सौ.आशा माहुरे, राजेश होरे, घनश्याम ढोले, नंदकिशोर शिंगणजूडे, सुशील दहीकर, रवींद्र नखाते, अशोक मंडपे, गणेश भारद्वाज, जानराव बारई, हरीश लाकडे, छोटू जगनाडे, आनंद सेलूकर, खाटके, कोहाड, प्रतीक लांजेवार व नगरीतील नागरिक उपस्थित होते.

## पत्रकार भवनात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

१५ ऑगस्ट रोजी, टिळक पत्रकार भवन ट्रस्ट आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त पत्रकार भवनात देशभक्तीपूर्ण वातावरणात ८० वा, स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणा नंतर उपस्थित पत्रकार व पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. या कार्यक्रमाला टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे सचिव शिरीष बोरकर,

नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे सचिव अनुपम सोनी, ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रभाकर दुपारे यांच्यासह ट्रस्टच्या संचालक मंडळातील विनोद देशमुख, विवेक पुराडभट, महेश उपदेव तसेच नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे सदस्यगण परितोष प्रामाणिक, आनंद मोहरील, ट्रस्टचे आजीवन सदस्य श्यामकांत पात्रीकर, सुरेश कनोजिया, चंद्रकांत अणेकर तथा आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त पत्रकार भवन परिसरात उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी एकमेकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात देशभक्तीचा उत्साह



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, येथे स्वातंत्र्यदिन देशभक्तीच्या उत्साहात आणि सामाजिक भावनेने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई, समितीचे सदस्य एन. आर. सुटे आणि प्राचार्या डॉ. दीपा पान्हेकर उपस्थित होते.

सुरुवात भदंत ससाई यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून झाली, त्यानंतर राष्ट्रगीत गायले गेले. उपस्थित जनसमुदायाने लोकशाही मूल्ये आणि घटनात्मक आदर्शांप्रती आपली बांधिलकी अधोरेखित करत संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

प्राचार्या डॉ. दीपा पान्हेकर यांनी सुमारे १०७ एनसीसी कॅडेट्सना एनसीसीची शपथ दिली. मान्यवरांनी प्राचार्या आणि कॅप्टन डॉ. सुजित चव्हाण यांच्यासमवेत परेड निरीक्षण केली, त्यानंतर एनसीसी कॅडेट्सचे प्रभावी मार्च-पास्ट पार पडले. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा प्रतिष्ठित 'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार (२०२५-२६)' प्राप्त झाल्याबद्दल २० महाराष्ट्र बटालियन एनसीसीची कॅडेट लिंटा थॉमसन हिचा सत्कार करण्यात आला. समारंभात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते आणि पारंपरिक नृत्ये सादर केली.

## जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# विकासाच्या नव्या पर्वाकडे नागपूरची वाटचाल : पालकमंत्री बावनकुळे

### सिंचन, आरोग्य, कृषी, पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण आणि तंत्रज्ञानाला गती, २०४७ च्या विकसित भारताच्या संकल्प पूर्ततेसाठी नागपूर जिल्हा सज्ज



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्ह्याने विकासाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली असून, सिंचन, आरोग्य, कृषी, सामाजिक कल्याण, महिला सक्षमीकरण, क्रीडा, पायाभूत सुविधा, पोलीस प्रशासन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासाला नवी गती मिळाली आहे. जिल्ह्यातील विविध विभागांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे नागरिकांना सुविधा उपलब्ध होत आहेत. नागपूरला देशातील अग्रगण्य आणि विकसित प्रदेश म्हणून घडविण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू असल्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ध्वजारोहणानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, आ. डॉ. राजीव पोतदार, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मीना, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस सह आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

नागपूर आणि विदर्भाला लॉजिस्टिक्स, ऊर्जा, कृषी प्रक्रिया, माहिती-तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकासाचे प्रमुख केंद्र बनविण्याचे उद्दिष्ट मांडण्यात आले आहे. शिक्षण, कृषी, आरोग्य, क्रीडा, मिहान, महामेट्रो, रस्ते विकास, नागपूर स्पोर्ट्स हब, अंबोरा पर्यटन, रामटेक येथील चित्रनगरी, नवीन नागपूर व्यापार व वित्तीय केंद्र आणि स्टेट डेटा सेंटर यांसारख्या विविध प्रकल्पांमुळे नागपूरच्या विकासाला व्यापक दिशा मिळत आहे. २०४७च्या विकसित भारताच्या संकल्पाला मूर्त रूप देण्यासाठी नागपूर आणि विदर्भाला देशातील समृद्ध व अग्रगण्य प्रदेश बनविण्याच्या दिशेने शासन, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या समन्वयातून विकासाची ही वाटचाल पुढे सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सामाजिक कल्याण विभागाच्या माध्यमातून चांगले काम करण्यात आले आहे. मिहान-एअरपोर्ट परिसरात ८२ एकर जागेवर कन्व्हेन्शन, सांस्कृतिक व प्रदर्शन केंद्राची तयारी सुरू आहे. सिंचन क्षेत्रात चिचघाट उपसा सिंचन योजनेतून ३हजार ७१५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. खैरी कालव्याच्या विशेष दुरुस्तीमुळे ४७३ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित झाली असून, भिड-चिचघाट योजनेतून ९,६४० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळत असल्याचे ते म्हणाले.

**आरोग्य सुविधांना बळ**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत ६८ आपला दवाखाना केंद्रांमधून नागरिकांना आरोग्य सेवा दिली जात आहे. आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून ९३ हजार ९१४ रुग्णांवर ३०७ कोटी रुपयांचे मोफत उपचार करण्यात आले आहेत. तसेच नागपूर जिल्ह्यात ३ लाख ३८ हजार २९५ आयुष्मान कार्डांचे वितरण करण्यात आले आहे.

**६० एआय अंगणवाड्या; नागपूर देशातील पहिला जिल्हा**

जिल्ह्यातील ६० आरोग्य केंद्रांना ठदअर मानांकन मिळाले असून, १५ स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसेच ६० एआय अंगणवाड्यांमुळे नागपूर हा देशातील पहिला जिल्हा ठरल्याचा उल्लेख करण्यात आला असून, या उपक्रमामुळे कुपोषणात घट झाली.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रशासनात प्रभावी वापर**

नागपूर शहर पोलिसांकडून अक आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट पोलिसिंगचा वापर करण्यात येत आहे. नागपूर ग्रामीण पोलिसांनीही अक्च्या सहाय्याने गंभीर गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे.

**पायाभूत सुविधांच्या विकासाला वेग**

एनएमआरडीएच्या माध्यमातून नवीन नागपूर प्रकल्पासाठी जमीन संपादन व निधीच्या कामाला गती देण्यात आली असून, बाह्य वळण रस्ता प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू आहे. महामेट्रोच्या मेट्रो टप्पा-३च्या ५५ किलोमीटर विस्तारासाठी डीपीआर व आराखडा तयार करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हायब्रिड ॲन्युइटी योजनेतून ८६५ कोटी रुपयांच्या २४० किलोमीटर रस्त्यांच्या कामांना गती देण्यात आली आहे. खरीप २०२६ मध्ये ७६,४७६ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घेतला आहे. भाषणात राज्यातील ३१ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि शेतीपंपांच्या वीजबिलमाफीचा उल्लेख करण्यात आला.

ते पुढे म्हणाले की, महिलांना शेतकरी दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या शिबिरांमधून महिलांना शेतकरी कार्डचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांना बँक कर्ज तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. महिला व आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याचे ते म्हणाले.

**'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चा उल्लेख**

मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यव्यापी ह्यमहा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर यासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे याचाही उल्लेख पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आपल्या भाषणात केला.

**शेतकऱ्यांना कर्ज निरंक प्रमाणपत्र व कर्ज वितरण मंजुरी पत्र पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरित**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ मधील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना कर्ज निरंक प्रमाणपत्र व कर्ज वितरण मंजुरी पत्र पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यामध्ये नोकेश्वर मारोतराव लंगडे व बेबीताई वानखेडे यांना कर्ज निरंक प्रमाणपत्र, तर धनराज डोमाजी गौळकर व लोकेश भोयर यांना कर्ज मंजुरीचे पत्र प्रदान करण्यात आले.

## मृद व जलसंवर्धनासाठी 'रील फॉर सॉईल ॲण्ड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धेत युवकांनी सहभाग घ्यावा! १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताहात रील्स स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने दि. १५ ते २१ ऑगस्ट २०२६ हा कालावधी 'जलसंधारण सप्ताह' म्हणून राबविण्यात येणार आहे. या दरम्यान मृद व जलसंवर्धन ह्यरील्स स्पर्धेचेंह्य आयोजन करण्यात आले आहे.

१५ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इन्स्टाग्रामच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी 'रील फॉर सॉईल अँण्ड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या रील स्पर्धेत युवक - युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे. यानिमित्ताने राज्यव्यापी ह्यमहा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर, जलसंधारणाची शपथ असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे या सप्ताहात मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करावी. सहभागी स्पर्धकांनी व्हिडीओ/रिलच्या सुरुवातीला व्हिडीओ/ रिलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद करणे आवश्यक आहे. स्पर्धकांने तयार केलेली Reel स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करावी.

स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram Account ला Tag करणे बंधनकारक राहील. यासाठी अधिकृत हॅशटॅग #Save Soil Save Water वापरणे अनिवार्य राहणार आहे. रिल्स बनवण्यासाठी माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य हे विषय देण्यात आले आहेत. रील्स करीता गुणांकन पद्धती पुढीलप्रमाणे आहे.

विषय व संदेश-३० गुण, कल्पकता-२५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश-२० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता-१५ गुण, Instagram Engagement -१० गुण असे एकूण - १०० गुण असणार आहेत. केवळ लाईक्स किंवा फॉलोअर्सवर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि सोशल मीडिया एंगेजमेंट या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल. राज्यासाठी एकच अधिकृत #SaveSoilSaveWater हा हॅशटॅग वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रिल्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रिल स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार २५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार १५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार १० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष युवा मृद-जलदूत म्हणून गौरविण्यात येणार आहे.

"एक रील ... मातीसाठी !, एक रील ... पाण्यासाठी !, एक रील ... सुरक्षित भविष्यासाठी !" हा रिल्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे. वरील स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

## बाबासाहेबांच्या अस्थिकलशाला वंदन

## भदंत ससाई यांच्या हस्ते ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय धम्मसेना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते दीक्षाभूमी येथे ध्वजारोहन करण्यात आले.

भदंत सुरेई ससाई यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बाबासाहेबांच्या अस्थिकलशाला वंदन केल्यानंतर बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी समितीचे सदस्य एन. आर. सुटे उपस्थित होते. यानंतर ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान चौक, विमानतळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी इंदोरा बुध्द विहार येथे ध्वजारोहन करण्यात

**संविधान चौक, विमानतळ परिसरात मानवंदना**

आले.

याप्रसंगी भंते नागसेन, भंते महानाग, भंते प्रज्ञा बोधी, भंते संघ, भंते शीलवंश, भिक्खुनी संघमित्रा, संघप्रिया, विशाखा, संघशीला, सुजाता अंबादे, धम्मसेनेचे नन्हा सवाईतुल, धीरज बोरकर, अशोक गोवर्धन, समय शेंडे, अयान सवाईथुल, अमन मेश्राम, कुणाल रामटेके, मितांश सवाईथु, ओमकार अंबाडे, विनीत घरडे, अमन धनवटे यांच्यासह उपासक-उपासिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

## खापरखेड्यात गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील चिंचोली वॉर्ड क्रमांक १ परिसरात एका ४२ वर्षीय इसमाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १६ ऑगस्ट रविवारी सकाळच्या वाजताच्या सुमारास उघडकीस आली. मृतकाचे नाव अविनाश पुंडलिक खोब्रागडे वय ४२ रा. वॉर्ड क्रमांक १, चिंचोली, खापरखेडा, असे आहे.



प्राप्त माहितीनुसार, मृतक अविनाश खोब्रागडे हे आपल्या कुटुंबीयांसह वॉर्ड क्रमांक २ येथे आजीच्या तिसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. यावेळी कोणत्यातरी कारणावरून पती पत्नीत कडाक्याचे भांडण झाल्याची माहिती आहे त्यामूळे मृतक अविनाश निराश होता. अविनाश रात्री आपल्या एकटा परतला व घरातील सर्व सामानाची तोडफोड केली मध्यरात्री दरम्यान अविनाशने गळफास लावून आत्महत्या केली. रविवारी सकाळच्या सुमारास ७ वाजता अविनाशची पत्नी व मुले घरी परतले यावेळी त्यांना अविनाश ने गळफास घेतल्याचे आढळून आले. पत्नी व मुलांनी आरडाओरड केल्यानंतर शेजाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती खापरखेडा पोलिसांना देण्यात आली पोलिसानी घटनास्थळ पंचनामा केला अविनाशचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नागपूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आला पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहेत.

थोडक्यात

## आमगाव शहरात उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा, विविध ठिकाणी ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन आमगाव शहरात विविध ठिकाणी देशभक्तीच्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील शासकीय कार्यालये, पोलीस ठाणे, नगरपरिषद, शैक्षणिक संस्था तसेच विविध सामाजिक संस्था व प्रतिष्ठानांच्या वतीने ध्वजारोहण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आमगाव तहसील कार्यालयाच्या प्रांगणात सौरभ रंगाटे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तहसीलदार मोनिका कांबळे, नायब तहसीलदार सतीश वेलादी, चंद्रशेखर गजभिये, राजेंद्र रहांगडाले, अन्नपुरवठा अधिकारी मनोज राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदनी चांदपुरकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि गणमान्य नागरिक उपस्थित होते. आमगाव पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक नीलकंठ कुकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी, पोलीस पाटील तसेच गणमान्य नागरिक उपस्थित होते.

आमगाव नगरपरिषद कार्यालयातही स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रशासकीय अधिकारी पंकज डहाटे, प्रशासकीय अधिकारी नम्रता सूर्यवंशी, तनवीर सिद्दिकी, शुभम मेश्राम, जयकुमार गायकवाड, पोलीस पाटील नर्मदा चुटे, अधिकारी-कर्मचारी तसेच आठही गावांतील गणमान्य नागरिक उपस्थित होते. केंद्रीय प्राथमिक शाळा, मुले, आमगाव येथे माजी उपसरपंच निखिल पशिने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी लिलाधर बहेकार, पोलीस पाटील नर्मदा चुटे, मुख्याध्यापिका मच्छीरके मॅडम, देवकांत बहेकार यांच्यासह शिक्षक-शिक्षिका आणि नागरिक उपस्थित होते.मार्तंडराव बहेकार जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, आमगाव येथे सामाजिक कार्यकर्ते संतोष श्रीखंडे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शिक्षक-शिक्षिका, पोलीस पाटील आणि गणमान्य नागरिक उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर सर्व ठिकाणी राष्ट्रगीताचे गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. स्वातंत्र्यसैनिक, देशाच्या संरक्षणासाठी बलिदान देणारे जवान तसेच स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या वीरांना यावेळी अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमांदरम्यान मान्यवरांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद करत देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्ये अधिक बळकट करण्याचे आवाहन केले. विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत, भाषणे आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. स्वातंत्र्यदिनानिमित्त संपूर्ण आमगाव शहरात विविध ठिकाणी तिरंगा डौलाने फडकताना दिसून आला. नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे संपूर्ण शहरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## आष्टी ( नवेगाव) येथे नागपंचमी महोत्सवाला सुरुवात, आज महाआरती व महाप्रसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही गट ग्रामपंचायत आष्टी (नवेगाव) व पोस्ट चाचेर अंतर्गत येत असलेल्या आष्टी येथे श्री बापूजी बोवा मंदिर येथे आज रविवार (ता.१६ ऑगस्ट) पासून नागपंचमी महोत्सवाला सुरुवात झाली असून विविध धार्मिक व भक्तीमय कार्यक्रम सुरू आहेत. उद्या सोमवार (ता. १७ ऑगस्ट)ला सकाळी दहा ते दुपारी बारा वाजेपर्यंत ढोल ताशांच्या गजरात संपूर्ण आष्टी गावातून भव्य नगरफेरी, भजन कार्यक्रमानंतर श्री बापूजी बुवा यांची महाआरती, त्यानंतर महाप्रसादाचे वितरण होणार आहे. तरी या कार्यक्रमाच्या लाभ घेण्याचे आव्हान आयोजक समस्त आष्टी ग्रामवासी यांनी केले आहे.

# नितीन गडकरी यांच्या हस्ते 'खासदार चषक' बक्षीस वितरण

### नागपुरचे सेवासदन सक्षम स्कूल आणि स्कूल ऑफ स्कॉलर्स ठरले पहिल्या राज्यस्तरीय 'खासदार चषक'चे विजेते





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बालकला अकादमी आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा प्रथमच राज्यस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या खासदार चषक आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेची अंतिम फेरी रविवार, १६ ऑगस्ट रोजी सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत गट 'अ' मधून नागपूरच्या सेवासदन सक्षम स्कूलने, तर गट 'ब' मधून स्कूल ऑफ स्कॉलर्स, अत्रे लेआउटने प्रथम क्रमांक पटकावत पहिला राज्यस्तरीय 'खासदार चषक' आपल्या नावे केला.

यावेळी मंचावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आमदार संजय भेंडे, जयप्रकाश गुप्ता, शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर, मीराताई चाफेकर, स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख रवींद्र फडणवीस, उपाध्यक्ष विजय घाटे, बालकला अकादमीच्या अध्यक्षा मधुरा गडकरी यांच्यासह परीक्षक पंडित राजाभाऊ काळे, श्याम देशपांडे आणि डॉ. साधना शिलेदार उपस्थित होते. परीक्षकांचा सत्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला. संस्कार भरतीच्या प्रमुख कांचनताई गडकरी देखील कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित होत्या.

परीक्षकांसाठीही ही स्पर्धाच ठरली, कारण उत्तमोत्तम सादरीकरणांमधून विजेत्यांची निवड करणे आव्हानात्मक होते, असे परीक्षक पंडित राजाभाऊ काळे यांनी सांगितले. संगीत आणि साहित्याशी विद्यार्थ्यांना जोडणारा एवढ्या मोठ्या स्तरावरील उपक्रम राबवल्याबद्दल त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे अभिनंदन केले.

पुढच्या पिढीवर संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण काम बालकला अकादमी आणि स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ करीत आहे, असे गौरवोद्गार आमदार संजय भेंडे यांनी काढले. या उपक्रमाचे कौतुक करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीत अशा सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालकला अकादमीच्या अध्यक्षा मधुरा गडकरी यांनी केले. यंदा प्रथमच शालेय सामूहिक गीत स्पर्धा राज्यस्तरीय करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्राथमिक फेरीत राज्यभरातून १०६ शालेय समूहगान चमूंनी सहभाग घेतला. त्यापैकी गट अ आणि ब मधून एकूण ३३शाळांच्या समूहगान चमूंची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली असे त्यांनी सांगितले. सुरेश भट सभागृहात नुकत्याच पार पडलेल्या प्राथमिक फेरीत नागपूर शहर व जिल्ह्यासह मुंबई, पुणे, ठाणे, देवाची आळंदी, धामणगाव, अमरावती, वर्धा, वरूड, उमरेड, यवतमाळ, सावनेर, भिवापूर, चंद्रपूर, बुलढाणा आदी ठिकाणांहून १०६ शालेय चमूंनी सहभाग घेतला. अंतिम फेरीदरम्यान संपदा नासेरी यांनी सूत्रसंचालन केले. समारोपाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी देशपांडे यांनी केले, तर सुबोध आष्टीकर यांनी औपचारिक आभार प्रदर्शन केले.

**गीतांमधून देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जीवनमूल्यांची प्रेरणा : नितीन गडकरी**

देशभक्तीपर गीतांतील शब्द, विचार आणि संगीत यांचा आपल्या मनावर आणि व्यक्तिमत्त्वावर खोल संस्कार होतो. स्वातंत्र्यवीर सावरकर, साने गुरुजी आणि महात्मा गांधी यांच्या गीतांमधून देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जीवनमूल्यांची प्रेरणा मिळते. बालपणी शिकलेली आणि गायलेली ही गीते मुलांच्या मनावर कायमचा ठसा उमटवतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते अधिकाधिक म्हणावीत आणि त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याबद्दल नितीन गडकरी यांनी अभिमान व्यक्त केला. उत्तम नागरिक घडवण्यासाठी चांगले विचार, संस्कार, वाचन, मनन, ऐकणे आणि गाणे यांना विशेष महत्त्व आहे. देशाला विश्वगुरू बनवायचे असेल, तर केवळ नैसर्गिक संपत्ती नव्हे, तर देशभक्त, संवेदनशील आणि मूल्यनिष्ठ नागरिक घडवणे अधिक महत्त्वाचे आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर देशप्रेमाचे आणि संस्कारांचे बीजारोपण होत असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेत बक्षीस मिळणे महत्त्वाचे असले तरी सहभागी होण्याची संधी मिळणे हाच विद्यार्थ्यांसाठी सर्वात मोठा पुरस्कार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

**अशी आहेत पारितोषिके**

**गट अ**

प्रथम : सेवासदन सक्षम स्कूल – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास २,०००- द्वितीय : स्वामीनारायण विद्यालय, नागपूर – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास १,५००, तृतीय : स्कूल ऑफ स्कॉलर्स, वानाडोंगरी – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास - १,२०००,उत्तेजनार्थ : मॉडर्न स्कूल, कोराडी आणि भारतीय कृष्ण विहार, तेलंगखेडी – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास १,०००

**गट ब**

प्रथम : स्कूल ऑफ स्कॉलर्स, अत्रे लेआउट – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास २,०००, द्वितीय : सोमलवार निकालस, नागपूर – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास १,५००, तृतीय : संदीपनी स्कूल, नागपूर – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास १,२००, उत्तेजनार्थ : आर. एस. मुंडले स्कूल आणि चंद्रकांत पाटकर स्कूल, डोंबिवली – सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास १,०००.

## शहर गुन्हे शाखा गुन्हेगारांना करते अटक, मात्र खापरखेडा पोलिस मूग गिळून बसले काय?

### खापरखेड्यातील नागरिकांचा प्रश्न,तडीपार आरोपीला शस्त्रासह ठोकल्या बेड्या, शहर गुन्हे शाखा युनिट-०६ ची खापरखेडा परिसरात कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

नागपूर शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ०६ च्या पथकाने खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तडीपार आरोपीला १५ ऑगस्टला रात्रीच्या सुमारास धारदार शस्त्रासह अटक केली आहे. पवन उर्फ बोडी नरेश नेवारे २८, रा. वॉर्ड क्र. ४, कुचक मोहल्ला, पिपळा डाकबंगला असे आरोपीचे नाव आहे.

माहितीनुसार, १५ ऑगस्ट शनिवारला सायंकाळच्या सुमारास शहर गुन्हे शाखेचे पथक खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यादरम्यान तडीपार आरोपी पवन नेवारे खापरखेडा परिसरात वावरत असल्याची गुप्त माहिती खबऱ्याकडून मिळाली.

माहितीच्या आधारे शहर गुन्हे शाखा पोलिसानी आरोपीचा शोध सुरू केला यावेळी बी-टाईप डब्ल्यूसीएल कॉलनी, वलनी येथील निर्मला घटे यांच्या झोपडीत पवन नेवारे लपून बसून असलेला आढळून आला पोलिसांनी झडती घेतली असता आरोपीकडे लाकडी मूठ असलेला लोखंडी धारदार कोयता मिळून आला, ज्याची अंदाजे किंमत १,००० रुपये आहे. पोलिसांनी शस्त्र जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले आणि त्याची वैद्यकीय तपासणी केली.

या प्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०४/२०२६ अंतर्गत भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ४/२५ सह महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२, १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाईसाठी आरोपी आणि जप्त केलेले शस्त्र खापरखेडा पोलीस ठाण्याच्या रात्रपाळी अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट क्रमांक ०६ च्या पोलीस कर्मचाऱ्यांनी केली आहे मात्र खापरखेडा पोलीस मूंग गीळून बसले आहेत काय? असा संतप्त सवाल नागरिक करीत आहे.

या कारवाईनंतर नागरिकांचा स्थानिक पोलिस प्रशासनावर रोष बघायला मिळत आहे. शहर गुन्हे शाखेला तडीपार आरोपी गवसतात मात्र स्थानिक पोलिसांना आरोपींच्या मुक्त वावरचा थांगपत्ता नसतो. हल्लीच घडलेल्या दगडी चाळ हल्ला प्रकरणानंतर नागरिकांचा रोष वाढत आहे.

## वीरांगना महाराणी अवंतीबाई लोधी यांच्या शौर्यातून युवा पिढीने प्रेरणा घ्यावी : भैरसिंह नागपुरे

### झालिया येथे स्वातंत्र्यसंग्रामातील वीरांगना महाराणी अवंतीबाई लोधी यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

लोधी समाज सालेकसा व आमगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम झालिया येथील अवंती चौकात १६ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यसंग्रामातील वीरांगना महाराणी अवंतीबाई लोधी यांची १९५ वी जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भैरसिंह नागपुरे होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान लोधेश्वर व वीरांगना महाराणी अवंतीबाई लोधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वीरांगना अवंतीबाई लोधी यांच्या अदम्य शौर्य, पराक्रम, धैर्य व देशासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करून त्यांच्या प्रेरणादायी विचारांचा वारसा युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला.

अध्यक्षीय भाषणात माजी आमदार भैरसिंह नागपुरे म्हणाले, वीरांगना महाराणी अवंतीबाई लोधी यांनी देश व समाजासाठी अतुलनीय शौर्य आणि पराक्रमाचे उदाहरण निर्माण केले. समाजातील युवक-युवतींनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहित व राष्ट्रहितासाठी कार्य करावे. तसेच महाराष्ट्रातील लोधी समाजाचा केंद्राच्या इतर मागासवर्गीय यादीत समावेश करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. कार्यक्रमात सालेकसा पंचायत समितीचे माजी सभापती यादनलाल बनोठे, माजी गोंदिया जिल्हा भाजपा अध्यक्ष अधिवक्ता येशुलाल उपराडे, जिल्हा परिषद सदस्य छाया नागपुरे, आलोक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे, झालिया सरपंच कुंजन नवगोडे, उपसरपंच ललित मच्छिरके यांच्यासह समाजातील विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी यादनलाल बनोठे, अधिवक्ता येशुलाल उपराडे, छाया नागपुरे आणि नरेंद्रकुमार लिल्हारे यांनीही आपले विचार व्यक्त करून वीरांगना अवंतीबाई लोधी यांच्या संघर्ष, शौर्य आणि बलिदानावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला ज्ञानिराम दमाहे, जागेश्वर लिल्हारे, चरण डहारे, रामसिंग मच्छिरके, पोलीस पाटील कविता कराहे, गोपीचंद कुराहे, शंकरलाल नागपुरे, युवराज सलाखें, रोशनलाल लिल्हारे, केवलचंद मच्छिरके, युवराज बसोने, ज्ञानिराम बनोठे, राजकुमार बसोने, कवडू बसोने, भोजवंती लिल्हारे, हेमंत बनोठे, कृष्ण कुराहे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते मनोज बनोठे यांनी केले, तर उपसरपंच ललित मच्छिरके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मानवतावादी आरोग्य सेवेसह शैक्षणिक प्रशिक्षणाचे रेड स्वस्तिक सोसायटीचे कार्य अवर्णनीय!

### सम्राज्ञी ताराराणी साहेब भोसले वस्तीगृहाच्या उद्घाटनप्रसंगी माजी कुलगुरू शरद निंबाळकर यांचे प्रतिपादन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रेड स्वस्तिक सोसायटीच्या मानवतावादी आरोग्याच्या अविरत सेवेमुळे कोट्यावधी उपेक्षित आणि गरजवंतांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचं काम रेड स्वस्तिकने करताना अत्यंत दुर्गम भागात गोरगरीब उपेक्षित आणि ज्ञानापासून वंचित असलेल्या गुणवंत मुला मुलींसाठी एनटीपीएससारखे अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र सुरू करून रेड स्वस्तिक सोसायटीने एक नवा आदर्श निर्माण केला असून आज थोर लढवय्या सम्राज्ञी ताराराणी साहेब भोसले ज्यांनी संपूर्ण देश गिळंकृत करण्यासाठी आलेल्या औरंगजेब सारख्या जगातील्या क्रूर शहंशाहाला नामोहरण करून महाराष्ट्राच्या भूमीतच स्वतःहून दफन करायला भाग पाडलं आणि हिंदुस्तान ला महासंकटातून वाचवलेल आहे. अशा शूरवीर लढवय्या मोगल मर्दिनी ताराराणींच्या नावाने ग्रामीण आदिवासी उपेक्षित गुणवंत मुलींसाठी सुसज्य वस्तीगृह तयार करून एक नवा आदर्श निर्माण केला असे गौरोद्गार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. शरद निंबाळकर यांनी उद्घाटनप्रसंगी काढले.

ते पुढे म्हणाले की, इतिहासातील कर्तुत्वान व्यक्तींचा आदर्श समाजासमोर ठेवण्यासाठी त्यांच्या नावाने चालवले जात असलेले उपक्रम अत्यंत अभिनंदनीय व तरुण पिढीवर संस्कार करण्यासाठी काळाची गरज असल्याचेही त्यांनी मार्गदर्शन प्रसंगी व्यक्त करताना डॉ. टी.एस.भाल साहेबां सारख्या अत्यंत सेवाभावी व्यक्तीच्या नेतृत्वाखाली देशभर चाललेल्या मानवतावादी आरोग्य यज्ञाचं सुद्धा डॉ. शरद निंबाळकर यांनी कौतुक केलं.

या वस्तीगृहाच्या उपक्रमासाठी रेड स्वस्तिक सोसायटीच्या वतीने बांधलेल्या नाशिक राव तिरपुडे भरती पूर्व प्रशिक्षण शाळेच्या परिसरातील मुलीं साठी बांधलेल्या "सम्राज्ञी ताराराणी साहेब भोसले " यांच्या नावाने सुसज्ज वस्तीगृहासाठी रेड स्वस्तिक सोसायटीच्या वरिष्ठ संचालिका मुंबईच्या डॉ.रंजनबेन कोठारी व त्यांच्या परिवाराने भरघोस आर्थिक मदत केलेली आहे.

८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर या शानदार सोहळ्याचे उद्घाटन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. २० एकर मध्ये साकारलेल्या निसर्ग रम्य अशा या प्रशिक्षण केंद्रामध्ये उच्च प्रशिक्षित मार्गदर्शक, तज्ञ प्राध्यापकांच्या द्वारे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, ऑडिओ - व्हिजुअल क्लासरूम, सर्व प्रकारच्या पुस्तकांचे वाचनालय, सुसज्ज अभ्यासिका, भव्य संगणक कक्ष, ४००मीटर ऑलम्पिक साईज रनिंग ट्रॅक, प्रशस्त क्रीडांगण, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वस्तीगृह यासह विविध परीक्षांचे



प्रशिक्षण मोफत देण्याचा उपक्रम गेल्या ७ वर्षापासून सुरू असून या कालावधीत या परिसरातील अत्यंत गरीब कुटुंबातील १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सैनिक, पोलीस, फॉरेस्ट, बँक पासून विविध शासकीय सेवेत प्रवेश मिळालेला आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तुमसरचे ज्येष्ठ संचालक सि.एल.टावरी यांनी भूषविले. या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध डॉ. प्रवीण डबली, एनटीपीएसचे सह केंद्र संचालक रेड स्वस्तिक सोसायटी नागपूरचे सचिव प्राचार्य जगन्नाथ गराट, रेड स्वस्तिक सोसायटीचे संस्थापक व प्रमुख मार्गदर्शक डॉ. टी एस भाल, सहमहाव्यवस्थापक अशोक शिंदे, अर्जुन घुगल, श्रीलाल बमनोटे, तुलसीराम देशमुख, प्रकाश तितरमारे, मनोहर कापगते, अकरलाल पटेल, किशोर पटले, मनोज टावरी,जिल्हा परिषद सदस्य बमनोटे, हेमंत जैन,प्रेम बिरादार, सरपंच पंचमभाऊ चौधरी,जयंत देशपांडे, हे मान्यवर उपस्थित होते.

या देखण्या सोहळ्यासाठी मुख्य प्रशिक्षक संदीप गवई, परशराम भड, वासुदेव निघोट, श्री.वामन निचनते, गोविंद भाल, तुकाराम केंद्रे, चंद्रप्रकाश गराट,गंगाराम बविस्ताले, यांच्यासह सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## सावनेर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

आज संपूर्ण देशात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी अशीर्या जुही,नगर पालीकेचे उपाध्यक्ष राजु घुगल यांच्या प्रमुख उपस्थितीत, नगराध्यक्षा संजना मंगळे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तर जयस्तंभ बाजार चौकात शहर काँग्रेस समितीचे अध्यक्ष पवन जयस्वाल यांच्या हस्ते शहर काँग्रेस समितीचे सचिव दीपक बसवार आणि शहरातील मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले, तर पोलीस स्टेशन सावनेर येथे पोलीस स्टेशन प्रभारी ऋतुजा जाधव आणि सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यासोबतच शहरातील सर्व सरकारी आणि गैरसरकारी कार्यालयांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात उपविभागीय अधिकारी कल्याणकुमार डहाट यांनी तहसीलदार अक्षय पोयम, सावनेर पोलीस उपविभागाचे उपविभागीय अधिकारी सागर खर्डे, तहसीलचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत शहराचा मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी सर्व शालेय विध्यार्थी शिक्षक, स्वातंत्र्यसैनिक, प्रतिष्ठित नागरिक इत्यादींच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी सावनेर पोलीस आणि होमगार्डचे सैनिक, एनसीसी कॅडेट्स यांनी मार्गदर्शन केले आणि राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

१५ ऑगस्ट रोजी सकाळपासूनच विद्यार्थी आणि स्वातंत्र्यप्रेमी उत्साहात होते. राष्ट्रध्वजाला सलामी देण्यासाठी सर्वजण उत्सुक होते. शहरातील चौकांमध्ये फुगे, राष्ट्रध्वज आणि साउंड सिस्टम लावण्यात आले आणि शालेय विद्यार्थ्यांच्या रॅलींचे देशभक्तीपर गीतांनी उत्साहाने स्वागत करण्यात आले. स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त सावनेर तहसील कार्यालय, नगर परिषद कार्यालय, पोलिस ठाणे आणि सर्व सरकारी आणि गैर-सरकारी इमारती फुगे, फुले आणि विद्युत दिव्यांनी सजवण्यात आल्या होत्या. याप्रसंगी सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तेजसिंग सावजी, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर धुंडेले, शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष दिलीप घटे, प्रा. योगेश पाटील,माजी नगरसेवक डोमासव सावजी, मुकेश झारबडे आदी मान्यवरांसह सर्व शाळेचे मुख्याध्यापक, प्राथमिक आरोग्य केंद्र सावनेरचे शिक्षक, नगरपरिषदेचे खासगी आरोग्य अधिकारी, नगरपरिषदेचे शिक्षक, आरोग्य अधिकारी आदी उपस्थित होते. जयस्तंभ बाजार चौकात शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पवन जैस्वाल यांच्या हस्ते ध्वजारोहण प्रसंगी माजी नगरसेविका मायाताई बुंदेले, अश्विन करोकर, चंदू कामदार, दिलीप फाले, अरुण कळंबे रमेश दरवई,सैदु शेख, प्रल्हाद सेंबेकर आदींसह शहरातील शेकडो मान्यवर व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवर, विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची शपत घेतली.

## मातोश्री वृद्धाश्रम, आदासा येथे स्वातंत्र्यदिन

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**



भारतीय आदिम जाती सेवक संघ विदर्भ नागपूर द्वारा संचालित मातोश्री वृद्धाश्रम आदासा येथे भारतीय स्वातंत्र्याचा आणि ८० वा स्वतंत्रता दिवस फार मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेश कुमार मालवीय संस्थेचे सचिव विजय शेंडे सर सहसचिव अरुण मोरे वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक प्रदीप चंदनबटवे हे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हरिचंद्र सावंत, प्रास्ताविक प्रदीप चंदनबटवे तर आभार प्रदर्शन शरद चव्हाण यांनी मानले.

## संविधानाचा गौरव राष्ट्रभक्तीचा जागर

### अरविंद इंडो पब्लिक स्कूलमध्ये उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर (हेटी)**



अरविंद इंडो पब्लिक स्कूल येथे प्रजासत्ताक दिन देशभक्तीमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर करून तिरंग्याला मानवंदना दिली. या कार्यक्रमात शाळेचे संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, परिसरातील इतर कर्मचारी आणि पालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन (इयत्ता १०) कुमारी गुंजन मदनकर व समीक्षा धुंदे या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले शाळेचे संचालक अँड. चंद्रशेखर बरेठिया यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली.

## विमला पांडे का निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



कत्थक नृत्य गुरु श्री मदन पांडे की धर्मपत्नी एवं कैप्टन भास्कर पांडे की माताजी श्रीमती विमला पांडे का शनिवार को निधन हो गया। वे ८१ वर्ष की थी। उनका अंतिम संस्कार रविवार १६ अगस्त को फ्रेंड्स कॉलोनी स्थित श्मशान घाट पर किया गया। वे अपने पीछे भरापूरा परिवार छोड़ गई है।

# जलपर्णीमुक्त अंबाझरी तलावात नितीन गडकरी, महापौर यांनी घेतला नौका विहारचा आनंद

उत्तम कार्य करणाऱ्यांचा सत्कार





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून अंबाझरी तलाव जलपर्णीच्या विळख्यातून पूर्णतः मुक्त होण्याच्या मार्गावर असून, या निमित्ताने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महापौर निता ठाकरे यांनी जलपूजन करून अंबाझरी तलावात नौकाविहारचा आनंद घेतला. अग्निशमन विभागाच्या बोटीतून करण्यात आलेल्या या नौकाविहार प्रसंगी नगरसेवक व मनपाचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमात खासदार माया ईवनाते, आमदार संजय भेंडे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार डॉ. परिणय फुके, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, माजी आमदार प्रा. अनिल सोले, मनपाच्या परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, एआयएमआयएमचे गट नेते शकील पटेल, इंडियन मुस्लिम लीगचे गट नेते असलम मुल्ला, मनपाच्या विशेष समिती सभापती अश्विनी जिचकार, कु.निधी तेलगोटे, दर्शनी धवड, संतोष देवी लड्ढा, झोन सभापती धनश्री देशपांडे, तारा यादव, आसिफ शेख, सीमा डवरे नगरसेवक विजय झलके, जितेंद्र कुकडे, विनोद कन्हेरे, मनोज साबळे, अभिजीत झा, विजय होले, विनय दाणी, यांच्यासह मनपा आयुक्त डॉ विपीन, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, वनविभागाचे हाडा, मनपाच्या अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम, धनंजय जाधव यांच्यासह इतर विविध समितीचे सभापती, नगरसेवक तसेच अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील काही महिन्यांपासून जलपर्णीच्या विळख्यातून अंबाझरी तलावाला मुक्त करण्यासाठी मनपाचे प्रयत्न सुरू होते. महपौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सत्तापक्ष नेते, मनपा आयुक्त व नगरसेवक योगेश पाचपोर यांनी अंबाझरीला जलपर्णी मुक्त करण्यासाठी अथक प्रयत्न केले. दर आठवड्यात त्यांनी या ठिकाणी भेट देऊन जलपर्णी काढण्याच्या प्रगतीची पाहणी केली आणि त्यांच्या प्रयत्नाला यश आले प्राप्त झाले आहे.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, नागरिकांचा सुखांक वाढविण्याचे उत्तम कार्य नागपूर महानगरपालिकेमार्फत केले जात आहे, ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा जलपणीर्मुक्त अंबाझरी तलाव आहे. तसेच त्यांनी अंबाझरी तलावात एमआयडीसी व वाडी येथून प्रदूषित पाणी येणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे असून, वारंवार सूचना देऊनही पाणी आल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल अशी ताकीद दिली. याशिवाय नागरिकांसाठी अंबाझरी तलावात वॉटर स्पोर्ट्स सुरू करण्यात यावेत अशी इच्छा व्यक्त केली. तसेच कवीवर्य सुरेश भट सभागृहात बाल चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्याचे सुचवत यासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सवाद्वारे स्पॉन्सरशिप दिली जाईल असे स्पष्ट केले. तर नीरी मार्फत तलावात येणाऱ्या पाण्याची बीओडी व सीओडी चाचणीचा अहवाल मागवण्याचे निर्देश त्यांनी दिले. सोबतच, स्वच्छता मोहीम राबविल्याबद्दल स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे व नगरसेवक योगेश पाचपोर यांचे विशेष अभिनंदन केले. भांडेवाडी येथील कचरा वर्गीकरण व बायोसीएनजी प्रकल्पामुळे शहर स्वच्छ होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महापौर निता ठाकरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अंबाझरी तलाव हा केवळ एका प्रभागाचा नसून संपूर्ण नागपूर शहराचे वैभव आहे. जलपर्णीमुळे हा तलाव झाकोळला गेला होता, परंतु सर्वांच्या सहकार्याने व समन्वयाने त्याचे गतवैभव पुन्हा प्राप्त झाले आहे. कमी खर्चात इतर विभागांची मदत घेऊन यशस्वी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी मनपा आयुक्त डॉ. विपिन यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांनी जलपर्णी प्रदूषणमुक्त करण्यासाठी तलावात गॅब्रिज ब्रिज बांधल्याचे सांगत, अहोरात्र मेहनत घेऊन पोकलेन व जेसीबी मशीनच्या सहाय्याने हे कार्य कसे पूर्ण झाले याची माहिती दिली. तसेच या उपक्रमासाठी मनपाला इतर सर्व विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले तर आभार प्रदर्शन नगरसेवक योगेश पाचपोर यांनी मानले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अंबाझरी तलाव जलपर्णीच्या विळख्यातुन मुक्त करण्यासाठी कार्य करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यात एक्वेहेटिक वीड हार्वेस्टर मशीन आटोक्राय मशीनरी हैदराबादच्या कार्यकारी अधिकारी संतोषी बुद्धिराजू, सर्वश्री अविनाश कावरे, संजय कारिया, सुरेश लोहकर, मुलचंद कापसे, सूरीबाबू किलारी, मिलिंद मोंबे, डायमंड, शर्मा, मनपाच्या अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, एफडीएमचे अधीकारी श्रीकांत पाटील,वन विभाग अधिकारी ममता भोसले, वैशाली लिखारे, शीतल शिंदे, मेट्रोचे पार्कचे अधिकारी पुरुषोत्तम कडू, व अग्निशमन चे जवान यांचा समावेश होता.

# मनपाद्वारे माजी सैनिकांच्या निवासस्थानी 'नामफलक'

## स्वातंत्र्यदिनी देशसेवकांचा सन्मान, आठ माजी सैनिकांच्या घरासमोर नामफलक





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

देशरक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या आणि सीमांवर शौर्य गाजविणाऱ्या माजी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून माजी सैनिकांच्या निवासस्थानासमोर सन्मानपूर्वक नामफलक लावण्यात आले. स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांच्या संकल्पनेतून आणि मा. महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

मनपाच्या वतीने प्रथमतः आठ माजी सैनिकांच्या निवासस्थानासमोर त्यांच्या नावाचे विशेष नामफलक लावण्यात आले. या नामफलकावर संबंधित माजी सैनिकांचे नाव, हुद्दा/रँक तसेच त्यांनी सेवा बजावलेल्या सैन्यदलाची माहिती मराठी व इंग्रजी भाषेत नमूद करण्यात आली आहे. महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर आणि स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, नगरसेवक विनय दाणी, योगेश पाचपोर यांच्या हस्ते विविध ठिकाणी नामफलकांचे अनावरण करण्यात आले.

यामध्ये माजी स्वातंत्र्यसैनिक सुधाकर नामदेवराव मोरे यांच्या निवासस्थानासमोरील नामफलकाचे अनावरण महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षात देशाच्या रक्षणाचे काम करणारे सेना अधिकारी यांच्या घरापुढे नाम फलक लावण्याचा निर्णय मनपातर्फे घेण्यात आला आहे. अशी तरतूद स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी मनपाच्या अर्थ संकल्पात देखील केली आहे.

निवृत्त कमांडर गुरुबचन सिंह कंवल यांच्या निवासस्थानासमोरील नामफलकाचे अनावरण स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय सेनेचे शहीद नायक सुनील काशिराम नखाते तसेच वीरनारी कल्पना सुनील नखाते यांच्या निवासस्थानासमोरील नामफलकाचे अनावरण सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी माजी सैनिकांच्या त्यागाचा आणि देशभक्तीचा सन्मान करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात या उपक्रमासाठी विशेष आर्थिक तरतूद केली आहे. भूदल, नौदल आणि वायुदल या तिन्ही सैन्यदलांमध्ये सेवा बजावलेल्या ज्येष्ठ माजी सैनिकांनी देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत निष्ठेने कर्तव्य पार पाडले आहे. त्यांच्या कार्याची ओळख समाजातील प्रत्येक नागरिकाला व्हावी आणि तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम व देशभक्तीची भावना अधिक दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

माजी सैनिकांच्या घरासमोर लावण्यात आलेला हा नामफलक केवळ सन्मानाचे प्रतीक नसून, त्या परिसरात राष्ट्रसेवा केलेला एक माजी सैनिक वास्तव्यास असल्याची अभिमानाची जाणीव करून देणारा आहे. या उपक्रमामुळे माजी सैनिकांप्रती नागरिकांच्या मनात आदर, सन्मान आणि कृतज्ञतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. नामफलक लावण्यात आल्याने माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरही आनंद आणि अभिमानाचे भाव उमटले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी क्रीडा सभापती दर्शनी धवड यांचेही सहकार्य लाभले. तसेच क्रीडा अधिकारी पीयूष अंबुलकर यांनी सक्रिय सहभाग व समन्वय साधत उपक्रमाच्या अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नागपूर महानगरपालिकेचा हा उपक्रम देशासाठी सेवा बजावलेल्या माजी सैनिकांना कृतज्ञ अभिवादन करणारा असून, त्यांच्या राष्ट्रसेवेची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

# मंगलदिप नगर येथे स्वातंत्र्य दिन साजरा





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री गुरुदेव सेवा मंडळ, मंगलदिप नगर, दक्षिण नागपूर येथे ८० वा" स्वातंत्र्य दिन" मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मान्यवरांनी दिपप्रज्वलन करुन राष्ट्रपिता महात्मा गांधी व संविधानाचे जनक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली. कमलाकरजी बैतुले वरिष्ठ नागरिक यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुरलीधरजी गोहणे दादा-अध्यक्ष, कर्मयोगी तुकारामदादा गीताचार्य विचार प्रतिष्ठान नागपूर, प्रकाश उपासनी-वरिष्ठ नागरीक मंगलदिप नगर, कांताताई राऊत अध्यक्ष गुरुकुंज निधी लिमिटेड कंपनी नागपूर यांच्या उपस्थितीत मानवंदना देण्यात आली स्वातंत्र्य दिन चिरायु होवो, भारत माता की जय, वंदेमातरमच्या जय घोषाने परिसर दुमदुमला.

स्वातंत्र्य दिनाच्या महत्वावर अध्यक्षीय भाषणात मुरलीधरजी गोहणे दादा यांनी १९४२ चा संघर्ष इंग्रजांच्या दडपशाही विरोधातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी तीव्र आंदोलनाची चळवळ उभी केली क्रांतिकारी भजनाच्या माध्यमातून गावागावात क्रांतिचा संघर्ष सुरू झाला. वंदनीय महाराजांनी. कहीं मानो भारत बांशिधों अब आई बिपत बड़ी भारी जागो जागो भारतवासियों आई अब बिपत बड़ी भारी. क्रांतिकारी विचार भजने, धर्मसेवा, आरती मंडळ, स्थापन करुन संघटित केले. संघटित व्हा संघर्ष करा असा मुलमंत्र दिला. ९ आँगस्ट १९४२ क्रांतीची लाट चिमुर आष्टी विदर्भातील तरुणांनी इंग्रजांच्या दडपशाही विरोधात संघटित होऊन इंग्रजी सत्तेचा ध्वज उतरवुन भारतीय ध्वजारोहण केले. तो दिवस क्रांतीदिन म्हणून साजरा केला जातो. स्वातंत्र्यसंग्रामात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मोठे योगदान आहे. कु. निधी दिलीपराव कापसे यांनी गीत प्रस्तुत केले. उपस्थितीत कमलाकर बैतुल दादा, प्रकाश उपासनी, प्रविण वाटाने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

सुत्र संचालन निशांत चंद्रभानजी राऊत (सचिव), आभार प्रदर्शन चंद्रभान राऊत (सेवाधिकारी) श्री गुरुदेव सेवा मंडळ,राष्ट्रवंदनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री एकनाथजी घोडे, वैभव राऊत, दर्शन नेव्हारे, शरदजी उमाळे, किरणजी डोळस, राजुजी लाखे, खुशालजी पांडे, लक्ष्मणराव धोटे, जितेंद्रजी पटले, आशिष कुरडकर. पुरुषोत्तमजी वाटाने यांच्यासह महिलांनी ही मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली.

महिलांमध्ये प्रतिक्षा निशांत राऊत, मिना पाटील, कांताताई खोडे, सरोजताई भाटी, रंजनाताई घोडे, गायत्री सिंह, अनिता लोखंडे, पुष्पाताई काकडे, रजनीताई राणे, कल्पना आष्टणकर, स्वाती भोंगारे, अनिताताई पांडे, ऊर्वशी पाटील, अन्नपूर्णा रोकडे, कुसुमताई कापसे यांनी अथक परिश्रम घेऊन स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम यशस्वी केला.

# नगरधन येथील दुभंगलेले शिवलिंग : भक्तीचा सात्विक इतिहास


सुरेश धोपटे
अध्यक्ष कोटेश्वर देवस्थान नगरधन


प्रशांत कामडी
माजी सरपंच, नगरधन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
**हर्ष कनोजे**

किल्लाप्रमाणेच पर्यटकांना खुणावणारे नगरधन येथील दुसरे पर्यटन स्थळ म्हणजे दुभंगलेला शिवलिंगाचा इतिहास सांगणारे धार्मिकदृष्या महत्त्वपूर्ण असलेले हेमाडपंथीय कोटेश्र्वर मंदिर होय. विदर्भात इतरत्र कुठेही न आढळणारे दुभंगलेले शिवलिंग भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे, हेमांडपंथीय कोटेश्वर मंदिरातील हे दुभंगलेले शिवलिंग भक्तीचा सात्विक इतिहास असून या दुभंगलेला शिवलिंगांमागे एक आख्यामिका असून ती एका फलकावर लिहिलेली आहे. ती आख्यायिका अशी प्राचीन काळी एक गवळण या मंदिरातील महादेवाची अत्यंत निष्ठेने पूजा करीत असे. बाजारात दूध विकण्यापूर्वी महादेवाला, शिवलिंगाला ती थोडे दूध अर्पण करायची.





महादेवाच्या कृपने तिच्याकडील दुधाला चांगला भाव येऊन तिला चांगले पैसे मिळायचे व ती लवकर घरी परतायची. इतर गवळणींना दूध विकून घरी परतायला वेळ लागत असे. त्यामुळे तिच्या पतीला तिच्या चारित्र्यावर संशय आला. आपली पत्नी मंदिरात तिच्या प्रियकरास भेटख्यास जात असावी असा त्याचा समज झाला व एक दिवस तो तिच्यावर पाळत ठेवून होता. गवळण घरून निघताच तो गवरुणीमागे प्रियकराला व गवळणीला ठार मारावे म्हणून हातात भाला घेऊन गेला. गवळण मंदिरात पोहचली. तिला माहिती होते की पत्ती आपल्या मागे येत आहे. पती ठार मारल म्हणून गवळणीने शंकरानी आपल्याला आश्रम द्यावा म्हणून प्रार्थना केली. तिच्या प्रार्थनेने शिवलिंग दुभंगले आणि त्यामध्ये त्या गवळणीने उडी घेतली.

मग ते शिवलिंग पूर्णपणे साधले गेले नाही. तेव्हा त्या गवळ्याने रागात येऊन भालाने प्रहार केला. त्यामुळे लिंगावर पडलेले छिद्र अद्यापही कायम आहे उडी घेतल्यानंतर काही वर्षापर्यंत या लिंगात हात टाकला असता त्या गवसबीचे केस होताला रागायचे अशी अमन्यायिका आहे. 'जी स्थाने रम्य आणि उत्तम म्हणून प्रसिध्द आहेत त्यात पहिले वैकुंठ, दूसरे नंदीवर्धन (नगरधन), तर तिसरे मेखला हे आहेत. द्वारकेत रास करणे, नंदीवर्धन (नगरधन) क्षेत्री वास करणे, किंवा मेखला क्षेत्री वास करणे तिन्हीचे कार्य समान आहेत. प्रभास क्षेत्री वास करुन सोमेश्वराच्या दर्शनाने जे फक प्राप्त होते तेच फळ नंदीवर्धन (नगरधन) येथे वासू करून श्री. प्रभू रामचंद्राच्या (रामगड, रामटेक) दर्शनाने प्राप्त होते' अशी माहिती प्राचीन सिंधुरागिरी पुराणामध्ये सहाव्या अध्यायात पृष्ठ क्रमांक १३ वर आहे, अशा याकोटेश्वर मंदिरात श्रावणमासात भाविकांची गर्दी असते, तर महाशिवरात्रीला रामटेक तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा कोटेश्वर मंदिशाच भरत असून भाविक भक्त मोठ्या संख्येने दुभंगलेल्या शिव- लिंगाचे महादेवाचे व कोटेश्वर महाराजाच्या प्रतिमेचे दर्शन घेतात.

तीन दिवसीय या यात्रेत सर्व नगरधनात सर्वत्र महादेवाच्चा गावांचा गजर असतो. संपूर्ण नगरधन शिवरात्रीच्या काळात हर हर महादेवच्चा' घोषणांनी, गजराने दुमदुमून जाते. मंदिरातील शिवलिंग म्हणजे विदर्भात इतरत्र कुठेही न आढळणारे आगळेवेगळे व धार्मिकदृष्ट्या श्राध्दिक महत्वपूर्ण असून संपूर्ण विदर्भात प्रसिद्ध आहे.एकंदरीत नगरधन किल्ला व कोटेश्वर मंदिरातील दुभंगलेले शिवलिंग पर्यटकांच्या अभ्यासकांचा, व इतिहासप्रेमींच्या आकर्षणाचे केंद्रबिंदु ठरत आहे.

मंदिरालागून तलाव असून मंदिरापासून अर्धा किलोमीटर अंतरावर वाकाटक कालीन किल्ला असून किल्ल्यामधील आंत मध्ये बावडी मध्ये दुर्गा देवीचे मंदिर आहे तसेच किल्ल्याजवळ पुष्करणी नामक धार्मिक स्थळ असून महादेव मंदिर व शिवलिंग नंदी आहे.

मंदिरात सुसज्ज असून मंदिरामध्ये मोठा दुमजली हॉल आहे या मंदिरामध्ये स्वच्छतागृह व इतर सुविधाही उपयुक्त असुन पाणी यांची सुविधा असून मंदिर दिवसेंदिवस विकसित होत आहे धार्मिक दृष्टा असलेल्या हॉलच्या सुविधामुळे लग्नकार्य ही येथे पार पडतात मंदिराच्या जीर्णोद्धार पूर्णपणे झालेला असून आहे.

मध्य प्रदेश व विदर्भाची राजधानी असलेल्या नगरधन वाकाटककालीन किल्ला असुन पुर्वीच्या काळात ९ राज्यांनी राज्य करुन होऊन गेल्याची ख्याप्ती आहे. किल्ला कोटेश्वर देवस्थान पुष्करणी नंदी पुरातन काळचे असून बनारस मध्ये शिवपुराण सुरू असताना नगरधन येथील नंदी शिवपुराण कान देत ऐकत असल्याचे शिवपुराण मध्ये अशी उल्लेख असल्याचे आढळलेले आहे. असून नंदी वरून या गावाचे नाव नंदिग्राम होते नंतर नंदीवर्धन झाले व आता नगरधन या नावाने या गावाची ओळखले जातात, अशी माहिती कोटेश्वर देवस्थान, नगरधनचे अध्यक्ष सुरेश धोपटे यांनी दिली.

कोटेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्र क दर्जा प्राप्त असून मंदिराचे काम प्रगतीपथावर आहे, पण ज्याप्रमाणे मंदिराचा व परिसराच्या विकास व्हायला पाहिजे तसं झालेला नाही निधीच्या अभावामुळे मंदिराला लागून असलेले तलावा सभोवताल पायऱ्या करून तिथे बोटिंगची सोय उपलब्ध केल्यास या मंदिराला व परिसराला भाविकांना व पर्यटकांनमुळेच चालना मिळेल व स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल, असे प्रशांत कामडी, माजी सरपंच, नगरधन यांनी यावेळी मत व्यक्त केले.

# दूध पिल्यामुळे सर्प पडतात आजारी

## नागपंचमी उत्सव, दूध पाजणे अंधश्रध्दा





**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
**(हर्ष कनोजे)**

नैसर्गिक जैवविविधतेत सापांचे महत्व अन्नन्यसाधारण आहे.त्यात श्रावण महिण्यात वातावरणात बदल होतो. त्यामुळे सर्वाधिक साप आढळून येतात. त्यानुसार नागपंचमीला सापांची पूजा केली जाते. त्याला दूध पाजले जाते, परंतु साप कधीही दूध पित नसून ही केवळ अंधश्रध्दा आहे. दुधामुळे साप अशक्त होवून आजारी पडतात, किंबहूना त्याचा सभाव्य मृत्यूदेखील होवून शकतो. त्यामुळे नागपंचमीला नागाला किंवा सापला दूध पाजू नये, असे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे. नागपंचमी हा सण दरवर्षी श्रावण महिन्यात शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी साजरा केला जातो. हिंदू संस्कृतीमध्ये नागाला देवाचे स्थान दिले आहे. त्यामुळे नागपंचमीच्या दिवशी सुवासिनी नागांची पूजा करतात. यामध्ये अनेक पौराणिक कथा आहेत.

नागाची पूजा केल्याने आशिर्वाद मिळतात व तो कुटुंबाला कधीही हानी पोहोचवत नाही. त्यामुळे सापांप्राती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नागपंचमीला आजही ग्रामिण भागांत शेतशिवारात जाऊन नागाची पूजा केली जाते. तसेच काही ठिकाणी आजही सापाला दूधही पाजले जाते. असे असले तरी समाजात सापांविषयी आजही अनेक गैरसमज दिसून येतात. नागपंचमीला साप दूध पितात, हा एक मोठा गैरसमज आहे.त्यासाठी वन्यजिव प्रेमी सर्पमित्रांकडून वेळोवेळी जनजागृती करण्यात येत आहे. नागपंचमीला सांपाना दूध पाजू नये, असे आवाहनही करण्यात येते मात्र तरीदेखील दरवर्षी नागपंचमीला एकाच दिवशी दूध पाजल्याने देशभरात हजारो सापांच मृत्यू होतो.

दूध पाजणे, ही अंधश्रध्दा आहे. साप हा बेंडूक, उंदिर, कीटकपक्षांची अंडी व अन्य छोटे सरपटणारे प्राणी खाऊन उदरनिर्वाह करतात. निसर्गाच्या अन्नसाखळीत सापांचे विशेषश महत्व आहे. त्यामुळे साप हा शेतकऱ्यांचा मित्र संबोधला जातो. याशिवाय तालूक्यात आढळणाऱ्या सापांपैकी केवळ चार ते पाच प्रजातीचे साप हे विषारी आहे. त्यामुळे त्यांना मारु नका.

सर्पमित्रांशी संपर्क साधा असे अहे आवाहनही सर्पमित्रांनी केला आहे. तालूक्यातील केवळ चारच विषारी साप नाग, मण्यार, घोणस, फुरसे या चार जातीचे विषारी तर हरणटोळ मांजऱ्या हे निमविषारी साप आढळून येतात. याव्यतिरिक्त तस्कर, धामण, कवड्या, आदी जातीचे बिनविषारी साप आढळतात. त्यामुळे साप दिसल्यास त्याला न मारता तत्काळ सर्पमित्रांना संपर्क साधून सापाला निसर्गाच्या सान्निध्यात सोडणेच योग ठरते.

### अप्रशिक्षित हौसी सर्पमित्रांना आळा घाला



सर्प पकडणे हे शौर्याने काम नाही, तर सावधगिरी आणि समयसुचकतेचे काम आहे. मात्र आजरोजीअप्रशिक्षित व हौशी सर्पमित्रांचा सर्वत्र सुळसुळाट झालेली आहे. अपुरे प्रशिक्षण व हौस पूर्ण करण्यासाठी हे सर्पमित्र सर्प पकडून त्याचे फोटो समाज माध्यमावर व्हायरल करतात. काहींना सापांची ओळख देखील राहात नाही. अशा स्थितीत निष्काळजीपणामुळे एखाद्या अप्रशिक्षित सर्पमित्राचा जीव देखील जाऊ शकतो.

**– सागर धावडे, प्राणी व सर्पमित्र**

### तंत्रमंत्रांनी सापाचे विष उतरत नाही



साप चावल्यास आजही अनेक ठिकाणी अंधश्रध्दा बाळवून मांत्रिकांद्वारे उपचार घेत असल्याने काही ठिकाणी दिसून येते.अनेक ठिकणी जडीबुटीचा प्रयोग करुन सापाचे विष उतरविण्याचा प्रयत्न होतो. तर काहीजण साप विषारी आहे की नाही याकरिता त्याला शोध घेत असतात. यामध्ये वेळ वाया जाऊन प्रसंगी सर्पदंश झालेल्या व्यक्तीचा मृत्यू देखील होतो. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून कुठल्याही भ्रमात न राहता थेट नजीकच्या ग्रामिण अथवा जिल्हा रुग्णालयात उपचार घेणे सोयीचे आहे.

**–निलेश विश्वकर्मा, सर्पमित्र**

# इंग्रजांच्या भुमित इंग्रज अधिकारी कर्झन वायलीची हत्या करणारे महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा


रमेश लांजेवार
नागपूर



मदनलाल धिंग्रा यांचा जन्म १८ सप्टेंबर १८८३ ला अमृतसर येथे उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील एक ख्यातनाम डॉक्टर होते आणि बंधू बॅरिस्टर होते. मदनलालांचे शिक्षण अमृतसरला झाले. ते पंजाब विद्यापीठातून बी. ए. झाले व १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तत्पूर्वी विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह झाला. इंग्लंडमध्ये त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचा अभ्यास केला. तेथील वास्तव्यात त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर,श्यामजी कृष्णवर्मा, हरदयाळ शर्मा वगैरे क्रांतिकारकांशी स्नेह जमला व तेथूनच त्यांच्या हृदयात क्रांतीची मशाल धकधकायला लागली.

इंग्लंडमध्ये शिकत असताना त्यांनी सर विलियम कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या केली. या घटनेचा २० व्या शतकातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील पहिल्या क्रांतीकारी घटनांपैकी एक म्हणून उल्लेख केला जातो. मदनलाल धिंग्रा होमरूल लीग व सावरकरांच्या अभिनव भारत या संस्थांचे सभासद झाले. त्यांच्या भावनाप्रधान मनावर खुदिराम बोस व कन्हैयालाल या क्रांतीवीरांच्या बलिदानाचा फार मोठा परिणाम झाला होता.त्यांनी सशस्त्र क्रांतिवीरास साजेसे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी भारताच्या मंत्र्याचा स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली याच्या खुनाचा कट रचला. त्यांचा पहिला बेत फसला.

पुढे १ जुलै १९०९ रोजी इंपीरियल इन्स्टिट्यूटच्या जहांगीर हाऊसमध्ये इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी त्यांनी कर्झन वायली यावर गोळ्या झाडल्या व त्यांची हत्या केली.कारण बंगालची फाळणी करण्यात कर्झन वायलीचा हात होता व भारतात ब्रिटिश सरकार व्दारे भारतीयांची अमानवी हत्या त्यांना पहावली नाही व अमानवी हत्यांचा बदला घेण्याच्या उद्देशाने इंग्लंडमध्ये म्हणजे त्यांच्या घरात घुसून कर्झन वायलीची हत्या केली व एक देशभक्त पूर्ण कृत्याच्या स्वरूपात विल्यस कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याला यमलोक पोहचविले व विदेशात जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करणारा २० व्या शतकातील पहिला स्वतंत्र चळवळीतील क्रांतिकारक म्हणून मदनलाल धिंग्रा यांचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतले जाते.

या खुनाबद्दल मदनलाल धिंग्रा यांना अवघ्या महिन्याभरात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली व १७ ऑगस्ट १९०९ ला इंग्लंडच्या पेन्टोनव्हिल तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली व क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा भारत माता की जयच्या उद्घोषात हसत हसत फासावर गेले.अशा महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा यांना कोटी कोटी प्रणाम.फाशीवर जाण्यापूर्वीच्या शेवटच्या वक्तव्यात मदनलाल धिंग्रा म्हणले आहे "आत्म बलिदान कसे करावे ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानात देण्यायोग्य आहे.

ही शिकवण देण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वतःचे बलिदान करून मोकळे होणे होय".१७ ऑगस्ट १९०९ हा दिवस कुणीही सच्चा देशभक्त कधीही विसरणार नाही. कारण याच दिवशी सर विल्यम हट कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा हसत हसत फासावर चढले.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी थोर क्रांतीकारकारकांच्या पावलावर पाऊल ठेवून देशहिताचे कार्य करण्याची गरज आहे.

देशात वाढता भ्रष्टाचार, ढासळती शिक्षण प्रणाली, महागाई, भेसळयुक्त अन्नपदार्थ, ढासळती आरोग्य सुविधा,वाढती बेरोजगारी यावर अंकुश अती आवश्यक आहे. कारण आज वाढता भ्रष्टाचार व राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल करोडोंची संपत्ती यामुळे देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.क्रांतिकारकांनी देश स्वतंत्र करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आपले बलिदान दिले.परंतू आज आपण स्वतंत्र भारतात वावरतो आहे. त्यामुळे क्रांतिकारकांच्या बलिदानाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी, सरकारने, पक्ष- विपक्षांनी घेऊन देशहिताचे कार्य केले पाहिजे व देशाला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

इंग्रजांनी देशाला लुटले त्यापेक्षा हजार पटीने आजचा भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरत आहे व देशाला खिळ-खिळा करीत आहे यावर सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.

त्याचप्रमाणे क्रांतिकारकांची जोत नेहमी प्रज्वलित रहावी व आपल्या हृदयात त्यांच्या आठवणी निरंतर जीवीत राहाव्यात यासाठी आजच्या दिवशी सरकार, प्रशासकीय विभाग, स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था व शाळा- महाविद्यालय यांनी वृक्षलागवडीला प्राधान्य दिले पाहिजे. कारण बदलत्या हवामानामुळे व अलनिनोच्या प्रभावामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगले आहे यावर उपाय म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आवश्यक आहे. आजच्या दिवसाला जर आपण वृक्षारोपण केले तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला संपूर्ण क्रांतिकारकांचे अवश्य दर्शन होईल व हि आठवण निरंतर आपल्या हृदयात राहिल.शहीद मदनलाल धिंग्रा यांना कोटी- कोटी प्रणाम,जय हिंद!

– ९९२१६९०७७९

# पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते 'स्मार्ट पोलिस चौकी'चे लोकार्पण

## नागरिकांच्या सुरक्षेसाठी मनपा-पोलिसांचा स्मार्ट पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिका व नागपूर शहर पोलिस यांच्या माध्यमातून लकडगंज येथील सरदार वल्लभभाई पटेल मैदान(कच्छीविसा), येथे राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते स्मार्ट पोलिस चौकी' चे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महापौर निता ठाकरे यांच्या होत्या.

यावेळी आमदार कृष्णा खोपडे, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, पोलिस आयुक्त श्री. विश्वास नागरे पाटील, मनपा आयुक्त डॉ. विपिन, सह पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर पोलिस आयुक्त विनिता साहू, एआयएमआयएमचे गटनेता शकील पटेल, शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लढ्ढा, सभापती लकडगंज झोन महेश्वरी बिसेन, नगरसेवक बालू रारोकर, नगरसेविका अर्चना पडोळे, नगरसेवक रामदास शाहू, नगरसेवक शेषराव गोतमारे, नगरसेविका सरिता कावरे, झोन सभापती सीमा ढोमणे, मनपा सहाय्यक आयुक्त विजय थूल, मनपा क्रीडा अधिकारी डॉ. पियूष आंबुलकर, पोलिस उपायुक्त राहुल मदने, पोलिस उपायुक्त विशेष शाखा धर्मेश धुमाळ, सहाय्यक पोलिस आयुक्त लकडगंज विभाग शिवप्रसाद पारवे, तसेच इतर नगरसेवक, पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलिस विभागाने संवेदनशील नागरिकाभिमुख होऊन जनतेला विश्वासात घेऊन काम करण्याकडे जास्त लक्ष घालावे यामुद्द्यावर भर दिला. शहरातील पोलिसिंग व्यवस्था अधिक तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. शहरातील प्रत्येक चौकाला एआय प्रणालीशी जोडून पोलिस आयुक्त, पोलिस उपायुक्त आणि संबंधित पोलिस ठाण्याशी जोडण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच स्मार्ट पोलिस चौकीचे कौतुक करताना त्यांनी सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या पुढाकाराचेही कौतुक केले. कमी जागेत अधिक सुविधा उपलब्ध करून देणारी ही चौकी म्हणजेच 'कमी जागेत जास्त व्यवस्था' या संकल्पनेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांच्या नेतृत्वाखाली नागपूर शहरातील पोलिस व्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



आगामी काळात शहरात नवीन तंत्रज्ञानावर आधारित सुमारे १,५०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याची माहितीही पालकमंत्र्यांनी दिली. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संशयित व्यक्तींची ओळख पटविणे, सराईत गुन्हेगारांच्या हालचालींची माहिती पोलिस यंत्रणेला तातडीने मिळणे आणि संभाव्य गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांना अधिक प्रभावीपणे कार्य करता येणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महापौर निता ठाकरे यांनी शहराचा विकास, सुशोभीकरण आणि भयमुक्त शहराच्या निर्मितीसाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. नागरिक व लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून माझ्यापर्यंत येणाऱ्या विषयांवर योग्य आणि गतिमान पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. चांगल्या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक मानसिकता निर्माण होते, त्यामुळे अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी मनपा प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. मनपाच्या माध्यमातून शहरातील आणखी काही ठिकाणे पोलिस चौकींसाठी निश्चित करण्यात आली असून, पोलिस आयुक्तांच्या माध्यमातून त्या ठिकाणी पोलिस चौकी उभारण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच सरदार वल्लभभाई पटेल, वर्धमान महावीर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकांसाठीही निवडलेल्या ठिकाणी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी ज्या ठिकाणी पोलिस कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची सूचनाही त्यांनी पोलिस आयुक्तांना केली.

थोडक्यात

### आयएमए सावनेरकडून ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

भारतीय वैद्यकीय संघटना सावनेर शाखेच्या वतीने भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने करण्यात आली. उपस्थित डॉक्टर, पदाधिकारी व सदस्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत गायले. यावेळी आएमए सावनेरच्या अध्यक्षा डॉ. स्मिता भुडे यांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत देशभक्तीपर मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्य हे केवळ हक्क नसून त्यासोबत देशाप्रती कर्तव्याची जाणीव असणे आवश्यक असल्याचे सांगितले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रगीत किंवा ध्वजाला सलाम करणे नव्हे, तर आपल्या कायार्तून देशाची सेवा करणे, प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणे आणि समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणे होय,ह्व असे डॉ. भुडे यांनी नमूद केले. डॉक्टर म्हणून समाजाच्या आरोग्याची जबाबदारी पार पाडताना प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे हीदेखील राष्ट्रसेवाच असल्याचे त्यांनी सांगितले. तरुण पिढीने शिक्षण, विज्ञान, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रप्रेम यांचा समन्वय साधून भारताला अधिक सक्षम बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास आयएमए सावनेरचे पदाधिकारी, सदस्य व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम देशभक्तीच्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला.

### महावितरण नागपूर परिमंडळात राष्ट्रध्वजास मानाचा मुजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



महावितरणच्या नागपूर परिमंडळातील प्रशासकीय कार्यालय असलेल्या विद्युत भवन येथे स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते विद्युत भवन कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताच्या गजरात उपस्थितांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. या दिमाखदार सोहळ्याला महावितरण आणि महानिर्मितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने अधीक्षक अभियंता अमित परांजपे, संजय वाकडे आणि दिपाली माडेलवार आदी मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर उपस्थित सर्वांनी एकमेकांना स्वातंत्र्यदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. देशभक्तीच्या वातावरणात हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला असून, जिल्ह्यातील महावितरणच्या इतर कार्यालयांमध्ये देखील स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

### वीरांगना राणी अवंतीबाई लोधी यांची कोराडी येथे जयंतीचा कार्यक्रम संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

राणी अवंतीबाई लोधी यांच्या१९५व्या जयंती निमित्त कोराडी क्रीडा संकुल परिसर लोधी चौक येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार श्री आदिनाथ युवा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रुद्र प्रतापसिंह ठाकुर यांनी पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या मूर्तीसमोर नतमस्तक झाले सदर कार्यक्रमाला वीरांगना राणी अवंतीबाई लोधी समाजचे अध्यक्ष मोरेश्वर बिरखेडे, सचिव महेश घुरिले, जेष्ठ ससदस्य आणि मार्गदर्शक वासुदेव काका बेलेकर, माँ. ग्रामपंचायत सदस्य कुंडलिक जामदार, कैलास गहरुले, दुगार्लाल जामदार, रणजीत बेलेकर, शुभम गहरुले, राजेश जामदार, संदेश पटेल, मनोज बासवरीले, रामसिंग जामदार, सागर निमोणे, निरंजन घुरिले, मयुर बिरखेडे, आदित्य बैस, बिट्टू खंगारले, जितू बेलेकर, लोकेश बिरखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित महिला भगिनी आणि युवक युवतींनी राणी अवंतीबाई लोधी यांच्या क्रांतिकारी जीवना चे धडे गिरवावे, मुलींना स्वयंपूर्ण आत्मस्वरक्षण करण्यासाठी क्रांतीची गरज आहे.

आज लोधी समाज बांधव सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करत आहेत, सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात समाजातील नागरिकांचे खूप मोठे योगदान आहे. आपण वीरांगना अवंतीबाई लोधी यांचे विचार अमलात आणावे असे प्रतिपादन वासुदेव काका बेलेकर यांनी केले. आभार प्रदर्शन रणजीत बेलेकर यांनी केले सूत्रसंचालन लोकेश वऱ्होकर यांनी केले. उपस्थित नागरिकांना अल्पोहर देऊन कार्यक्रमाची सांगता झाले.

# महावितरणचा वीजचोरांना तडाखा, राज्यात १९ हजारांवर वीजचोऱ्या उघड

## जुलै महिन्यात तब्बल ११ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महावितरणने वीजचोरीविरुद्ध राज्यभरात धडक मोहीम सुरु केली असून गेल्या चार महिन्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच इतर वर्गवारीमध्ये १९ हजार ५९९ ठिकाणी वीजचोरी उघड झाली आहे. यामध्ये गेल्या जुलै महिन्यात पदार्फाश झालेल्या तब्बल ११ हजार ३२ वीजचोऱ्यांचा समावेश आहे. थेट तारेच्या हूकद्वारे व मीटरमध्ये फेरफार केलेल्या १५ हजार ९६५ प्रकरणांत ३० कोटी ३६ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे आढळून आले तर उर्वरित ३ हजारांवर ६३४ प्रकरणांचे मूल्यांकन सुरु आहे.

गेल्या एप्रिल महिन्यापासून महावितरणने घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीजजोडण्यांची धडक तपासणी मोहीम सुरु केली आहे. यामध्ये सर्वाधिक कोकण प्रादेशिक विभागात ७४९६, नागपूर- ४५२१, छत्रपती संभाजीनगर- ४५९७ आणि पुणे प्रादेशिक विभागात २९८५ अशा एकूण १९ हजार ५९९ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. यापैकी १५ हजार ९६५ वीजचोऱ्यांचे मूल्यांकन झाले असून ३० कोटी ३६ लाख रुपयांच्या वीजचोरीचे बिल संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. त्यातील ६६२९ ग्राहकांनी १४ कोटी १२ लाख रुपयांचा भरणा केला आहे. तसेच सर्वच वीजचोरी प्रकरणी तडजोड शुल्काच्या दंडाची रक्कम देखील आकारण्यात येत आहे. आतापर्यंत ४९५९ प्रकरणांत १ कोटी ८५ लाखांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले आहे.

वितरण व वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी वीजचोरीविरुद्ध एप्रिलपासून मोहीम सुरु करण्यात आली आहे. एप्रिल ते जूनपर्यंत ८ हजार ५६७ वीजचोऱ्या उघड झाल्या होत्या. दि. १ जुलैपासून आणखी तीव्र झालेल्या या धडक मोहिमेत ११ हजार ३२ ठिकाणी थेट तारेच्या हूकद्वारे किंवा मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या चोरांना महावितरणने दणका दिला आहे. यातील ८४६२ ठिकाणी विजेच्या चोरीचे मूल्यांकन झाले असून संबंधितांना १५ कोटी ११ लाख रुपयांचे वीजबिल देण्यात आले आहे. त्यापैकी ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचा वीजबिल भरणा झाला आहे. तर उर्वरित प्रकरणांत चोरीद्वारे वापरलेल्या युनिटनुसार वीजबिल व दंडात्मक तडजोड शुल्क आकारण्याचे (मूल्यांकनाचे) काम सुरु आहे.

गेल्या जुलै महिन्यात छत्रपती संभाजीनगर- २३६५, कोकण- ४०८४, नागपूर- २३२४ आणि पुणे प्रादेशिक विभागात २२५९ अशा एकूण ११ हजार ३२ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. त्यातील ८४६२ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून १५ कोटी ११ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे स्पष्ट झाले व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचे तडजोड शुल्क देखील आकारण्यात आले आहे. वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा दंडासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध भारतीय विद्युत कायद्याचे कलम १३५ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येत आहे.

भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी दंड व तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. थकबाकीदारांनी अन्य ठिकाणाहून वीजवापर केल्याचे आढळून आल्यास वीजचोरीची कारवाई करण्यात येत आहे.

### एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पीटल येथे स्वातंत्र्य दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पीटल, हिंगणा रोड, नागपूर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. व्हीएसपी अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन नागपुर संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजीतबाबू देशमुख यांनी ध्वजारोहण केले. संस्थेचे उपाध्यक्ष आमदार डॉ. आशिषराव देशमुख हे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

डॉ भाऊसाहेब भोगे, रुपाताई देशमुख, संस्थेचे कोषाध्यक्ष सुधीर देशमुख, नितीन रोंघे, डॉ. सजल मित्रा (अधिष्ठाता), डॉ काजल मित्रा, डॉ. विलास ठोंबरे (उप-अधिष्ठाता), डॉ. नितीन देवस्थळे (उप-अधिष्ठाता व वैद्यकीय अधिक्षक), रणजीत देशमुख दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अभय कोलते, व्हीएसपीएम भौतिकोपचार महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. मनीषा देशपांडे, व्हीएसपीएम माधुरीबाई देशमुख नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. आम्रपाली गजभिये, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. अनुज तिवारी, सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. उत्कृष्ट डॉक्टर्स, कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

### वडगाव गुजर येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव गुजर येथे भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त गावातून तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीत शिक्षक, विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. ग्रामपंचायतीत महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून सरपंच रूपाली लकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर शाळेत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रेखाताई विजय मडावी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विद्यार्थ्यांनी लाँग मार्चद्वारे मानवंदना, संगीतमय कवायत, नृत्य तसेच मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत स्वातंत्र्यदिनावर भाषणे सादर केली. मंगल पांडे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, महात्मा गांधी व इंग्रज यांच्यावर आधारित नाटकाने उपस्थितांची दाद मिळवली. मुख्याध्यापक अवधेश तिवारी, केंद्रप्रमुख भूपेश चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपसरपंच देवराव निमकर, ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थ, पालक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन सुधाकर मस्कर यांनी तर आभार स्नेहा बडवाईक यांनी मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### महावितरणच्या लोकाभिमुख योजनांचा स्वातंत्र्यदिनी अभूतपूर्व जागर, १०० पेक्षा अधिक ठिकाणी जनजागृती मोहीम संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर/ वर्धा**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नागपूर परिमंडलात महावितरणतर्फे विविध जनहिताच्या व लोककल्याणकारी योजनांचा भव्य जागर करण्यात आला. नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील शंभरहून अधिक ठिकाणी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी थेट नागरिकांसोबत संवाद साधत आधुनिक व पारदर्शक योजनांची माहिती दिली.

संपुर्ण नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, पंचायत समित्या, नगर पालिका, बाजार समित्या आणि व्यापारी संकुलांमध्ये आयोजित या मोहिमेत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि स्मार्ट मीटर योजनेवर विशेष भर देण्यात आला.



स्वात्रंत्यादिनानिमित्त कळमेश्वर उपविभागात काढण्यात आलेली जनजागृती बाईक रॅली या संपूर्ण उपक्रमाचे मुख्य आकर्षण ठरली, मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता संजय वाकडे आणि कार्यकारी अभियंता सुधीर हेडाऊ, उपकार्यकारी अभियंता रोशन शेंदरे यांच्या नेतृत्वात निघालेल्या या बाईक रॅलीच्या ज्याच्या माध्यमातून महावितरणच्या लोककल्याणकारी योजनांचा संदेश थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आला. तसेच, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजनेअंतर्गत घोगली (ता. कामठी) येथील लाभार्थी सचिन सोनारे यांच्या नेट मीटर कनेक्शनचा शुभारंभ महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत केवळ ५ हजार रुपये भरून हा लाभ मिळाल्याबद्दल. सोनारे यांनी महावितरणचे आभार मानले.

कामठी तालुक्यातील घोगली ग्रामपंचायत येथे आयोजित विशेष ग्रामसभेमध्ये मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करत प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले, तर अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांनी ग्राहकांच्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमादरम्यान घोगलीचे सरपंच राहुल सोनारे यांनी ग्रामस्थांना नैसर्गिक स्त्रोतांद्वारे तयार होणाऱ्या विजेचा वापर करण्याचे आवाहन केले आणि ग्रामपंचायतीच्या सहयोगाने मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात राबविलेल्या या जनजागृती मोहीमेत नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता संजय वाकडे व प्रफुल लांडे, वर्धा येथील अधीक्षक अभियंता स्मिता पारखी, कार्यकारी अभियंता सुधीर हेडाऊ, तसेच नागपूर व वर्धा जिल्ह्यातील सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय व शाखा अभियंता, महावितरणचे कर्मचारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. नागरिकांनी महावितरणच्या या आधुनिक व पारदर्शक योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.